सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# फिटे अंधाराचे जाळे, झाले ढगाळ आकाश...

लक्ष्यवेध
अनय जोगळेकर

**अमेरिका-इस्रायलच्या इराणविरोधातील २० दिवसांहून अधिक काळ सुरु असलेल्या युद्धाने जागतिक चिंतेत सर्वार्थाने भर घातली. तरी पाकिस्तानातील संभाव्य अमेरिका-इराण चर्चा, ९ एप्रिल ही एकाएकी चर्चेच्या केंद्रस्थानी आलेली युद्धसमाप्तीची तारीख, यामुळे युद्धाच्या अंधाराचे जगावरील जाळे कायम असून, आकाश अजूनही ढगाळच आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिलेली ४८ तासांची मुदत पाच दिवसांनी नुकतीच वाढवली आहे. त्यामुळे जगभरातील शेअर बाजारात मोठी ओहोटी लागली असतानाच, उधाण आले. पण, हा उत्साह किती दिवस टिकणार, हे अजूनही स्पष्ट नाही.**

दि. २८ फेब्रुवारीला अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ले केल्यापासून इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीची चौकीदारी सुरू केली. जिथून रोज १००हून अधिक मोठी जहाजे अरबी समुद्रामध्ये प्रवेश करीत होती, तिथे आता सुमारे २० जहाजे प्रवास करीत आहेत. अमेरिका आणि मित्रदेशांच्या जहाजांना बाहेर पडण्यास मनाई असल्यामुळे आखातात एक हजारांहून जास्त जहाजे अडकून पडली आहेत. इराण आणि ओमानच्या दरम्यान मोठ्या जहाजांना ये-जा करण्यासाठी सुमारे तीन किमी रुंदीचा मार्ग उपलब्ध आहे. त्यात ओमानच्या बाजूला समुद्रात सुरुंग पेरून स्वतःच्या बाजूने वाहतुकीसाठी चिंचोळा मार्ग मोकळा ठेवला आहे. आपल्या परवानगीशिवाय जाण्याचा प्रयत्न केल्यास इराणने जहाजे बुडवण्याची धमकी दिली आहे. आखाताच्या सुरक्षेसाठी अमेरिकेने मित्रदेशांना साद घातली असता, काहींनी नकार दिला; तर काहींनी टाळता येत नाही म्हणून एखादे जहाज किंवा एखादी पाणबुडी तैनात केली आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली न केल्यास इराणच्या वीजनिर्मिती केंद्रांवर हल्ला करून त्याला अंधारात ढकलण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. त्याला उत्तर देताना इराणनेही आपल्या वीजनिर्मिती केंद्रांवर हल्ला झाल्यास आपणही आखाती देशांतील वीज व समुद्राच्या पाण्याच्या शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ला करू, तसेच अमेरिकन कंपन्यांच्या कार्यालयांनाही लक्ष्य करण्याची धमकी दिली. अमेरिका आणि तिचे मित्रदेश वगळता, आखात सर्वांसाठी खुले असल्याचे इराणने म्हटले आहे. अमेरिकेने आखातात जमीन, हवा आणि पाण्यात लढू शकणार्या 'मरीन्स'ची जमवाजमव केली आहे. ट्रम्प यांनी मुदत दिली असली, तरी युद्धबंदीनंतर इराणकडून सादर केलेल्या मागण्या आणि अमेरिकेची देण्याची तयारी यामध्ये जमीन-आसमानाचे अंतर आहे. या आठवड्यात या युद्धाला चार आठवडे पूर्ण होत असताना ते अनिश्चित काळासाठी चालू राहील, अशी भीती अजूनही आहे. अजूनपर्यंत या युद्धामध्ये इराणने हाराकिरी न करता, टप्प्याटप्प्याने वाढ केली आहे. नेतृत्वाची फळी कापली जाऊन आणि नवीन सर्वोच्च नेते मुजतबा खामेनी यांचे अजून दर्शन झाले नसले, तरी इराणच्या सैन्याने, तसेच 'इस्लामिक रिपब्लिक गार्ड'ने शस्त्र टाकून पळ काढला नाही.

या युद्धात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'सोबत मानवविरहित युद्धतंत्राची चुणूक दिसून आली. अमेरिका आणि इस्रायलच्या सर्वोत्तम युद्ध तंत्रज्ञानापुढे इराणचे घाऊक युद्धतंत्र तोकडे पडले असले, तरी परिणामकारकही ठरले आहे. अमेरिका लष्करी ताकदीच्या बाबतीत चीनपेक्षा अनेक मैल पुढे निघून गेली आहे. चीनकडील तंत्रज्ञानाच्या मर्यादा उघड झाल्या आहेत. इस्रायल आकाराने लहान असला, तरी युद्धाच्या मैदानात त्याने फ्रान्स, जर्मनी आणि ब्रिटन या कागदावर बलाढ्य दिसणार्‍या; पण अनेक दशके युद्ध न लढलेल्या देशांना मागे टाकले आहे. दुसरीकडे इराणच्या 'शहीद ड्रोन'ने संपूर्ण आखातात धुमाकूळ घातला आहे. इराणची दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे मोठ्या संख्येने उद्ध्वस्त झाली असली, तरी अजूनही इराण त्यांचा मारा करत आहे. गेल्या आठवड्यात इराणने सुमारे चार हजार किमी अंतरावर असलेल्या हिंद महासागरातील अमेरिका आणि ब्रिटनच्या 'दिएगो गार्सिया' या तळावर दोन क्षेपणास्त्रे डागली. त्यातील एक क्षेपणास्त्र अर्ध्यावरच कोसळले, तर दुसरे अमेरिकेच्या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेने निकामी केले असले; तरी यातून इराणने आपण युरोपच्या अनेक भागांवर हल्ला करू शकतो, हे दाखवून दिले. आपल्या हातात हुकुमाचा एक्का असून, त्याच्या जोरावर आपण हरलेला डाव जिंकू शकतो, याची इराणला खात्री आहे. अमेरिकेशी तडजोड करण्याची ही शेवटची संधी आहे, याची इराणला जाणीव आहे.

इराणच्या इस्लामिक राजवटीला अमेरिकेकडून आपले अस्तित्व सुनिश्चित करायचे आहे. युद्धात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी खनिज तेल आणि नैसर्गिक वायूच्या क्षेत्रातील गुंतवणुकीवरील बंदी हटवणे, इराणच्या बँकांना जगभरातील बँकांशी व्यवहार करू देणे आणि इराणच्या सुरक्षेमध्ये चीन, रशिया किंवा 'ब्रिक्स'सारख्या गटांची हमी मिळवणे, अशा काही अटी मान्य झाल्याशिवाय इराण होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणार नाही. अमेरिकेसाठी इराणने आपला अणू-इंधन समृद्धीकरण प्रकल्प गुंडाळणे, दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे निर्माण न करणे, इस्रायल आणि आखाती देशांविरुद्ध दहशतवादी कारवायांना समर्थन न देणे या मागण्या महत्त्वाच्या आहेत. दोन्ही देशांमधील मतभेदांची ही दरी मिटली, तर तो एक चमत्कारच असेल. त्यामुळेच हे युद्ध एवढ्यात आटोपण्याची शक्यता कमी वाटते. या युद्धामध्ये इराणचे इस्रायलपेक्षा जास्त हल्ले झेललेल्या संयुक्त अरब अमिरातींसह इतर अरब देशांचे धैर्य खचल्याचेही दिसत नाही.

संयुक्त अरब अमिराती ड्रोनचे हल्ले होत असतानाही, आपले विमानतळ काही प्रमाणात सुरू ठेवण्यात यशस्वी झाली आहे. २०२० साली संयुक्त अरब अमिरातींनी इस्रायलशी पूर्ण राजनयिक संबंध प्रस्थापित केले. ऑक्टोबर २०२३ पासून गाझा पट्टी आणि त्यानंतर लेबनॉन आणि इराणविरुद्ध इस्रायलचे युद्ध सुरू असून, त्याचा या संबंधांवर परिणाम झाला नाही. या युद्धामुळे दुबई आणि अबुधाबीची आंतरराष्ट्रीय शहरे अशी प्रतिमा धुळीला मिळण्याची भीती असूनही, संयुक्त अरब अमिरातीही आपल्या भूमिकेवर ठाम आहे. या देशात नोकरीधंद्यासाठी आलेले बहुतांश लोक आजही तिथून बाहेर पडत नाहीयेत. इराण जर हुशार असेल, तर आखाती देशांच्या वागणुकीतून निश्चितच धडा शिकेल. आजवर आखाती अरब देश इराणविरुद्ध भूमिका घ्यायला घाबरत असत. पण, आखाताच्या भविष्यात इस्लामिक मूलतत्त्ववादाला थारा द्यायचा नाही, याबाबत संयुक्त अरब अमिरातींची भूमिका निश्चितच कौतुकास्पद आहे. याबाबतीत कतार अजूनही धरसोडीचे धोरण अवलंबत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभेला संबोधित करताना इराणमधील युद्धाचे देशातील विविध क्षेत्रांवर, तसेच समाजघटकांवर कसे विपरीत परिणाम होत आहेत आणि त्यांचा सामना करण्यासाठी सरकार कोणत्या उपाययोजना करत आहे, याचे विस्तृत विवेचन केले. सुमारे एक कोटी भारतीय आखाती देशांमध्ये काम करतात आणि दरवष अब्जावधी डॉलर भारतात पाठवतात. भारत ऊर्जासुरक्षा, अन्नसुरक्षा, तसेच व्यापारी सुरक्षेसाठी आखातावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.

नरेंद्र मोदींनी सांगितले की, गेल्या तीन आठवड्यांत त्यांनी आखातातील प्रत्येक राष्ट्रप्रमुखाशी प्रत्येकी दोनवेळा दूरध्वनीद्वारे चर्चा केली आहे. भारताने २७ ऐवजी ४१ देशांकडून खनिज तेल आणि नैसर्गिक वायूची खरेदी करायला सुरुवात केली आहे. गेल्या १२ वर्षांमध्ये महिनाभर पुरेल एवढ्या तेलाचे साठे करण्यात आले असून, तेल कंपन्यांनी त्यांच्या साठवणूक क्षमतेतही वाढ केली आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉलच्या मिश्रणाचे प्रमाण पाच टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आले आहे. भारतीय रेल्वेचे संपूर्ण विद्युतीकरण करण्यात आले असून, सार्वजनिक वाहतुकीसाठी डिझेलऐवजी बॅटरीवर धावणाऱ्या १५ हजार बसची खरेदी करण्यात आली आहे. देशातील मेट्रोचे जाळे २५० किमीवरून ११०० किमीपर्यंत नेण्यात आले आहे. देशातच युरिया तयार करण्याचे सहा प्रकल्प सुरू केले असून, शेतकऱ्याना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे. असे असले तरी भारताचे आखातावरील अवलंबित्व पाहता, तेथील घटनांकडे देशाचे बारीक लक्ष आहे.

# अंधश्रद्धेचा वासनांध खेळ

**लिंगपिसाट अशोक खरात याच्या भयंकर कारनाम्याने महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली. या प्रकरणामध्ये सगळ्यात भयंकर वाटते, ते शिकलेल्या सुशिक्षित आणि सर्वच स्तरांतील घरच्या महिलांनी त्याच्या विकृतीसमोर केलेले समर्पण. 'महिला आयोगा'च्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचेही वागणे निषेध करण्यासारखेच. जागृत सत्य, श्रद्धा आणि विकृत अंधश्रद्धा यातला भेद इतका मिटावा? का? या प्रश्नाच्या उत्तराचा या लेखामध्ये घेतलेला मागोवा...**

समाजभान
योगिता साळवी



'तुमच्यावर कोप होईल,' असे अशोक खरात त्याच्यावर कारवाई करणार्या पोलिसांना म्हणाला. काय म्हणावे याला? 'मी कृष्ण आणि तू राधा' वगैरे वगैरे सांगून 'माझ्यासोबत संबंध ठेव, नाहीतर तुझा नवरा मरेल' (त्याच्या शापाने) किंवा बरकत येण्यासाठी किंवा इच्छा पूर्ण करण्यासाठी महिलेने त्याच्याकडून योनीशुद्धी करून घ्यावी, त्याचे मूत्र प्यावे इत्यादी अत्यंत विकृत आणि संतापजनक कृत्य अशोक खरात महिलांकडून करवून घेत असे. हिंदू समाजाची ज्या पोथी-पुराण आणि पूजा वगैरेवर श्रद्धा आहे त्यावर अतिशय आक्षेपार्ह पद्धतीने टीका करून, वर आपण काहीतरी भारीच बहुमोल बोलत असल्याचा आविर्भाव आणणार्या 'महिला आयोगा'च्या रूपाली चाकणकर यांचेही नाव या प्रकरणात पुढे आले आहे.

अशोक खरात गुरू असून, त्यांच्यामुळेच आपल्याला आयुष्यात काय करायचे आहे याचे ज्ञान झाले, असे म्हटल्याचे, त्याची पाद्यपूजा करताना किंवा त्याच्यासाठी छत्री धरताना, त्याला 'प्रतिविठ्ठल' संबोधतानाचे रूपाली चाकणकरचे व्हिडिओ प्रसारमाध्यमांवर झळकले. 'महिला आयोग' जो महिलांच्या अन्याय-निवारणासाठी आणि हक्कांसाठीच निर्माण झाला, जिथे महिलांच्या कल्याणाच्या योजनांसाठी विचारमंथन करण्यात येते, त्याच 'महिला आयोगा'च्या अध्यक्षस्थानी असलेल्या रूपाली अशा लिंगपिसाट नराधमाला गुरू मानत होत्या? आता त्या म्हणत आहेत की, त्याच्या या प्रकरणांबद्दल त्यांना माहितीच नव्हती. कायदा-सुव्यवस्था काय करायचे ते करतीलच; पण तरीही प्रश्न पडतो की, रूपाली चाकणकर या 'महिला आयोगा'च्या अध्यक्षा होत्या, राज्यात महिलांवर अन्याय-अत्याचार होऊ नयेत, यासाठी तजवीज करणारी मोठी यंत्रणा त्यांच्या ताब्यात होती. याबाबत एका पत्रकाराने थेट 'महिला आयोगा'कडे सूतोवाचही केले होते. त्यांनी याबाबत काही पाठपुरावा केला होता का? त्यांची भूमिका काय होती, याबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न अनुत्तरितच आहेत आणि त्यामुळेच केवळ त्यांच्या राजीनाम्याने समाधान होणार नाही. ज्यावेळी रुपाली चाकणकर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षस्थानी होत्या, त्याचकाळात या राज्यामध्ये अनेक मुली 'लव्ह जिहाद'च्या बळी ठरल्या. मात्र, या विरोधात रुपाली चाकणकर यांनी तोंडातून साधा 'ब्र'देखील काढला नाही. इतकेच नव्हे तर, त्या मुलींना न्याय मिळवून देण्याच्या प्रक्रियेमधील रुपाली चाकणकर यांचा सहभाग आज भिंग घेऊनच शोधावा लागेल. या परिप्रेक्ष्यात एक विचार असा येतो की, याप्रकरणात शोषण झालेल्या त्या महिला या लिंगपिसाटाकडे कशासाठी आल्या असतील? तर उत्तर आहे, या जगात तुरळक अपवाद सोडले; तर प्रत्येकाला आपले भविष्य जाणून घ्यायची आंतरिक इच्छा असतेच. अशोक खरातच काय किंवा गल्लोगल्ली असलेले ते बंगाली बाबा, मौलवी किंवा चर्चचे पाणी देऊन कन्सरही बरा होतो असे थोतांड सांगणारे पाद्रीही लोकांच्या याच इच्छेचा गैरफायदा घेतात. आपण ईश्वराचा अवतार आहोत किंवा दूत आहोत आणि माझ्यामुळेच तुमचा उद्धार होणार असल्याचे दाखवण्यासाठीच, हे असले लबाड लोक माणसेही पेरतात. ही माणसे पैसे चारून उभी केलेली असतात. हीच माणसे लोकांना मुद्दाम सांगतात की, अमूक एक बाबा/पाद्री किंवा मुल्ला यांच्याकडे जादूई शक्ती आहे. त्याला भविष्य समजते. माझे बघा खूप चांगले झाले. माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण झाल्या. तुम्ही ऐका, तिथे जा. तुम्हाला गुण येईल. झाले, असे म्हटले की, अतिम हत्त्वाकांक्षी व्यक्ती आपला हेतू साध्य व्हावा, यासाठी किंवा परिस्थितीने नाडलेली व्यक्ती शेवटचा उपाय म्हणून, या असल्या लोकांकडे जातात आणि तिथूनच यांच्या आयुष्याचा खेळ सुरू होतो.

अशोक खरात याच्या काळ्या कृत्यात फसलेल्या महिलांचे दुर्दैवही असेच सुरू झाले असेल. आपले भविष्य जाणून घेऊन परिस्थिती बदलण्यासाठी, या महिला गेल्या असतील. ही गद वाढत गेली आणि लोकांची गद होते म्हणजे नक्कीच याच्यात काहीतरी चमत्कार करण्याची शक्ती आहे, असे अनेकींना वाटलेच असणार. याच माध्यमातून एक अत्यंत लाजिरवाणे आणि भयानक 'सेक्स रॅकेट' उभे राहिले नसेल, तरच नवल. या नराधमाचे व्हिडिओ प्रसारमाध्यमांमध्ये व्हायरल होत आहेत. त्या व्हिडिओमध्ये असलेल्या महिलांचे काय? कशाने का होईना; पण त्या त्याच्या सोबत तिथे अनैतिक कृत्य करत होत्या. त्यामुळे त्याही दोषी आहेतच. पण, या महिलांच्या कुटुंबाचे काय? त्यांच्या कुटुंबाच्या मनावर आता जे आघात होत असतील, त्याची कल्पना न केलेलीच बरी. न जाणो, किती पिढ्या तो आघात, त्यांचे जगणे उद्ध्वस्त करणार आहेत. त्यामुळे वाटते की, या लिंगपिसाटाचे जे व्हिडिओ प्रसारमाध्यमांवर दिसत आहेत, त्यावर प्रशासनाने बंदी आणावी. मिळालेल्या माहितीनुसार, हा 'कफ सिरप'मध्ये 'व्हायग्रा' मिसळून ते प्रसाद म्हणून द्यायचा. याचा अर्थ सरळ आहे की, त्याच्याकडे येणारा एकजण फसला की, तो दुसर्याला त्याच्याकडे आणत असणारच. हा प्रसाद खाऊन त्याचे अनुयायी त्याच्या विकृत लैंगिक कृत्यात सहभागी झाले आणि पुढे हे चक्र सुरूच राहिले. याची व्याप्ती कुठपर्यंत गेली, हे काळच सांगेल. पण, महिलांचे शोषण कसेही होते, याचे अत्यंत दुःखद आणि अपमानजनक वास्तव समोर आले आहे.

असो, अशोकने लोकांना स्वतःच्या कच्छपी कसे लावले, यातला केवळ एक टक्का भाग सांगणारा एक व्हिडिओ पाहिला. यातून समजले की, नाशिक ही धर्मभूमी. नागदोष-निवारण पूजा करण्यासाठी राज्यभरातले लोक नाशिकला येतात. हा अशोकसुद्धा आपण नागदोष-निवारण पूजा करतो, असे म्हणत असे. चार-दोन लोक त्याने पेरले आणि या लोकांनी इतरांना सांगायला सुरुवात केली की, अशोक महाराजांकडे नागदोष-निवारण करण्याची अद्भुत शक्ती आहे. इतर कुणाकडे पूजा करू नका, यांच्याकडेच करा. यातून काही लोक त्याच्याकडे जाऊ लागले. त्यांना तिथे गेल्यावर चांगले वाटेल, अशी वातावरणनिर्मिती केलेली असायची. अशोक लोकांना सांगायचा की, मी आहे ना, नागदोष-निवारण करेन. प्रत्यक्ष नागराज मला वश आहेत. मग तो काही मंत्र पुटपुटे. काही वेळातच एक २० फुटांचा काळा तुकतुकीत कांतीचा नाग, डुलतडुलत त्याच्यासमोर यायचा. पूजा करतोय, अशा आविर्भावात अशोकसमोर संथ उभा राहत मान डोलवायचा, लोक अचंबित व्हायचे. २० फुटांचा नाग? कॅप्टन महाराजांनी मंत्र देऊन आदेश दिल्याबरोबर आला आणि त्यांच्यासमोर उभा राहून त्यांचे आदेश ऐकतोय. मग अशोक नागदोष-निवारण करणार्यांच्या इच्छा सांगायचा. या सगळ्यामुळे त्याची ख्याती पसरली की, कोणत्याही प्रकारचा नागदोष किंवा कोणत्याही इच्छा पूर्ण करायच्या असतील, तर कॅप्टन अशोकच करू शकतो. पण, सत्य काय होते; तर तो नाग कागदाचा होता आणि त्यावर नागाची कात लावलेली होती. त्यात आतमध्ये एक यंत्र बसवलेले होते आणि त्याचा रिमोट अशोकच्या हातात होता. अशोक रिमोटने तो नाग बाहेर आणायचा आणि रिमोट दाबूनच त्याला डोलायला लावायचा. पण, या सगळ्या वातावरणाचा समोर बसलेल्या लोकांवर परिणाम व्हायचा की, कुणीही विचार केला नाही की, हा खरा नाग आहे की खोटा!

उप्प! दांभिक आणि लबाडीची हद्दच. पण, तिथे उपस्थित असणार्याला एकालाही का? कसे? हा प्रश्न पडला नाही. या अशोकला भारतीय भाषांसह जगभरातल्या इतर भाषा येतात.

(पान ४ वर)

# सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची प्रकट मुलाखत

**तरुण भारतच्या शताब्दी पूर्ती सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची प्रकट मुलाखत झाली. नागपूर तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे आणि राजाराम वाचनालयाचे सचिव रवींद्र देशपांडे यांनी ही मुलाखत घेतली. भरगच्च भरलेल्या नागपूरच्या सुरेश भट सभागृहात झालेल्या या मुलाखतीदरम्यान प. पू. सरसंघचालकांनी मनमोकळा संवाद साधला. समाज व्यवस्था, संघटन, माध्यमे आणि संघाची भूमिका अशा विविधांगी विषयांवरील प्रश्नांना उत्तरे देत प. पू. सरसंघचालकांनी उपस्थितांची मने जिंकली. त्या मुलाखतीचा हा वृत्तांत...**

# पंच परिवर्तनात समाजाचा प्रत्येक घटक आमच्यासोबत



नागपूरच्या दैनिक तरुण भारतचे शताब्दी वर्ष आणि श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचा अमृत महोत्सव असा अमृत योग यंदा जुळून आला. संघाने शताब्दी वर्षानिमित्त दिलेल्या पंचसूत्रीच्या अनुषंगाने दैनिक तरुण भारताने वर्षभरात अनेक उपक्रम घेत खारीचा वाटा उचलला. या उपक्रमांना अतिशय छान प्रतिसाद मिळाला आणि चांगला परिणामही दिसून आला. हे सर्व पाहता पंच परिवर्तनाच्या संकल्पनेला एकूण समाजात कसा प्रतिसाद मिळाला, असे आपल्याला वाटते?

**प. पू. सरसंघचालक :** पंच परिवर्तन हे सर्वत्र स्वीकारार्ह आहे आणि लोकांनी उत्साहाने ते स्वीकारले आहे. कारण याविषयीच्या कार्यक्रमांत विविध समाजातील लोक, शासनप्रशासनातील लोक, अर्थकारणातील दिग्गज असे सगळे लोक आले. त्या सगळ्यांनी या पंच परिवर्तनासाठी उत्सूकता दाखवली आणि हा एकूण समाजाचे स्वास्त्थ्य ठीक करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेला कार्यक्रम अशी त्याची प्रशंसा केली. ते लोक संघाच्या विचारांचे असोत किंवा नसोत, हिंदू समाजातील असोत किंवा नसोत, भारत देशातील असोत किंवा नसोत पंच परिवर्तनाच्या बाबतीत सगळीकडे एकमत आहे. आता मनाने आणि बुद्धीने या संकल्पनेचा सर्वांनी स्वीकार केला आहे. प्रत्यक्ष काम करायला लागतील तेव्हा अडचणी येतील. पण, पंच परिवर्तनाचे काम करावे लागेल. कारण पंच परिवर्तन ही कृती आहे, नुसता विचार नाही. छोट्या छोट्या कृती करायच्या आहेत. प्रबोधन करणे, स्वत:च्या उदाहरणातून समाजाला हे परिवर्तन शिकवणे हे काम स्वयंसेवकाने केले तरच पुढे जाणे शक्य आहे. स्वयंसेवक हे करू शकतात. तेही सुरू झाले आहे. त्यामुळे कार्यपद्धतीमध्ये एक ॲडिशन म्हणता येईल असे त्याचे प्रकटीकरण झाले आहे. मुळात ती कल्पना होती. बीजातून रोपटे एका विशिष्ट स्तरावर आल्यावरच मग त्याला फुले येतात. मग फळे येतात. आता संघाची जी स्थिती आहे, त्यामध्ये संघाच्या कार्याची समाजातील स्वाभाविक अभिव्यक्ती अशी आहे की, समाज परिवर्तनाच्या कार्यामध्ये स्वयंसेवकाने ती शिस्त आणि संस्कार जपून, आपले उदाहरण समोर ठेवून, आत्मीयतेने समाज जोडून हे परिवर्तन आणावे. ते काम सुरू झाले आहे.

**प्रश्न :** या शताब्दीच्या पर्वावर संघाच्या संरचनेत, भौगोलिक रचनेत मोठे बदल होत आहेत. म्हणजे आतापर्यंत जसे ४६ प्रांत होते; आता ८६ संभाग होणार आहेत आणि कार्यपद्धतीतही काही बदल होणार असल्याची चर्चा आहे. या बदलांच्या मागे कोणता विचार आहे आणि त्यांची दिशा काय आहे?

**प. पू. सरसंघचालक :** संघाचे काम मोठे झाले आहे. काम मोठे झाल्यावर त्याची रचना विकेंद्रित होणे आवश्यक आहे. म्हणजे संघाच्या व्यक्तिनिर्माणाच्या कार्याचा 'व्हॉल्यूम' आता मोठा झाला आणि संघाकडून अपेक्षा वाढल्यामुळे संघाच्या स्वयंसेवकांना करावी लागणारी कामेही खूप वाढली आहेत. त्यामुळे आणखी छोटी युनिट्स बनवून पूर्वी जे केंद्रीय स्तराहून करावे लागायचे, ते आता खालच्या स्तराने करायचे आणि नवीन-नवीन जे कार्य करावे लागते, ते वरच्या स्तराने सांभाळावे, अशी कल्पना आहे. अशा प्रकारची एक विकेंद्रित रचना करणे आवश्यक आहे. कोणतीही कंपनी मोठी झाली, कोणतीही चळवळ मोठी झाली की हे सगळे करावे लागते. हे स्वाभाविक परिवर्तन आहे. त्यामुळे संभाग म्हणून ही रचना झाली. आता काम इतके वाढले आहे की, प्रत्येक गोष्टीसाठी वेगळी व्यवस्था लागते. शासन-प्रशासनाशी संबंध येतो. मग त्यासाठी वेगळी व्यवस्था झाली आहे. सगळे जर त्यात उतरले तर त्यात खाचखळगेही असतात. मग त्याच्यासाठी एक वेगळे प्रदेश नावाचे एक एकक राहील. ते राज्य पातळीवर हे सगळे संबंध, समन्वय सगळ्या गोष्टी पाहतील. अशी ती रचना आहे. संघाची कार्यपद्धती बदलत नाही. ती एकच आहे आणि ती एकच राहणार. दुसरी कोणतीही नाही. दर दहा-पंधरा वर्षांनी पर्यायी काही पद्धती मिळते का, हे पाहिले जाते. कारण जी चालू आहे, तिचा रटाळपणा करणाऱ्याला सहन करावा लागतो. पण त्याला इलाज नाही. दुसरी पद्धती सापडत नाही. दर दहा वर्षांनी, बारा वर्षांनी त्याचा शोध घेतो. पण नाही मिळत. ती कार्यपद्धती अशी आहे की, दोस्ती करायची आणि आपल्या उदाहरणातून आपोआप परिवर्तन घडवायचे. ती कार्यपद्धती एवढीच आहे. ती कायम राहणार. बाकी त्याचे जे वर्णन होते, रुपाचे वर्णन होते. ते रूप आहे. ते बदलत असते काळानुसार. उदाहरणार्थ, आता आम्ही असेही म्हणतो की, दर महिन्याला शक्य असेल तर किंवा दोन-तीन महिन्यातून एकदा प्रत्येक स्तरावरील निदान कार्यकारिणीने आपल्या कुटुंबासहित अर्ध्या दिवसाकरिता एकत्र राहिले पाहिजे. सुख-दु:खाच्या गोष्टीही होतात. संबंधही चांगले वृद्धिंगत होतात आणि संघ समजण्यासाठी त्याची मदत होते. समाजात संपर्क करायचा तर त्यात महिला-पुरुष सगळेच आहेत. त्यामुळे संपर्क करताना महिलासुद्धा संपर्क करतील तर सोयीचे आहे. म्हणून त्या कार्य विभागांच्या ज्या टीम असतात, त्यांचे असे अनौपचारिक दायित्व असते. त्यामध्ये आता महिलासुद्धा असतात. असे जे बदल आहेत शैलीचे, ते बदल होत राहणार. ते काळानुसार, कामाच्या अवस्थेनुसार संघ करत असतो आणि पुढेही करत राहील. पण मुळात कार्यपद्धती जी आहे ती मित्रता करा आणि आपले उदाहरण ठेवा. न बोलता सगळे बदल होतील. ती 'फंडामेंटल' आहे आणि ती सदैव कायम राहील.

**प्रश्न :** आज एका माध्यमाची शताब्दीपूर्ती आहे. एक अनुभवजन्य प्रश्न विचारतो की, माध्यमांमध्ये एकीकडे संघाच्या कामाची बाजू पूर्णपणे व्यवस्थित मांडली जात नाही, हा आतापर्यंतचा अनुभव आहे. आता थोडीफार सुधारणा होते आहे. पण, बहुतांश वेळा प्रसार माध्यमांकडून टीका, अपप्रचार, चुकीची मांडणी या सगळ्या गोष्टी संघाला सहन कराव्या लागल्या. त्याची एक दुसरी बाजू पण आहे की, काही वेळा पत्रकार स्पष्टीकरणासाठी कार्यालयात किंवा पदाधिकाऱ्यांकडे फोन करतात किंवा संपर्क साधण्याचा प्रयत्न करतात. काही प्रतिसाद मिळत नाही, अशी तक्रार असते. एकंदर प्रसार माध्यमांविषयी संघाची भूमिका आणि आकलन काय आहे आणि त्याची दिशा काय आहे?

**प. पू. सरसंघचालक :** प्रसार माध्यमे ही सार्वजनिक जीवनाचा एक अनिवार्य भाग आहेत. सार्वजनिक जीवनाच्या सर्व पैलूंचा विचार संघात आणि संघटनेने करावा लागतो. तो केला पाहिजे. फक्त काय आहे की संघाची एक अनोखी अशी पद्धती आहे. ती अशी की, माहिती हवी असल्यास कार्यालयात फोन न करता प्रचार विभागाला फोन करायचा. प्रचार प्रमुख सर्वांना माहिती आहेत. कार्यालयात तेथील व्यवस्था पाहणारे लोक असतात. त्यांच्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्यांची व्यवस्था पाहणे वगैरे जबाबदाऱ्या असतात. कार्यालयाच्या विश्वातच त्यांचे काम चालते. तुम्ही त्याला हे विचाराल तर सतरा कामानंतर हे अठरावे काम म्हणजे तो त्रासिक होतो. असा अनुभव आला असेल तुम्हाला. त्यामुळे प्रचार विभागाला विचारायचे. त्यांच्याकडे माहिती असते आणि माहिती नसेल तर ते ताबडतोब त्याविषयी संपर्क साधून ती तुम्हाला देऊ शकतात. तर अशा काही बारीक गोष्टी आहेत, ज्या समजाव्या लागतात. प्रसार माध्यमे आहेत आणि प्रसार माध्यमांचे एक स्थान आहे समाज जीवनामध्ये. प्रबोधन आणि संस्कारांसाठी हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. त्याचा विचार सर्वांनी केलाच पाहिजे आणि त्याची व्यवस्था असलीच पाहिजे. संघाचे काम जोवर केवळ मनुष्यनिर्माणकेंद्री स्वरूपात चालू होते, तोपर्यंत याची काही फार आवश्यकता नव्हती आणि ते काम 'फोकस्ड' होऊन करायचे काम आहे. त्यामुळे इकडे लक्षही नव्हते. पण, जसजसा संघ मोठा झाला, संघ जाणून घेण्याची गरज वाढली. पूर्वी एकमात्र गरज होती संघाला विरोध करण्याची. आता जाणून घेण्याचीसुद्धा गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे आता आम्ही जरा काही कमी पडलो की माध्यमे ती उणीव भरून काढतात. आमच्यापर्यंत पोहोचतातच येनकेनप्रकारेण. त्यामुळे ती व्यवस्था आवश्यकतेनुसार उभी झाली. आवश्यकतेनुसार एक प्रचार विभाग सुरू झाला आणि त्याने हळूहळू आपले तंत्र उभे केले आहे आणि आता ते बऱ्या अवस्थेत आहे, असे मला वाटते.

**प्रश्न :** अनेकदा असे होते की, तुमची विधाने 'ट्विस्ट' केली जातात, संदर्भ सोडून प्रसिद्ध केली जातात आणि गदारोळ माजवला जातो. आरक्षणाचे उदाहरण सगळ्यांना माहिती आहे. अशा वेळी काय वाटते?

**प. पू. सरसंघचालक :** मला काहीच वाटत नाही. मला दया येते आणि हसू येते एवढेच. हे होणारच. कारण संघाविषयी विरोधात बोलायला आता लोकांकडे फारसे काही नाही. त्यांना काहीतरी तर बोलायलाच हवे. मग ते असे काहीतरी करतात. मजा वाटते आणि आपलेही शिक्षण होते. आपण काय बोलले की लोक काय अर्थ काढू शकतात, हेही समजते. त्यामुळे आपलेही शिक्षण होते. कोणत्याही प्रकारे संघाची संभावना झाली तरी आमच्यासाठी एक शिक्षण असते. या दृष्टीनेच आम्ही त्याकडे पाहतो.


**प्रश्न :** माध्यमांचे सहकार्य संघाला नव्हतेच. आता थोडी परिस्थिती बदलली आहे. संघावर गेल्या शतकभरामध्ये अनेक संकटे आली. पण संघाची बाजू माध्यमांतून नीट मांडली जात नसल्याने त्याच्याबद्दल समाजामध्ये गैरसमज पण फार होते. अशी सगळी प्रतिकूलता असूनही संघ आणि संघाचे जनसमर्थनही वाढत गेले. हे विरोधाभासी वाटते की एखाद्याला इतकी प्रतिकूलता सहन करावी लागलेली असताना संघ कसा वाढला...?

**प. पू. सरसंघचालक :** साधारणपणे प्रचार किंवा प्रसिद्धी हे एखाद्या संस्थेचे 'लाईफब्लड' असते. त्यातून ती संघटना वाढते. पण, संघाचे 'लाईफब्लड' वेगळे आहे. अशा कुठल्याही साधनातून संघ वाढत नाही. संघ वाढला तो कार्यकर्त्यांच्या आपआपसातील प्रेमामुळे आणि कार्यकर्त्यांना समाजाविषयी जी कळकळ असते त्यातून ते जे करतात, त्याच्यातून संघ वाढतो. त्यामुळे आता प्रसिद्धी असो, नसो किंवा विरोधही असो नसो, हे तर कोणीच बंद करू शकत नाही. बंदी आली तेव्हा स्वयंसेवक अशी चर्चा करायचे, संघावर बंदी आहे, पण बंद काही नाही. बंदीमुळे थोडा विस्कळीतपणा आला; तो अल्प काळात ठीक केला गेला. शाखा लागली नाही. तेव्हा कार्यकर्त्यांच्या चर्चेत म्हटले जायचे की, दोन माणसांचे भेटणे जोवर बंद होत नाही, तोवर संघ बंद होऊ शकत नाही. आजही ते वास्तव बदललेले नाही. आम्ही हे समजून घेतो की, यातून जावे लागणारच आहे. याचा आपल्यावर परिणाम होणार नाही. त्यामुळे हे सगळे होत राहिलं तरी आम्ही एकेक माणूस जोडतो, एकेक माणूस जोडत वाढत राहिलो. स्वयंसेवकांची श्रद्धा, विश्वास आणि त्यांची परस्पर आत्मीयता यातून सगळ्या प्रकारचे, सगळ्या स्वभावाचे लोक एकत्र काम करीत राहिले. तळमळीने करीत राहिले. म्हणजे संघावर आघात झाला तर आपल्या छातीवर ढाल बनून लोकांनी झेलला. आज तरुण भारताबद्दलही तेच म्हणता येईल. प्रतिकूलता असूनही संघ वाढला याचे कारण हेच. आता इथून हळूहळू अनुकूलता निर्माण व्हायला सुरुवातहोतेय.

**प्रश्न :** संघाचे स्वयंसेवक म्हणून तुम्ही लहानपणापासून तरुण भारत वाचत आहात. वैचारिक जडणघडणीत तरुण भारतचे काही योगदान आहे, असे तुम्हाला वाटते का? तरुण भारताविषयी तुमच्या काही आठवणी आहेत का?

**प. पू. सरसंघचालक:** निश्चितच आहेत. लहानपणी आमच्या घरी विचारणा होत असे की, तरुण भारत वाचला का? लहानपणी वैचारिक लेख वगैरे समजत नसत. पुढे जेव्हा विवेकानंदांची शताब्दी आली तेव्हा तरुण भारतात चार ओळी आल्या. त्याची मला चिकट वही करायला लावली गेली. कात्रणे वगैरे कापून ती वही मी केली. थोड्या काळानंतर स्मृतिमंदिराचे उद्घाटन झाले. तो भव्य सोहळा होता. मी तर लहान होतो. स्वयंसेवक होतो. त्यामुळे समजत नसले तरी एक भावनिक नाते होते. त्यावेळी तरुण भारतात दोन पाने भरून सगळा वृत्तांत, स्मृतिमंदिरातील चित्रे आली. त्यामुळे भावना आणि विचार दोन्हींच्या बाबतीत जे पोषण आहे, त्या पोषणाचा एक भाग आम्हाला तरुण भारताने दिला, हे निश्चित आहे आणि हे प्रत्येक स्वयंसेवक तुम्हाला सांगेल.

**प्रश्न :** श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे कार्याध्यक्ष अनिलजी दांडेकर यांनी आजच्या कार्यक्रमात तरुण भारतच्या पुणे आवृत्तीच्या लाँचिंगची घोषणा केली. एकेकाळी पुण्यातही तरुण भारत हे फार मोठे असे अग्रणी वृत्तपत्र होते. ते श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेतर्फे चालविले जात होते. त्या काळात आणिबाणीविरोधात जो लढा होता त्यात तरुण भारतचे मोठे योगदान होते. काही व्यवस्थापकीय कारणे आली आणि त्याचे प्रकाशन थांबले. आता पुन्हा श्री नरकेसरी प्रकाशनाच्या वतीने पुणे आवृत्ती सुरू करण्यात आली आहे. याचा एक हेतू असा होता की पुणे हे विद्येचे, विचारांचे माहेरघर आहे आणि तिथे आपली आवृत्ती असणे गरजेचे आहे. पुण्यातील घडामोडींचे पडसाद संपूर्ण देशभरात जाणवतात, असे आम्ही समजतो. अशा स्थितीत पुणे आणि त्या भागातील जे स्वयंसेवक आहेत किंवा संघ विचारांचे जे लोक आहेत, त्यांची तरुण भारतच्या संदर्भात काय भूमिका असली पाहिजे आणि आम्ही तिथल्या विस्ताराच्या दृष्टीने भविष्यात काय केले पाहिजे?



**प. पू. सरसंघचालक :** अनेक प्रकारच्या अडचणी येऊनही संघ वाढला. तेच तरुण भारतबद्दल म्हणता येईल. माझा आणि तरुण भारतचा संबंध घनिष्ठ आहे. आता पुण्यात तरुण भारतची आवृत्ती सुरू होत आहे, याचा आनंद वाटतो. तेथील स्वयंसेवकांना तरुण भारतबद्दल आपुलकी आहेच. ते सहकार्य करतीलच. वैचारिक प्रतिबद्धता आणि व्यावसायिक दृष्टिकोन अंगीकारून पुढे जाता येते, हे नागपूरच्या तरुण भारतने गेल्या काही वर्षांत सिद्ध केलेच आहे. वर्तमानपत्र कसे चालवायचे हे तरुण भारत परिवाराला कळते. त्याच पद्धतीने पुण्यातही वृत्तपत्राचे संचालन केल्यास ते यशस्वी होईल.

प्रत्येक माणसाने, प्रत्येक परिवाराने आणि समाजाने. त्यातून आचरणाद्वारे वातावरणात परिवर्तन होईल. ते करण्याची प्रत्येकाची शक्ती वेगवेगळी असते. एक विचार म्हणून त्याचा स्वीकार करतात, पण कृती करीत नाहीत. सध्या एवढे मात्र नक्की सांगता येते की, पंच परिवर्तन हे सगळ्यांना मान्य झालेले आहे. विशेषतः महिलावर्ग या बाबतीत पुरुषांच्या दोन पावले पुढेच आहे.

**प्रश्न :** पंच परिवर्तनाच्या अनुषंगाने भरपूर कार्यक्रम, उपक्रम झाले आणि होताहेत. पण, एकूणच मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि समाज माध्यमे यांनी पंच परिवर्तनाच्या संकल्पनेला कसा प्रतिसाद दिला आणि त्यांच्याकडून काही अपेक्षा आहेत का?



**प. पू. सरसंघचालक:** सोशल मीडियावर जवळजवळ प्रत्येक माणूस असतो. तो काही असा वेगळा भाग नाही. सोशल मीडिया ही एक टेक्नॉलॉजी आहे. त्याचा उपयोग चांगला करायचा तर त्याचा अंगीकार करावा लागेल. सोशल मीडियात पंच परिवर्तनाच्या कल्पनेला घेऊन निरनिराळ्या प्रकारचे रील्स, मीम्स अशा गोष्टी सुरू झाल्या. हे वाढेल हळूहळू. संघाचे स्वयंसेवकही सोशल मीडिया वापरू लागले आहेत आणि संघाच्या प्रचार विभागाच्या योजनेतूनही काही गोष्टी होताहेत. हे प्रमाण जसे वाढेल, तसा तिथेसुद्धा याचा स्वीकार होईल. त्याच्यामुळे सोशल मीडियाकडून अपेक्षा अशी नाही म्हणता येणार; पण तिथे आम्हाला सक्रियता वाढवावी लागेल.

**प्रश्न :** एकीकडे शिस्तबद्ध असलेली संघाची कार्यशैली... एकीकडे आपण संघटनेसाठी संघटना बांधत गेलो. आता दुसरीकडे समाजाला घेऊन पंच परिवर्तन करायचे आहे. संघटन आणि समाज परिवर्तन, मनुष्य निर्माण आणि मनुष्याला जागृत करणे या गोष्टी एकावेळी कशा शक्य होतील?

**प. पू. सरसंघचालक :** या दोन्ही गोष्टी एकावेळी झाल्या तरच परिवर्तन शक्य आहे. समाज परिवर्तन ज्यांना करायचे आहे, ते एका शिस्तीत नसले तर समाजाबरोबर ते वाहावत जातील किंवा ते बिघडतील आणि समाजालाही बिघडवतील. त्यामुळे ज्यांना समाज परिवर्तन करायचे आहे, त्यांची तयारी म्हणजे संघटन आणि जे संघटित झाले आहेत, त्यांनी ते संघटन स्वत:पुरता न ठेवता समाजाच्या हितासाठी त्याचा नित्यप्रति व्यवहारात उपयोग करून वागणे हे जागरणाचे काम झाले. हे दोन्ही एकावेळी झाले पाहिजे. म्हणून संघटनेकरिता संघटना ही सुरुवात आहे संघकार्याची; पण, त्या संघटनेचे एक विशिष्ट बळ तयार झाल्यानंतर आपोआपच स्वयंसेवक समाजाभिमुख होऊन काम करायला लागतो आणि त्यातून जे वातावरण निर्माण होते, त्यात मग समाजपरिवर्तनासाठी अशा छोट्या-छोट्या कृतींची समाजाला सवय लावणे, समाजाचे

**प्रश्न:** फेसबुक, इन्स्टाग्रामसारखी माध्यमे आज प्रभावी आहेत. विशेष म्हणजे ही माध्यमे सगळ्यांसाठी खुली आहेत. त्यावर कोणाचेच नियंत्रण नाही. ज्याला वाटते, तो त्याच्या मनानुसार व्यक्त होतो. पण, या माध्यमांकडे आपण दुर्लक्षही करू शकत नाही. त्यांची उपेक्षाही करू शकत नाही. दुर्दैवाने आज काही जहालवादी, अतिजहाल हिंदुत्ववादी विचित्र पद्धतीने व्यक्त होतात. नकळत अशावेळी अन्य लोकांचा समज होतो की, हे संघाचेच लोक आहेत. त्यामुळे समाज माध्यमांवर एक प्रकारचा गोंधळ निर्माण झालेला दिसतो. या माध्यमाचा संघासाठी आणि देशहितासाठी योग्य आणि सकारात्मक उपयोग करावा आणि व्यक्त व्हावेच. या दृष्टीने स्वयंसेवकांचे काही प्रशिक्षण करण्याची गरज आहे का किंवा या माध्यमांना नव्या काळात काही मार्गदर्शन करण्याची गरज आहे का?

**प. पू. सरसंघचालक :** गरज आहे आणि ते काम होतेही आहे. मीडिया इन्फ्लूएन्सर्स, यु ट्यूबर्स या सगळ्यांच्या बैठकी, त्यांच्या याद्या बनवणे, मधून मधून त्यांना बसवून विशेष मटेरियल देणे हे सगळं प्रचार विभागाने सुरू केले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून नवीन टेक्नॉलॉजी येते, नवीन साधने येतात. ही टेक्नॉलॉजी प्रत्येकाच्या हातात आहे. त्यांना थांबविण्याचे काम कोणी करू शकत नाही. आपला विवेक नीट असला पाहिजे. आपल्या शैलीत जी गोष्ट सांगायची, ती नीट सांगितली पाहिजे. '**सत्यं ब्रूयात प्रियं ब्रूयात, माम ब्रूयात सत्यम अप्रियम। प्रियंच नानृतम ब्रूयात।**' हे अनुशासन आहे. अनुशासन पाळून या सगळ्यांचे प्रशिक्षण करावे.

(पान ६ वर)


## रॅपिड फायर राऊंड...

**या मुलाखतीदरम्यान प. पू. सरसंघचालकांना काही वेगळ्या धाटणीचे प्रश्न रॅपिड फायर राऊंडच्या माध्यमातून विचारले गेले. ते असे...**

**प्रश्न :** तुमच्यावर सर्वाधिक प्रभाव कोणाचा?

**प. पू. सरसंघचालक :** प्रश्न कठीण आहे. पण नावच घ्यायचे तर गुरुजींचे घ्यावे लागेल. अगदी छोटे पुस्तकही प्रभाव टाकते.

लहान स्वयंसेवकही प्रभाव टाकतात. पण, एक व्यक्ती म्हणायची तर गुरुजीच. खरे तर संघात मी आलो ते त्यांच्या कार्यक्रमात बसल्याने. त्यांचा फार प्रभाव आहे.



**प्रश्न:** प्रशासकीय सेवेत किंवा 'व्हेटरनरी' क्षेत्रात संशोधन करूनसुद्धा आपल्याला देशसेवा करता येईल, असा विचार जीवनाच्या कुठल्या टप्प्यावर आला होता का?

**प. पू. सरसंघचालक :** व्हेटरनरी कॉलेजमध्ये असताना कळायचे की, संघात व्हेटरनरी डॉक्टर्स कमी आहेत. तीनच डॉक्टर्स होते. त्यांनी संघासाठी काम केले. परंतु, माझ्या जीवनात एक असा काळ आला की, मला संघकार्याशिवाय कशातच रस राहिला नाही. तेव्हा मी प्रचारक म्हणून निघालो.

**प्रश्न :** आज तुम्हाला झेड प्लस सुरक्षा आहे. त्यामुळे अशा अनेक गोष्टी असतील, ज्या तुम्हाला इच्छा असूनही करता येत नाहीत. तर अशा कोणत्या गोष्टी आहेत किंवा काही वेळासाठी सुरक्षा काढली आणि तुमची आठ नंबरची व्हेस्पा तुम्हाला पुन्हा दिली तर तुम्ही नागपुरात आपला वेळ कसा घालवाल?

**प. पू. सरसंघचालक :** तसे झाले तर सगळ्यांना पुन्हा भेटायला जाईल. पुष्कळ गोष्टी आहेत. देवळीचा जवसाच्या तेलातील कच्चा चिवडा खाता येत नाही. मला मोकळीक मिळाली तर पुन्हा एकदा सर्वांच्या भेटी घेईन.

**प्रश्न :** आता तुम्ही चिवड्याचा उल्लेख केला. जगभर आणि देशभर प्रवास करताना तुम्ही कोणत्या वैदर्भीय पदार्थाला सर्वात जास्त मिस करता?

**प. पू. सरसंघचालक :** मिरच्याची भाजी मिळत नाही आणि शिळ्या पोळीचे तुकडे कुटके म्हणतात ते मिळत नाहीत.

# मेगॅस्थेनिस आणि अद्भुत प्राणी




वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

भारताच्या इतिहास लेखनात परदेशातून आलेल्या प्रवाशांनी अगदी प्राचीन काळापासून मोलाची भर घातली आहे. अनेक परकीय प्रवाशांपैकी प्राचीन आणि सर्वात महत्त्वपूर्ण प्रवासी म्हणजे मेगॅस्थेनिस. इ. स. पूर्व ३२९-३२६ या काळात अलेक्झांडर राजाने भारताच्या उत्तर-पश्चिम भागासाठी अनेक दूत (उदाहरणार्थ राजा पोरससाठी क्लिओशेर) पाठविले. ग्रीस आणि भारताच्या दूतावासाची ही पायाभरणीच म्हणावी लागेल.

पहिल्या तीन ग्रीक राजदूतांपैकी मेगॅस्थेनिस हा एक महत्त्वपूर्ण दूत होता. चंद्रगुप्त मौर्याच्या राजदरबारात गेलेला हा पहिला राजदूत. सेल्युकस या राजा अलेक्झांडरच्या लष्करी सेनापतीने त्याला चंद्रगुप्त मौर्याच्या राजदरबारी पाठविले असे म्हणतात. यामुळे प्राचीन काळातले त्याने लिहिलेले 'इंडिका' हे भारताचे प्रवासवर्णन भारताच्या मौर्यकालीन प्राचीन इतिहासाचे अतिशय महत्त्वाचे साधन ठरते. असे नाही की फक्त मेगॅस्थेनिसनेच भारताबद्दल एवढ्या प्राचीन काळात लिहिले. खरे तर भारताबद्दल पहिल्यांदा स्कायलेक्सने एका मोहिमेच्या निमित्ताने लिहिले. त्याने सिंधू नदीच्या काठावरून प्रवास केला होता. पण मेगॅस्थेनिसचे महत्त्व अशासाठी की, याने पहिल्यांदा सिंधू नदी पार केली आणि त्याच्या प्रवास अनुभवांच्या आधारावर 'इंडिका' हे पुस्तक लिहिले.

प्राचीन काळाची भारताची समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, नागरी जीवन याचे तपशीलवार वर्णन मेगॅस्थेनिसच्या 'इंडिका'मध्ये केलेले आहेच. त्याबद्दल पुढील लेखांमध्ये लिहिले जाईलच. पण भारताचे प्राचीन प्राणिजीवन यावरही मेगॅस्थेनिसने अतिशय सुंदर भाष्य केलेले आहे. त्याने केलेली प्राण्यांची वर्णने केवळ रमणीय आणि अद्भुत नाहीत. ही वर्णने आजच्या वैज्ञानिकांसाठी चिंतनाचे विषय आहेत.

मेगॅस्थेनिसने भारताच्या शेतीकडेही लक्ष दिले आहे. तो म्हणतो, भारताची भूमी सुजलाम सुफलाम आहे. दरवर्षी दोन पिकांचे उत्पादन होते. पावसाळ्यात नद्या भरभरून वाहतात. तीळ, अळशी, इतर कडधान्ये, तांदूळ पावसाळ्यात तर बार्ली, गहू, डाळी हिवाळ्यात पेरली जातात. त्याच्या या वर्णनावरून प्राचीन काळात भारतात शेतीशास्त्र प्रगत होते, हा निष्कर्ष काढता येतो. कोणत्या महिन्यात कोणते धान्य घ्यायचे हे येथील शेतकऱ्याला ठाऊक होते.

मेगॅस्थेनिसने भारतातील पशुपक्ष्यांविषयी केलेली अनेक निरीक्षणे त्याच्या 'इंडिका' या ग्रंथात आहेत. ही वर्णने खरोखरंच अद्भुत आहेत. तो म्हणतो, सिंहापेक्षा दुप्पट आकाराचे वाघ भारतात अस्तित्वात आहेत. चार माणसांनी धरून पकडून ठेवलेल्या वाघाने सहज मागच्या एकाच पायाने खेचराला ओढत आणल्याची गोष्ट मेगॅस्थेनिसच्या मूळ पुस्तकात सांगितलेली आहे. तो म्हणतो की, येथे पाळीव प्राणी असा प्रकार बघायला मिळत नाही.

भल्यादांडग्या कुत्र्यांपेक्षा तेव्हाची माकडे आकाराने खूप जास्त मोठी होती. ती काळतोंडी माकडे पांढऱ्याशुभ्र वर्णाची होती. दोन गजांपेक्षा जास्तच त्यांच्या शेपटीची लांबी होती. विशेष म्हणजे ही माकडे कधीच माणसांना त्रास देत नसत आणि चोरीही करत नसत. त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला तर मात्र ही माकडे चवताळतात आणि वरून डोंगरावरून अचूक पद्धतीने दगडे भिरकावतात.

मेगॅस्थेनिसने पंख असणाऱ्या सापांचे सुंदर वर्णन केले आहे. दोन गज लांबीचे साप रात्री वटवाघळासारखे पंख फडफडवीत हवेत संचार करीत असत. त्यांचे घर्मबिंदू किंवा लघवीचे थेंब जर माणसाच्या त्वचेवर पडले तर विष पडल्यासारखी त्यांची त्वचा जळजळ करीत असे. तो म्हणतो, हे साप एवढे मोठे आहेत की एका वेळेस अख्खा बैलही ते गिळू शकतात. मेगॅस्थेनिसने हवेत उडणाऱ्या महाकाय विंचवांचेदेखील वर्णन केलेले आहे. शक्तिशाली कुत्र्यांचे त्याने सूक्ष्म वर्णन केले आहे. त्यांच्या नाकामध्ये पाणी घातल्याशिवाय ते तुम्हाला सोडणार नाहीत, असे तो म्हणतो. त्यांचे चावणे एवढे जोरकस असते की, त्या वेदनेने माणसाचे डोळेच खाली पडतात. एकदा मेगॅस्थेनिसने पाहिले, कुत्र्याने एकाच वेळी सिंह आणि बैलाला जखडून ठेवले होते. बैलाच्या नाकात वेसण घातली होती त्यामुळे कुत्र्याला दूर करण्याच्या आतच तो मरण पावला.

एकशिंगी घोड्याचेदेखील मेगॅस्थेनिसने मनोरम वर्णन केले आहे. त्याचे डोके हरणासारखे आहे. 'कारटाझोन' नावाच्या एकशिंगी प्राण्याचेही त्याने वर्णन केले आहे. त्याचे मऊसूत पिवळे केस आहेत. एकसंध हत्तीसारखे पाय आहेत. दोन डोळ्यांच्यामधून त्याचे तीक्ष्ण शिंग बाहेर आले आहे. हा प्राणी फक्त प्रणयराधनाच्या वेळेस मादीशी हितगुज करतो. पण बाकी वेळेस पूर्णवेळ एकांतात घालवतो. त्याला एकांत फार प्रिय आहे.

मेगॅस्थेनिसचे समुद्री प्राण्यांकडेही लक्ष होते. त्याला माश्याची एक प्रजाती माहिती होती. हा मासा पाण्याखालीच पोहायचा. मृत झाल्यावरच लाटांवरती यायचा. त्याला नुसता स्पर्श करण्याचा अवकाश, तो बेशुद्ध होऊन शेवटी मृत व्हायचा. मेगॅस्थेनिसने घोड्यांच्या प्रशिक्षणाबद्दल भरपूर लिहिले आहे. घोड्याला शिस्तीत ठेवण्यासाठी कुशल प्रशिक्षकाची आवश्यकता असते, असे त्याने म्हटले आहे. घोडेस्वाराचे कौशल्य कधी पणाला लागते? मेगॅस्थेनिस म्हणतो, जेव्हा रथाला चार घोडे जुंपले जातात आणि त्यांना एका रिंगणातून फिरवले जाते तेव्हा त्या घोडेस्वाराचे संपूर्ण कौशल्य पणाला लागते. युद्धात भाग घेणाऱ्या हत्तीच्या पाठीवर तीन वीर बसले असतात. दोन वीर दोन बाजूंनी मारा करतात तर मधला सैनिक मधोमध बाणाची दोरी खेचतो. हत्तीच्या पाठीमागे चाबूक घेऊन एक सैनिक उभा असतो जो हत्तीला योग्य दिशेने जायला प्रवृत्त करतो. मेगॅस्थेनिस म्हणतो की हत्ती, घोडे ही राजाची विशेष संपत्ती समजली जायची. नागरिक खाजगीमध्ये हत्ती घोडे पाळू शकत नसत. जंगली हत्तींचे पाळीव हत्तींमध्ये रूपांतर करण्याचे शास्त्र अतिशय प्रगत होते.

गाणी गाऊन, वाद्य वाजवून चवताळलेल्या जंगली हत्तींना शांत करण्याचे उपाय त्याकाळी माहीत होते. सुमधुर गाण्यांनी मुग्ध झालेला हत्ती पुन्हा जंगलात जायचा नाही. पकडण्याच्या वेळेस घायाळ झालेल्या हत्तीची जखम अगोदर कोमट पाण्याने धुतल्या जायची. त्यावर मऊशार लोणी चोळले जायचे. डोळे अधू झाले असतील तर गायीच्या दुधाने त्यावर उपचार केले जायचे. प्राण्यांना तीक्ष्ण संवेदना असतात. उपचार झाल्यावर जेव्हा डोळे किलकिले करून ते बघायचे, त्यांच्या आनंदाला पारावार नसायचा. एक अतिशय अद्भुत माहिती मेगॅस्थेनिसच्या 'इंडिका'मधून मिळते. हिमालयाच्या पूर्व भागात गिलगिट, लडाख, कारकोरम भागात डेरदाई जमातीत एका विस्तीर्ण पठारावर सोन्याच्या खाणी आहेत.

(पान ६ वर)





# रस्त्यावर राहणारी मुले:

## दिसणं आणि अदृश्य होणं

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर

शहरातील एखाद्या चौकात सिग्नल लागला की गाड्यांची रांग थांबते. त्या काही सेकंदांच्या थांब्यात एखादं लहान मूल गाडीच्या काचेजवळ येतं. कोणी फुलं विकतं, कोणी काच पुसण्याचा प्रयत्न करतं, तर एखादं मूल फक्त हात पसरून उभं राहतं. सिग्नल हिरवा होताच गाड्या पुढे निघून जातात आणि ते मूल पुन्हा रस्त्याच्या कडेला उभं राहतं. हा प्रसंग इतका रोजचा झाला आहे की, आता तो आपल्याला वेगळा वाटतही नाही.

रस्त्यावर राहणारी किंवा रस्त्यावर काम करणारी मुलं आपल्या समाजात दिसतात; तरीही ती अदृश्यच राहतात. आपण त्यांना पाहतो, पण त्यांच्या आयुष्याबद्दल विचार करण्यासाठी थांबत नाही. शहराच्या वेगवान जीवनात ही मुलं जणू दैनंदिन दृश्याचा एक भाग बनून राहिली आहेत. भारतासार'या मोठ्या आणि विषमतेने ग'स्त देशात रस्त्यावर राहणाऱ्या मुलांची सं'या नेमकी किती आहे, याचा अचूक आकडा सांगणं कठीण आहे. अनेक मुलं कोणत्याही अधिकृत नोंदीत नसतात. काही मुलं घरातून पळून आलेली असतात, काहींना घरच्यांनी सोडून दिलं असतं, काही स्थलांतरित कुटुंबांसोबत शहरात आलेली असतात, तर काहींचं कुटुंबच रस्त्यावर राहत असतं. परिणामी या मुलांचं अस्तित्व प्रशासनाच्या आकडेवारीतही अनेकदा दिसत नाही. रस्त्यावरचं बालपण म्हणजे केवळ दारिद्र्य नाही; ते असुरक्षिततेचं आयुष्य असतं. अशा मुलांना नियमित शिक्षण मिळत नाही, आरोग्यसेवा मिळत नाही आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यांना सुरक्षित वातावरण मिळत नाही. अपघात, आजार, हिंसा, व्यसन, शोषण यांचा धोका त्यांच्या आयुष्यात कायम असतो. अनेक मुलं दिवसातून काही रुपये मिळविण्यासाठी लहान-मोठी कामं करतात, तर काहींना भीक मागण्यास भाग पाडलं जातं. रस्त्यावर वाढणाऱ्या मुलांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचं सामाजिक एकटेपण. त्यांच्याकडे आधार देणारं कुटुंब नसतं किंवा असलं तरी ते स्वतःच संघर्ष करीत असतं. अशा परिस्थितीत मुलांना बालपणातील मूलभूत गोष्टी- प्रेम, सुरक्षितता, शिक्षण आणि खेळ- यापैकी बरंच काही गमवावं लागतं. या पृष्ठभूमीवर भारतात मुलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे आणि योजना अस्तित्वात आहेत. शिक्षणाचा हक्क कायदा, बालमजुरी विरोधी कायदे तसेच बालसंरक्षणासाठीची विविध संस्थात्मक व्यवस्था या सर्वांचा उद्देश मुलांचं सुरक्षित आणि सन्मानजनक बालपण सुनिश्चित करणं हा आहे. बालसंरक्षणासाठी जिल्हा स्तरावर यंत्रणा उभारण्यात आली आहे तसेच अडचणीत असलेल्या मुलांसाठी मदतीची व्यवस्थादेखील उपलब्ध आहे. तथापि, प्रत्यक्ष वास्तव अनेकदा वेगळं दिसतं. रस्त्यावर राहणाऱ्या मुलांपर्यंत या व्यवस्था पोहोचवण्यात अनेक अडचणी येतात. या मुलांचा स्थिर पत्ता नसतो, कुटुंबाची माहिती उपलब्ध नसते आणि अनेक वेळा त्यांच्याशी संपर्क साधणंही अवघड असतं. परिणामी प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांना एकत्रित प्रयत्न करावे लागतात. या प्रश्नाकडे पाहताना सम ाजाची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. रस्त्यावरची मुलं ही केवळ 'भिकारी' किंवा 'काम करणारी' म्हणून पाहणं चुकीचं आहे. ती सर्वप्रथम मुलं आहेत; ज्यांना सुरक्षितता, शिक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. समाजाने त्यांच्या अस्तित्वाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर जबाबदारीच्या भावनेने पाहणं गरजेचं आहे. शिक्षक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, पोलिस यांच्यासह सामान्य नागरिकही या प्रकि'येत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

एखाद्या मुलाला मदतीची गरज आहे हे ओळखणं, योग्य संस्थांशी संपर्क साधणं किंवा अशा मुलांविषयी संवेदनशीलता निर्माण करणं या छोट्या वाटणाऱ्या कृतीही मोठा बदल घडवू शकतात. रस्त्यावर वाढणाऱ्या मुलांच्या प्रश्नांकडे पाहताना आणखी एक गोष्ट लक्षात घेणं आवश्यक आहे. ही मुलं समस्या नाहीत; समस्या आहे ती त्यांना या परिस्थितीत ढकलणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेची. दारिद्र्य, स्थलांतर, कौटुंबिक अस्थिरताआणि सामाजिक विषमता या अनेक घटकांमुळे मुलं रस्त्यावर येतात. म्हणूनच या प्रश्नाचंसमाधान केवळ तात्पुरत्या उपाययोजनांमध्ये नाही, तर दीर्घकालीन सामाजिक बदलांमध्ये आहे. शिक्षण, सामाजिक सुरक्षा, स्थलांतरित कामगारांच्या कुटुंबांसाठी सुविधा आणि बालसंरक्षण यंत्रणेची प्रभावी अंमलबजावणी या सर्व गोष्टी एकत्रितपणे काम केल्याशिवाय परिस्थिती बदलणं अशक्य आहे.

(पान ६ वर)





कथा

सई देशपांडे

आकाशाच्या व्यापक निळाईचा ध्यास मला पंखात बळ असेल तर सोबत चल उत्तुंग शिखरांचं वेड मला रानसावली सोडू शकत असशील तर सोबत चल दरी खोऱ्यात स्वच्छंद गात फिरण्याचा नाद मला सखे सोबती सोडू शकत असशील तर सोबत चल मुसळधार पावसात भिजत उडण्याची जिद्द मला घरट्याची ऊब सोडू शकत असशील तर सोबत चल नदी सोबत उडून समुद्राच्या अथांगतेला अनुभवायचं उद्दिष्ट मला स्वत्व विसरू शकत असशील तर सोबत चल काटे कुंपणे तोडून उडण्याचे बळ मला अडकवू पहात नसशील तर सोबत चल...'

डायरीची पानं चाळताना ४० वर्षांपूर्वी लिहिलेली ही कविता त्याच्या नजरेस पडली. त्याने तिला पाठवलेल्या शेवटच्या पत्रात ही कविता होती... श्रीधर आणि माधवी कॉलेजमध्ये असताना अभ्यासात, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, वादविवाद स्पर्धा असो की एनसीसीचे कार्यक्रम; दोघेही नेहमी हिरीरीने भाग घ्यायचे. नॅशनल लेव्हलपर्यंत कॉलेजसाठी बरीच पदकं-ट्रॉफीज त्यांनी जिंकून आणली होती. तो काळ त्याच्या नजरेसमोर उभा राहिला...

ती अतिशय नाजुक, अबोल, स्त्रीसुलभ सौंदर्याने समृद्ध! तो तिच्या पूर्णपणे उलट. तितकाच फटकळ, रांगडा, मस्ती करण्याच्या सगळ्या सीमा गाठणारा. अर्थात सीमेपलीकडे जात नसे. कारण त्यावर घरचे मध्यमवर्गीय पठडीतले मजबूत संस्कार... आज तिचा ४० वर्षांनंतर फोन आला. ती भारतात येणार होती आणि काही कामाने याची तिला भेट घ्यायची होती. तो दिवस त्याला अजूनही स्पष्टपणे आठवत होता, ज्या दिवशी त्याने देशप्रेम ाखातर समाजकार्यासाठी स्वतःला झोकून देण्याची प्रतिज्ञा घेतली. माधवीच्या मनातल्या भावना त्याला कळत होत्या; पण त्याने नेहमी दुर्लक्षच केलं. त्याला संसार थाटायचाच नव्हता. शेवटी माधवीनेच एक दिवस पत्रात मनातलं लिहून पाठवलं; त्यावर त्याने ही कविता तिला उत्तर म्हणून पाठवली आणि तिच्या लक्षात आलं हे प्रकरण वेगळं आहे. त्यानंतर मात्र तिने कधीच त्याला कॉन्टॅक्ट केला नाही.

'आज ४० वर्षांनंतर असं काय काम पडलं असेल तिला?' या विचारातच त्याने ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली. सूर्य पश्चिमेला झुकला होता. रम्य संध्याकाळ होती. जसजशी गाडी पुढे जात होती, आसपासची झाडं दाट दाट होत होती. गाडी फाटकातून आत घेताना ड्रायव्हरने त्याला आवाज दिला, ''साहेब आपण पोहोचलो.'' त्याने मान वर उचलून काचेतून बघितलं. सूर्यनमस्कार करतानाचे पुतळे बाऊंड्रीला लावलेल्या हिरव्यागार मैदानाच्या बाजूने गाडी आत जात होती.

इमारतीच्या मुख्य दाराजवळ ड्रायव्हरने गाडी थांबवली. धरमपालने अदबीने गाडीचं दार उघडलं. ''का हो धरमपाल? सब बढ़िया हावंय?'' गाडीतून उतरताना त्याने धरम पालला छत्तीसगढी भाषेत हालहवाल विचारले. बोलता बोलता दोघेही त्याच्या खोली जवळ पोहोचले. ड्रायव्हरने त्याचं सामान खोलीत ठेवलं. धरमपालने उद्याच्या गणतंत्र दिवसाच्या कार्यक्रमाचे डीटेल्स लिहिलेले कागद त्याला दिले. त्याने खिडकीतून बाहेर बघितले... झेंडावंदनाची, सांस्कृतिक कार्यक्रमाची आणि परेडची व्यवस्थित तयारी धरमपालने मैदानात करवून घेतली होती. हे छत्तीसगडच्या बस्तर संभागातलं एक छोटसं आदिवासी गाव होतं.

इथे आधी नक्षलवाद्यांनी धुमाकूळ घातला होता. या सगळ्या आदिवासींना कधी फूस लावून कधी धमकावून नक्षलवादी गिरोहात सामील व्हायला लावायचे. पण श्रीधरने आणि त्याच्या संस्थेने या लोकांना त्यांचं भलं कशात आहे हे समजावून, त्यांच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी, आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांच्या सोबत जंगलात राहून काम केलं. घोटुल हे आदिवासींच्या मुलामुलींना जीवनोपयोगी कला, त्यांच्या प्रथा शिकवण्याचं एक स्थान असतं. मुलं-मुली १३-१४ वर्षाचे झाले की, घोटुलमध्ये राहायला जातात. तिथेच आपले जीवनसाथी निवडतात आणि मग आई-वडील त्यांचं लग्न लावून देतात. या नव्या पिढीला चांगले संस्कार आणि शिक्षण देणं अत्यंत गरजेचं आहे. आता या गावात एक शाळा, कॉलेज, छोटा दवाखाना आणि आदिवासींच्या घोटुलला लागूनच हे श्रीधरच्या संस्थेचं मोठ्ठं मैदान असलेलं कार्यालय! इथे कुठल्याही गावकऱ्याला जी हवी ती मदत मिळायची. शेतीचे नवनवीन प्रयोग, वेगवेगळे उद्योग सुरू करण्यासाठी लागणारे आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण दिलं जायचं. त्याची ही संस्था संपूर्ण भारतात कार्यरत होतीच; परदेशांतही त्याच्या कामांचं कौतुक होतं.

उद्या माधवीला त्याने इथेच बोलावलं होतं. तिला आणि तिच्या सहकारी डॉक्टर्सना इथल्या गावांमध्ये वैद्यकीय क्षेत्रात काय करता येईल, याचा अभ्यास करायचा होता. सकाळी झेंडावंदन, शाळाकॉलेजच्या मुलांची पीटी, परेड, घोटुलचा सांस्कृतिक कार्यक्रम सगळं श्रीधर, माधवी आणि तिच्या सोबत आलेल्या अमेरिकन डॉक्टर्सच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. दुपारच्या जेवणात खास छत्तीसगढी प्रकार होते. माधवीला घोटुल बघायचं होतं म्हणून धरमपालची वाट बघत श्रीधर आणि माधवी हॉलमध्येच थांबले.

''कसा आहेस...?'' सकाळपासून सगळे सोबत असल्याने दोघांमध्ये कामासंबंधीच चर्चा झाल्या होत्या. आता दोघे निवांत आहेत बघून माधवीने हळव्या आवाजात विचारले.

''समाधानी...! मला समाजातले जे दुःख दिसत होते ते बऱ्यापैकी कमी झाले आहे.''

''आधीपेक्षा खूप रोड झालास.'' ''भारतभर फिरावं लागतं बाई... वजनासोबत फिरणं तब्येतीला परवडणार नाही-'' म्हणून हसला...

''मध्यंतरी तुला बरं नाही कळलं होतं. दोन मोठी ऑपरेशन्स झालीत. आता काही त्रास नाही नं?'' ''माझ्या मागे ही कामं आहेत तोपर्यंत मला काही होणार नाही गं... काळजी करू नकोस. तुझं सांग.. नवरा काय करतो? मुलं किती मोठी? काय करतात?'' ती फक्त हसली.

''काय झालं?'' तिचं स्मित हास्य बघून त्याने विचारलं.

''काटे कुंपणे तोडून उडण्याचे बळ मला अडकवू पहात नसशील तर सोबत चल...''

''आठवतं? तू पाठवलेल्या शेवटच्या पत्रात हे लिहिलं होतंस. तुला नं अडकवता तुझ्या सोबत चालले आहे. मी पण लग्न केलं नाही. समाजकार्यात झोकून दिलंय स्वतःला. फक्त भारतात थांबले नाही. इथे तुझ्या सोबत कार्य केलं असतं तर एकमेकात गुरफटण्याची भीती होती. तुला अडकवायचं नव्हतं म्हणून बोस्टनहून एमएसडब्ल्यूची डिग्री घेऊन तिथेच वैद्यकीय क्षेत्रात काम सुरू केलं.'' तिचे हे वाक्य ऐकून त्याला काय बोलावे सुचेना. किती मोठा त्याग केला होता तिने त्याच्यासाठी. पण तो त्याच्या प्रतिज्ञेने बांधला गेला होता.

बराच काळ निघून गेला होता. काही क्षण दोघेही शांत बसून होते. ''काका-काकू कसे आहेत?'' तिने शांतता तोडायचा प्रयत्न केला. ''दोघेही नाहीत...'' ''कधी?''''बाबा चार वर्षांपूर्वी आणि आई गेल्या वर्षी...'' आधीच माधवीबद्दल कळल्याने हळवा झालेला श्रीधर आई-वडिलांच्या आठवणीने अजूनच हळवा झाला...''आई गेली तेव्हा मी मणिपूरच्या जंगलांत होतो. ती अचानक सीरियस झाली आणि गेली. मी तिला भेटूसुद्धा शकलो नाही-'' म्हणत त्याने मान खाली घातली. दोन्ही तळवे डोळ्यांवर ठेवत त्याने अश्रू लपवायचा प्रयत्न केला.

तिने टेबलावरचा पाण्याचा ग्लास त्याच्या हातात दिला. ती काय समजावू शकणार होती; असं आयुष्य त्याने स्वतःच निवडलं होतं. आज समाजाच्या तळागाळात त्याच्या कार्याच्या पाऊलखुणा होत्या. त्याच्या संस्थेंतर्गत अनेक संस्था, शिक्षण, आरोग्य, व्यवसाय क्षेत्रात कार्यरत होत्या. मोठमोठी हॉस्पिटल्स बांधली होती. समाजाच्या या उत्थानात त्याने स्वतःच्या पारिवारिक जीवनाचा खूप मोठा त्याग केला होता. त्याने पाणी पिलं आणि क्षणभर डोकं मागे टेकवलं. तिने फक्त शांत बसून त्याला साथ दिली. काही संवाद शब्दाशिवाय जास्त प्रभावी, बोलके असतात.

तितक्यात धरमपाल आला...''चलो साब'' ऐकताच दोघेही उठून उभे झाले आणि श्रीधर घोटुलकडे वळला. माधवीने पण त्याने दाखवलेल्या पायवाटेवर पावलं टाकली! राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही अशीच एक संस्था आहे; ज्यातील स्वयंसेवक आणि कार्यकर्ता तळागाळात जाऊन समाज उत्थानाचं कार्य निःस्वार्थपणे करत राहतात. त्यातही प्रचारक तर जीवन समाजासाठी श्रीधरसारखेच समर्पित करतात. आजची ही कथा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला त्यांच्या शताब्दी पूर्तीनिमित्त समर्पित आहे.

## नमस्ते सदा वत्सले मातृभूमे!



# तत्त्वज्ञानाचा उदय

**तत्त्वज्ञान हा एक सामासिक शब्द असून तो 'तत्त्व' आणि 'ज्ञान' या दोन शब्दांपासून बनलेला आहे. यातील 'तत्त्व' हा शब्दसुद्धा स्वतः मूळ शब्द नसून 'तत्' आणि 'त्व' अशादोन शब्दांच्या संधीतून तयार झाला आहे. तत् या शब्दाचा अर्थ 'ते' असा असून 'त्व' हा शब्द 'पणा' किंवा 'ता' या अर्थाने आलेला आहे.**

तत्त्वदर्शन **डॉ. राजेंद्र डोळके**

मनुष्याच्या जीवनात कोणत्याही गोष्टीचा आरंभ हा 'स्व' पासून असतो. स्व म्हणजे आपण स्वतः. 'स्वतः'ला वेगळे करून 'स्व'ची स्वतंत्र अशी एकही स्थिती नसते. त्यामुळे मनुष्याच्या कोणत्याही विचारांचा आरंभबिंदू हा तो स्वतःच असतो. तो स्वतः वगळून जगातील इतर काहीही, इतकेच काय पण बाकीचे सारे जगही, आरंभबिंदू होऊ शकत नाही. कारण मी स्वतः आहे म्हणूनच सारे जग आहे. मीच जर नसेल तर जग आहे किंवा नाही हा प्रश्नच संभवत नाही. या 'मी'चा ज्यावेळी त्याने विचार सुरू केला, त्यावेळी त्याच्यासमोर एक त्रिपुटी उभी राहिली. हे 'मी' म्हणजे काय? त्याचा या बाहेरच्या विश्वाशी संबंध काय? आणि या बाहेरच्या विश्वाचे तरी स्वरूप काय? म्हणजेच जीव, जगत आणि जगदीश यांच्या स्वरूपाचा आणि त्यांच्या परस्पर संबंधाचा शोध असा प्रश्न मानवाला अगदी सुरुवातीपासून पडला. त्याचा त्याने शोध घ्यावयास सुरुवात केली. येथूनच तत्त्वज्ञानाचा उदय झाला. तत्त्वज्ञानाचे कार्यही हेच आहे.

तत्त्वज्ञान हा एक सामासिक शब्द असून तो 'तत्त्व' आणि 'ज्ञान' या दोन शब्दांपासून बनलेला आहे. यातील 'तत्त्व' हा शब्दसुद्धा स्वतः मूळ शब्द नसून 'तत्' आणि 'त्व' अशा दोन शब्दांच्या संधीतून तयार झाला आहे. तत् या शब्दाचा अर्थ 'ते' असा असून 'त्व' हा शब्द 'पणा' किंवा 'ता' या अर्थाने आलेला आहे. यावरून 'तत्त्व' या शब्दाचा अक्षरशः अर्थ 'तत् पणा' 'तत् ता' किंवा 'ते पणा' असा होतो. त्याचे भाववाचक नाम तयार होते. 'तत्'चा वाच्यार्थ 'ते' असाच आहे. परंतु फार पुरातन काळापासूनच 'ते' म्हणजे 'ब्रह्म' असा अर्थ लक्षणारूढ झाला. वैदिक वाङ्मयात 'तत्' (म्हणजे 'ते') या शब्दाचा उल्लेख फार सर्रास पद्धतीने झालेला आढळतो. हा शब्द 'ब्रह्मा'करिता जेथे तेथे वापरलेला आढळतो.

'तत्त्वमसी' म्हणजे 'ते (ब्रह्म) तूच आहेस.' या वाक्यावरून आपल्या हे लक्षात येते. अशारीतीने 'तत्त्व' म्हणजे 'ब्रह्मत्व' (अंतिम सत्य) असा प्रघात पडून तो घट्ट झाला. अंतिम सत्याप्रमाणेच सत्व, सत्यवस्तू, बीजभूत ज्ञान, निर्णायक सिद्धांत वगैरे आणखीही शब्द तत्त्व या शब्दाकरिता पुढे रूढ झाले.

तत्त्व या शब्दाकरिता अत्यंत सोपा, प्रचलित आणि एकच शब्द सांगायचे झाल्यास 'मूळ' अथवा 'सारभूत अंश' असा सांगता येईल. 'द्राक्षासव' या टॉनिकमध्ये द्राक्ष हे मूळ असते. त्यात आकर्षक दिसण्यासाठी रंग, लहान मुलांनी आवडीने प्यावे म्हणून गोड पदार्थ, पेय बरेच दिवस टिकावे म्हणून काही रसायने वगैरे इतरही अनेक पदार्थ मिसळलेले असतात. पण त्याचा मुख्य उद्देश द्राक्षरस पोटात जाणे हाच असतो. म्हणून 'द्राक्षासव'चे मूळतत्त्व अथवा सारभूत अंश द्राक्ष हेच असते. त्याचप्रमाणे विश्वाच्या मुळाशी जे तत्त्व असते त्याचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान. परंतु आज इतर अनेक शब्दांप्रमाणेच 'तत्त्वज्ञान' या शब्दाचेही सूक्ष्म कंगोरे झिजत जाऊन व्यवहारात तो शब्द कमालीचा बोथट झाला आहे.

कुठेही व कसाही तो ढोबळमानाने वापरण्यास सुरुवात झाली आहे. उदा. मी फार तत्त्वज्ञानी माणूस आहे, चोरांचीही काही तत्त्वे असतात, ज्याला काही तत्त्वे नाहीत त्याच्यात आणि जनावरांत काही फरक नसतो अशी वाक्ये आपल्या कानांवर सतत येत असतात. यांसारख्या वाक्यात आलेला 'तत्त्व' हा शब्द इंग्रजीतील 'प्रिन्सिपल' या शब्दाच्या अर्थाचा असतो. या शब्दांप्रमाणेच स्वातंत्र्य, समता, बंधुत्व इत्यादी तत्त्वे; धर्मतत्त्वे, नीतितत्त्वे, अर्थशास्त्रातील मागणी-पुरवठा तत्त्व, सामाजिक तत्त्वे वगैरे अनेक शब्दप्रयोगांत 'तत्त्व' या शब्दाचा मनमुराद वापर होत असताना दिसतो.

एकंदरीत तत्त्व हा शब्द अतिव्यापक झाला आहे. मनुष्य ज्या वेळेला 'माझे तत्त्वज्ञान' असे म्हणतो त्यावेळेला त्याने त्याच्या अनुभवविश्वातून त्याला पटलेल्या काही विशिष्ट गोष्टींचा स्वीकार केलेला असतो. कारण त्यावर त्याचा ठाम विश्वास बसलेला असतो. अमका मनुष्य गांधीवादी, आंबेडकरवादी अथवा मार्क्सवादी आहे असे जेव्हा आपण म्हणतो त्यावेळी त्याने या थोर लोकांनी सांगितलेली तत्त्वे हीच अंतिम सत्य म्हणून स्वीकारलेली असतात. धर्म, अध्यात्म, विज्ञान, संस्कृती, परंपरा, नीती या क्षेत्रात सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती, साधनशुचिता, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, माणुसकी यांसारखी अनेक मूल्ये सांगितलेली असतात. मनुष्य यातून त्याला जी पटली ती तत्त्वे अथवा मूल्ये स्वीकारतो आणि यातून त्याचे स्वतःचे तत्त्वज्ञान तो तयार करतो. हे तत्त्वज्ञान म्हणजे त्या व्यक्तीचा विश्वाकडे पाहताना, त्याला अनुभवातून आलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावताना बनलेला एक विशिष्ट दृष्टिकोन असतो. हा अन्वयार्थ लावताना त्याची विचारसरणी आपोआप बनत जाते. मुद्दाम अभ्यासाने त्याला ती बनवावी लागत नाही तर अनुभवाने व चिंतनाने ती बनत असते. 'माझे तत्त्वज्ञान' या शब्दप्रयोगात हाच अर्थ अनुस्यूत आहे. या न्यायाने जेवढ्या व्यक्ती तेवढी तत्त्वज्ञाने होऊ शकतात. ही तत्त्वज्ञाने किती वेगवेगळी, परस्परविरोधी आणि दियुख करणारी असू शकतील, याबद्दल एका तत्त्वज्ञाचे मत फार बोलके आहे. सुप्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ व गणिती देकार्त याच्या मते आपण कितीही चमत्कारिक, मूर्खासारखा अगदी विश्वास न बसण्याजोगा विचार मनात आणला तरी तो केव्हा ना केव्हातरी कोणत्यातरी तत्त्वज्ञाने मांडलेलाच असतो. देकार्तसारख्या सूक्ष्म विचारवंताचा हा निर्वाळा आहे. त्याच्यानंतर (१७ वे शतक) मूर्खता आणि अविश्वसनीयता अशा विचारांत पुष्कळच वाढ झाली असल्यामुळे अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानांमध्ये व तत्त्वज्ञांचीही वाढ झाली आहे, हे ओघानेच आले. आपल्याकडे अशा तत्त्वज्ञांची फार थोर आणि समृद्ध अशी परंपरा आहे. तत्त्वज्ञानाचा म्हणजेच मानव आणि सृष्टी यांच्याबद्दलच्या अंतिम सत्याचा शोध घेण्यात त्यांनी आपले आयुष्य खर्च केले. एका अर्थाने आयुष्यभर त्यांनी त्याचे ध्यानच केले. म्हणून तत्त्वज्ञानात्मक चिंतनाला ध्यानाचा दर्जा देण्यात आला आहे. गौतम बुद्ध, महावीर, प्लेटो यांच्या तत्त्वचिंतनाला 'ध्यान' असे म्हटले गेले आहे.

आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक म्हणून समजल्या जाणारा रेने देकार्त याने त्याच्या मूलभूत ग्रंथाला 'चिंतने' असेच नाव दिले आहे. अशा प्रकारच्या चिंतनातून तत्त्वज्ञांचे स्वतःचे तत्त्वचिंतन निर्माण होते. परंतु ते त्यांचे स्वतःचे न राहता सर्व जगाचे होते आणि ते त्यांच्या नावानिशी प्रसिद्ध होते. बुद्ध, मार्क्स, गांधी, कांट, हेगेल यांच्या तत्त्वज्ञानावरून हे लक्षात येते. यांचे चिंतन हे ज्ञानक्षेत्राच्या साठ्याचा अमूल्य भाग बनते. या सर्व चिंतनाचा अंतिम प्रश्न हा विश्वाची उत्पत्ती आणि गूढ येथपर्यंत पोहोचतो. त्याचे उत्तर अजूनही मानवाला सापडलेले नाही. या संपूर्ण विश्वाचे मूळ काय? विश्व बनलेले आहे काय? असल्यास कशापासून? कोणी निर्माण केले? सभोवार दिसणाऱ्या या विश्वाचा आणि माझा काही संबंध आहे का? या सर्व जडचेतन पदार्थांचा कोणी नियंता आहे की नाही? असल्यास त्याचे स्वरूप कसे आहे? इत्यादी अनेक प्रश्नांनी फार प्राचीन काळापासून मानवी मनात मोठी खळबळ उडवून दिली. त्याने मानवी नियंत्रणात नसलेल्या अशा असंख्य घटनांचा विचार करण्यास सुरुवात केली आणि येथूनच तत्त्वज्ञानाचा आरंभ झाला. सारांश जीव, जगत आणि परमेश्वर या विषयांचे गूढ आणि त्यांचा परस्परसंबंध शोधून काढणे हाच तत्त्वज्ञानाचा शास्त्रीय अर्थ आहे आणि हेच तत्त्वज्ञानाचे कार्य आहे.

पान १ वरून

## अंधश्रद्धेचा वासनांध खेळ

भोळ्या समाजाचा त्याने अभ्यास केला आणि त्यांना फसवून त्यांचे शोषण कसे करता येईल, यात मास्टरकी मिळवली. या फसवणुकीमध्ये अनेक प्रशासकीय अधिकारी सामील असल्याचे म्हटले जाते. काही भ्रष्टाचार्यांनी त्यांचे काळे पैसे पांढरे करण्यासाठी मग अशोकलाच हाताशी घेतले, असेही म्हटले जाते. अर्थात, पुढेमागे ते सगळे उघड होईलच. या सगळ्या प्रकरणात हिंदू धर्माचा द्वेष करणारे बिनकामाचे बेकार लोक, यानिमित्ताने फारच चेकाळले आहेत. जणुकाही अशोक खरातला सगळ्या हिंदू समाजानेच गुरू मानले की, काय अशा आविर्भावात ते सोशल मीडियावर हिंदू धर्माची निंदा करत आहेत. ते असे मत व्यक्त करतात की, 'हिंदू धर्मात हे असेच चालते.' तर, या सगळ्यांना एकच सांगणे आहे की, हिंदू मग तो गरीब असो की श्रीमंत, तो कोणत्याही जातीचा असू दे, तो अशोक खरातच्या विकृत, घाणेरड्या आणि मानवतेला कलंक फासणार्या कृत्याचे समर्थन करत नाही, त्याला पाठीशी घालणार नाही. दुसरे असे की, राज्यात 'अंधश्रद्धा-निर्मूलन कायदा' आहे पण, त्या कायद्याची जागृती नाही. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये याबाबत काम करणारी यंत्रणा हवी. मुळात काय श्रद्धा, काय अंधश्रद्धा हे समजण्याची कुवत समाजात हवी. देवधर्म-श्रद्धा हे ठीक आहे; पण देवाचे दैवत्व जिवंत माणसात आहे, असे समजून त्याच्याकडून शोषण करवून घेणे, हा देवाचा-धर्माचा अपमान आहे. याबाबत निःस्पृह जागृती समाजात व्हायलाच हवी. असे ढोंगी नराधम आपल्या परिसरात आहेत का? यावर समाजातील सज्जनशक्तीने बारीक लक्ष ठेवायला हवे. कारण, याच नराधमामुळे समाज आणि संस्कृती बदनाम होते, उद्ध्वस्त होते.

# रामदूत अतुलित बलधामा

**भारतीय संस्कृतीच्या विशाल पटावर हनुमंत हे एक असे अलौकिक व्यक्तिमत्व आहे, जे शक्ती आणि भक्ती या दोन टोकांच्या बिंदूंना एकाच ठिकाणी जोडते. 'रामदूत अतुलित बलधामा' हे स्तुतिसुमन, हनुमंताच्या त्या विराट स्वरूपाचे वर्णन आहे, ज्याने काळाच्या ओघात कोट्यवधी मानवांना जगण्याचे बळ दिले. आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत असलेल्या युगात हनुमंतांचे चरित्र समाजासाठी केवळ पूजनीयच नव्हे तर ते आचरणीय ठरते. महाराष्ट्रातील संतांनी हनुमंताला आपल्या साहित्यातून अत्यंत जिवंतपणे उभे केले आहे.**

प्रासंगिक **श्रीकांत तिजारे**



जगद्गुरू संत तुकाराम महाराज जेव्हा हनुमंताला साकडं घालतात, तेव्हा त्यात एक आर्तता आणि पूर्ण शरणागती असते. '**शरण शरण हनुमंता । तुज आलो रामदूता । काय भक्तीच्या त्या वाटा । मज दाखवी रे चोखटा ।।**' तुकोबांच्या या ओळींमधून हनुमंताचे 'रक्षक' आणि 'मार्गदर्शक' हे रूप प्रकर्षाने जाणवते. दुसरीकडे, समर्थ रामदास स्वामींनी समाजाला समर्थ करण्यासाठी हनुमंताच्या 'भीमरूपी' शक्तीचा जागर केला. समर्थांनी हनुमंताच्या अफाट वेगाचे आणि सामर्थ्याचे वर्णन करताना म्हटले आहे. '**कोटीच्या कोटी उड्डाणे झेपावे उत्तरेकडे। मंदाद्रीसारिखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें ।।**' समर्थांना अभिप्रेत असलेला हनुमंत हा आळस झटकून कामाला लागणारा, समुद्रासारखी संकटे एका झेपेत ओलांडणारा 'प्रयत्नवादी' देव आहे.

आजच्या तरुणाईलाही याच'कोटीच्या कोटी उड्डाणांची' गरज आहे, जेणेकरून ते आपल्या ध्येयप्राप्तीसाठी आकाशाला गवसणी घालू शकतील. भक्तीच्या नऊ प्रकारांमध्ये 'दास्य भक्ती'ला विशेष महत्त्व आहे. स्वतःचे अस्तित्व पूर्णपणे आपल्या आराध्याच्या चरणी विलीन करणे म्हणजे दास्यत्व. हनुमंत हे या दास्यभावाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत.

लंकेचा विजय असो वा द्रोणागिरी पर्वत उचलून आणण्याचे कठीण कार्य, प्रत्येक पराक्रमानंतर हनुमंताची भूमिका ही मी रामाचा दास आहे, अशीच राहिली. या दास्यभक्तीचे सर्वांत भावूक दर्शन घडते ते रामाने हनुमंताला दिलेल्या आलिंगनातून. जेव्हा हनुमंत सीतेची वार्ता घेऊन परतले, तेव्हा प्रभू रामाकडे त्यांना देण्यासाठी कोणतेही भौतिक रत्न नव्हते. रामाने हनुमंताला घट्ट मिठीत घेतले. ते आलिंगन म्हणजे एका भक्ताच्या निःस्वार्थ सेवेला मिळालेली ईश्वरीय पावती होती. आजच्या श्रेय घेण्याच्या आणि अहंकाराच्या युगात, हनुमंतांचा हा निरहंकारी सेवाभाव आपल्याला शून्य होण्यातच खरे पूर्णत्व आहे, हे शिकवतो. आजच्या उपासकांसाठी हनुमंतांची उपासना ही केवळ स्तोत्रपठणापुरती मर्यादित नसावी. खऱ्या अर्थाने हनुमंतरायांचे गुण अंगी बाणवायचे असतील, तर 'मन, मनगट आणि मेंदू' या तिघांचे संतुलन साधणे आवश्यक आहे.

मन, नामात रंगलेले आणि स्थिर मन, जे कोणत्याही प्रलोभनाला बळी पडत नाही. मनगट, अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि दुर्बलांच्या रक्षणासाठी वज्रदेही सामर्थ्य. मेंदू, 'बुद्धिमतां वरिष्ठम्' असे ज्यांना म्हटले जाते, त्या हनुमंतांनी संकटात आपल्या बुद्धीचा आणि चातुर्याचा वापर करून मार्ग काढला. लंकेत प्रवेश करताना त्यांनी बदललेली रूपे हे त्यांच्या अफाट बुद्धिमत्तेचेच लक्षण होते. महनुमंत हे 'संघटना' बांधण्याचे प्रतीक आहेत. वानरसेनेला संघटित करून अन्यायाविरुद्ध उभे करणे, हे त्यांचे मोठे सामाजिक कार्य होते. आज समाजात जेव्हा विखंडन दिसते, तेव्हा हनुमंतांचे संघटनकौशल्य आणि निष्ठा आपल्याला दिशा दाखवू शकते. जो सामर्थ्याचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी न करता लोककल्याणासाठी करतो, तोच खरा हनुमंत भक्त! हनुमंत हे काळाच्या मर्यादा ओलांडून आजही तितकेच प्रासंगिक आहेत. ते केवळ एका कोपऱ्यात शेंदूर लावून पुजण्याचे दैवत नसून, ते आपल्या रक्तात संचारणारे चैतन्य व्हायला हवे. जेव्हा आपण हनुमंताचे स्मरण करतो, तेव्हा आपल्यातील भीती नष्ट होऊन 'अतुलित बळाचा' संचार व्हायला हवा.सामर्थ्य, समर्पण आणि दास्यभक्तीचा महामेरू म्हणजेच रामदूत अतुलीत बलधामा.

**परराष्ट्र संबंधांमध्ये काळे-पांढरे रंग नसतात. तेथे फक्त करडा रंग असतो. कधी ज्या देशावर टीका केली, त्याच्याशी वेळप्रसंगी मैत्रीचे संबंधही जोडावे लागतात. एकाच वेळी दोन्ही युद्धमान देशांशी मैत्रीचे संबंध राखण्याची कुशल कला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साधली आहे. हे न कळण्याची समज असलेली काँग्रेस मोदी यांच्यावर बिनबुडाची टीका करताना दिसते. मोदींची परराष्ट्रनीती ही काँग्रेसप्रमाणे देशातील मतपेढीच्या राजकारणावर आधारित नसून देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी अशीच!**

# 'पर'राष्ट्र संबंधांतील 'आपले'पणा

वेध **प्रतिनिधी**



परराष्ट्र धोरणाची सर्वात सोपी व्याख्या आणि उद्देश म्हणजे आपल्या देशाचे हितसंबंध सुरक्षित राखणे. जगातील सर्व देश याच तत्त्वावर चालतात. आपल्या देशाचे हितसंबंध काय आहेत आणि ते कशाप्रकारे सुरक्षित राखता येतील, हे त्या-त्या वेळचे सरकार निश्चित करते. इराण- अमेरिका युद्धामुळे जगात खनिज तेलाच्या पुरवठ्याचा तुटवडा भासत असून, दिवसेंदिवस हा प्रश्न उग्र होत चालला आहे. तरीही, भारतात मात्र पेट्रोल-डिझेलचा तुटवडा जाणवत नसून त्यांचे दरही स्थिर आहेत. हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचाच हा मोठा विजय. हे कळण्याची बौद्धिक क्षमता नसलेले काँग्रेसचे करंटे नेतृत्व मात्र मोदींच्या परराष्ट्र धोरणावर अनाकलनीय टीका करीत आहे. रशिया-युक्रेन युद्धाप्रमाणेच इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका या युद्धाचाही भारताशी कसलाही संबंध नाही. रशिया-युक्रेन युद्धाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर तितकासा परिणाम होत नव्हता. मात्र, काहीही संबंध नसताना इराण-इस्रायल युद्धाची झळ भारतासह निम्म्या जगालाही सहन करावी लागत आहे. याचे कारण, या युद्धामुळे आखाती देशातील खनिज तेलाचे उत्पादन आणि पुरवठा बंद पडत चालला आहे. ज्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगातील ४० टक्के तेलाचा पुरवठा होतो, ती खाडीच इराणने बंद करून टाकली आहे.

इराणच्या या आक्रमक धोरणामुळे युरोपातील देशांमध्ये इंधनाचे दर झपाट्याने वाढत चालले आहेत. चीन हा इराणचा समर्थक देश असल्याने त्याला इराणकडून काही प्रमाणात तेलपुरवठा सुरू आहे. पण, सर्वात कठीण अवस्था भारताची झाली आहे. एका हिंदी म्हणीनुसार, 'खाया-पिया कुछ नहीं, ग्लास फोडा बारा आना' अशी भारताची गत. या युद्धाशी भारताचा कसलाही संबंध नसतानाही त्याला आपल्या गरजेचे तेल व नैसर्गिक वायू मिळणे अवघड झाले. कारण, इराणने होर्मुझमार्गे होणारी खनिज तेल व नैसर्गिक वायूची वाहतूक बंद पाडली. असे असले, तरी भारतात इंधनाचे दर अजूनपर्यंत वाढविण्यात आलेले नाहीत. 'सीएनजी' या गॅसच्या दरांमध्ये वाढ झाली असली, तरी ती अटळ होती. पण, स्वयंपाकाच्या गॅसचे दरही स्थिर आहेत. त्याचा तुटवडा जरी भासत असला, तरी तो लवकरच पूर्ववत होईल. याचे कारण, हा गॅस भरलेले दोन मोठे टँकर नुकतेच भारतात दाखल झाले आहेत. ही किमया घडली आहे ती पंतप्रधान नरेंद्र मोदी व परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या उत्कृष्ट परराष्ट्र नीतीमुळेच!

काँग्रेसने मोदींच्या परराष्ट्र धोरणावर टीका करणे हे असमर्थनीय. याचे कारण, काँग्रेसच्या राजवटीत परराष्ट्रनीती ही काँग्रेसच्या देशांतर्गत मतपेढीच्या राजकारणावर ठरत असे. दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या सर्वात मोठ्या दहशतवादी हल्ल्यानंतरही तत्कालीन मनमोहन सिंग सरकारने पाकिस्तानविरोधात बोटसुद्धा उचलले नव्हते. पाकिस्तानला केलेली निव्वळ कागदपत्रांची देवाण आणि कठोर शब्दांत टीका, हे होते काँग्रेसचे परराष्ट्र धोरण. किंबहुना, हा हल्ला देशातील रा. स्व. संघासारख्या हिंदुत्ववादी संघटनांनी केला असल्याचा प्रचार काँग्रेस करण्यास तयार होती. उलट, उरी असो की, पुलवामा, तेथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ले केल्यावर मोदी सरकारने पाकिस्तानवर 'सर्जिकल स्ट्राईक्स' करून दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. त्यासाठी अमेरिका किंवा जागतिक समुदायाची परवानगी मागितली नव्हती. गतवष पहलगाम येथे २६ हिंदू पर्यटकांचे हत्याकांड केल्यावर तर मोदी सरकारने 'ऑपरेशन सिंदूर' हे छोटेखानी युद्धच छेडले आणि चार दिवसांत पाकिस्तानी हवाई दलाचे कंबरडे मोडले. परिणामी, पाकिस्तानला युद्ध समाप्तीसाठी भारताची याचना करावी लागली होती.

देश अतिशय बिकट परिस्थितीत सापडला असताना, या परिस्थितीचा आपल्या राजकीय लाभासाठी वापर करण्याचे संकुचित, खरेतर नीच राजकारण काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांनी चालविले आहे. जगातील अन्य देश, अगदी आपल्या आसपासच्या देशांतील परिस्थिती पाहिली आणि तिची भारतातील परिस्थितीशी तुलना केली, तरी मोदी यांचे परराष्ट्र धोरण किती यशस्वी ठरले आहे, ते कोणाही विवेकी व्यक्तीस पटेल.

काँग्रेसची अधिकृत भूमिका मोदींना अडचणीत आणण्याची असून, त्यासाठी या पक्षाचे प्रवक्ते मोदी यांच्यावर वाटेल ते बिनबुडाचे आरोप करीत आहेत. मोदी अडचणीत आले, तर आपल्याला राजकीय लाभ मिळेल, अशी या पक्षाचे सर्वेसर्वा असलेल्या राहुल गांधी यांची समजूत असावी. तरी, काँग्रेसमध्ये हाताच्या बोटावर मोजता येतील, असे काही नेते आहेत; ज्यांची विवेकबुद्धी अजूनही शाबूत आहे. त्यात खासदार शशी थरूर आणि खासदार मनीष तिवारी यांचा समावेश होतो.

मोदी यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येबद्दल अमेरिका-इस्रायल यांच्यावर टीका केली नाही, यावरून काँग्रेस व अन्य मुस्लीम मतवादी पक्षांनी मोदी यांच्यावर टीका केली होती. पण, आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये काहीवेळा मौन हीच सर्वोत्तम रणनीती असते, ही गोष्ट थरूर यांना चांगलीच ठाऊक आहे. थरूर यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात एक वरिष्ठ नोकरशहा म्हणून बरीच वर्षे व्यतित केल्याने त्यांना परराष्ट्र धोरणाचे नियम ठाऊक आहेत. म्हणूनच, त्यांनी खामेनी यांच्या मृत्यूबद्दल मोदी सरकारने बाळगलेल्या मौनव्रताचे समर्थन केले. थरूर यांच्या परराष्ट्र संबंधांतील अनुभवाचा लाभ मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर घेतला होता. या युद्धासंदर्भात भारताची भूमिका जगाला पटवून देण्यासाठी जगभरात पाठविलेल्या खासदारांच्या शिष्टमंडळात त्यांनी थरूर यांचा समावेश केला होता, तो त्यासाठीच!

इराणने भारताविरोधात अनेकदा भूमिका घेतली असली, तरी मोदी यांनी त्याला फारसे महत्त्व दिलेले नाही. मोदी यांनी इराणशी असलेले संबंध संतुलित राखले. त्यामुळे या युद्धाच्या धामधुमीतही त्यांचा आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचा इराणच्या नेतृत्वाशी सातत्याने संपर्क सुरू आहे. किंबहुना, मोदी सरकारने नुकतीच एक विमान भरून वैद्यकीय मदत इराणला रवाना केली. मोदी यांच्या भूमिकेमुळे भारतात इंधनाचे व गॅसचे टँकर येत आहेत. भारताचे, म्हणजे त्यातील सामान्य माणसाचे हितसंबंध राखणे, हाच मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा गाभा आहे. त्याचे दर्शन सध्याच्या या बिकट काळात देशाला घडत आहे, हे लक्षात घ्यायला हवे!

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

# पृथु वैन्य



**तत्त्वज्ञान हा एक सामाजिक शब्द असून तो 'तत्त्व' आणि 'ज्ञान' या दोन शब्दांपासून बनलेला आहे. यातील 'तत्त्व' हा शब्दसुद्धा स्वतः मूळ शब्द नसून 'तत्' आणि 'त्व' अशा दोन शब्दांच्या संधीतून तयार झाला आहे. तत् या शब्दाचा अर्थ 'ते' असा असून 'त्व' हा शब्द 'पणा' किंवा 'ता' या अर्थाने आलेला आहे.**

आपण ज्या ग्रहावर जन्माला आलो आणि वावरतो आहोत, त्याचं नाव आहे 'पृथ्वी'! हे अतिशय बाळबोध आणि सामान्य वाक्य आहे. पण या ग्रहाला अतिशय प्राचीन कालापासून भारतीयांनी पृथ्वी हे नाव दिलं आहे. आपल्या पूर्वजांची एक सवय अतिशय वाखाणण्याजोगी आहे. ते विशेषणांचंच नाव तयार करतात. त्या त्या व्यक्तीचं किंवा वस्तूचं सर्वात महत्त्वाचं लक्षण किंवा गुणधर्म ज्यातून व्यक्त होतो ते असं नाव द्यायचं. साधं उदाहरण म्हणजे 'भा' डोळे दिपवणारं 'तेज.' ते जो निर्माण करतो तो 'भास्कर'! किंवा जो आकर्षित करून घेतो तो 'कृष्ण'! हाच नियम आपल्याला संस्कृत आणि त्यातून निर्माण झालेल्या इतर भारतीय भाषांत लागू होतो. त्यामुळे आपल्याकडच्या प्रत्येक नावाला अर्थ असतो. मग साहजिकच लेखाच्या पहिल्या वाक्यात आलेल्या 'पृथ्वी' या नावाचा अर्थ काय? असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचं उत्तर आहे राजा पृथुनं जिचं दोहन केलं ती पृथ्वी! कोण हा राजा पृथु? याची कथा महाभारत, विष्णुपुराण, भागवतासह सर्वात विस्तृतपणे येते ती पद्मपुराणात.

श्रीविष्णूंच्या नाभी कमलातून उत्पत्ती झालेल्या ब्रह्मदेवाच्या स्वायंभुव मनुच्या वंशात जन्मलेल्या उत्तानपाद = ध्रुव = शिष्टि = रिपु = चाक्षुष मनु = कुरु = अंग = अशी वंशावळ देण्यात आलेली आहे. या अंगराजाची राणी होती. मृत्युदेवता यम आणि धूमोर्णेची कन्या सुनीता. तिला वेन नावाचा अत्यंत दुराचारी मुलगा झाला. वेन राजा झाल्यानंतर त्यानं केलेल्या अत्याचारांचा प्रजेनं तीव्र विरोध केला. त्याला पदच्युत करत त्याचा वध केला.

मृत्युसमयी तो निपुत्रिक होता. म्हणून ऋषी मंडळींनी त्याच्या मांडीचं मंथन केलं. त्यात एक काळा बुटका विद्रूप पुरुष उत्पन्न झाला. ते वेन राजानं केलेल्या पापकर्माचं मूर्तरूप होतं. हा 'निषद (बसून राहा)'. यानं विंध्याचलाच्या परिसरात बस्तान बसवलं. त्याचेच वंशज पापनाशक निषाद म्हणवले गेले. त्यानंतर वेनाच्या उरलेल्या निष्पाप- अनघ देहाच्या उजव्या बाहूचं मंथन केल्यावर पराक्रमी पृथु प्रकटला. मातेशिवाय याचा जन्म झाला म्हणून तो 'अयोनिज' म्हणवला जातो. याच्या जन्माच्या वेळी ब्रह्मदेवानं त्याला 'अजगव' नावाचं धनुष्य दिलं होतं. वेनाचा पुत्र म्हणून पृथु 'वैन्य' गादीवर बसला. अतिशय प्रजाहितदक्ष आणि पराक्रमी असल्यामुळे विष्णूचा अंशावतार मानण्यात येत होतं इतकी त्याची लोकप्रियता शिगेला पोहोचली होती. ही माहिती जाणीवपूर्वक इथे दिलेली आहे. प्रत्येक भारतीय व्यक्तीला स्वतःच्या किमान सात पिढ्या माहिती असायला हव्यात म्हणून या पृथुच्या नऊ पिढ्या इथे दिलेल्या आहेत. शिवाय यमराजदेखील चांगले विवाह वगैरे झालेले मुलं बाळं, जावई, नातवंडं-पतवंडं गणगोत असलेले गृहस्थ होते.

तिसरा मुद्दा असा की, राजसत्ता आणि प्रजा यांच्यातल्या संघर्षात विजय नेहमीच प्रजेचा होतो. महाबलाढ्य राजे- महाराजे, योद्धे किंवा देवांचे यश, कीर्ती आणि वंशावळ गाणारे, स्तुतिपाठक अधिकारी म्हणून ओळखले जाणारे सूत आणि मागध म्हणतात ही 'पृथु सत्यवक्ता, दानशील, दिलेल्या वचनांची पूर्तता करणारा, शूरवीर आणि समस्त सद्गुणांनी परिपूर्ण असा चक्रवर्ती राजा आहे!' तो राज्यकर्ता झाल्यानंतर त्याच्या समोरचा सर्वात गंभीर प्रश्न होता तो म्हणजे भूमी भरड झाली होती. सर्वत्र दुष्काळ पडला होता. सर्वत्र केवळ वैराण भकास रखरखीत, गवताचं एक पातंदेखील उगवत नाही अशी परिस्थिती. एकूण भूमी रुसली होती. अशा रुसलेल्या धरणीच्या शोधार्थ पृथु निघाला. त्याच्या हाती असलेल्या धनुष्याचं नाव होतं 'अजगव'. तो येतो आहे असं कळल्यावर धरणीनं भयभीत होत गायीचं रूप घेतलं आणि ती सैरावैरा पळू लागली. स्वर्ग-मृत्यूपाताळ तिन्ही लोकांत तिला कोणीच आश्रय दिला नाही. अखेर ती पृथुला शरण आली. तिनं गाय स्वरूपात स्वतःचं दोहन करण्याची अनुमती पृथुला दिली. त्यानं भूमीचं दोहन करून पुन्हा एकदा तिला उर्वरा केलं. पृथुनं जिचं दोहन केलं अशी या अर्थानं भूमीला 'पृथिवी' (अर्थ : विस्तीर्ण, प्रसारित किंवा व्यापक) असं संबोधन मिळालं. या गोष्टीतली प्रतीकात्मकता बघा. पृथुला देण्यात आलेलं 'अजगव' हे धनुष्य अज (बकरी) आणि गव (बैल) यांच्या शिंगांपासून बनवलेलं होतं.

ओसाड नापीक भूमीवर बकरी, शेळी, मेंढी, गाय, बैल या सारख्या प्राण्यांच्या मलमूत्राचा प्रचुर प्रमाणात वापर केला की, काही काळानंतर ती भूमी सुपीक होते. शेतीसाठी धरणी सपाट, विस्तीर्ण आणि सुपीक असावी लागते. राजा पृथुनं शेतीसाठी लागणारी कसदार जमीन करण्याचं तंत्र शोधून काढलं. तिचं शोषण न करता दोहन करून अधिकाधिक सकस पीक कसं घेता येईल, याचं शास्त्र सिद्ध केलं. म्हणून त्याच्या नावावरून आपल्या पूर्वजांनी या भूमीला 'पृथ्वी' असं नाव देण्यात आलं.

पृथु जेव्हा सम्राट झाला तो काळ सुवर्णयुगाचा होता. त्यावेळी ब्रह्मदेवानं या ब्रह्मांडाला अनेक राज्यांत विभाजित केलं. त्या प्रत्येक राज्याला त्याचा त्याचा प्रशासक देऊन नियंत्रण आणि पर्यवेक्षण करणारी यंत्रणाच उभी केली. (विष्णु पुराण - अध्याय २२, अंश १). उदाहरणार्थ सोम = ग्रह नक्षत्र, ब्राह्मण, झुडपं, यज्ञ तपस्या. विष्णु= बारा आदित्य; पावक= अष्ट वसू; इंद्र = मरुत आणि पूर्व दिशा; कुबेर = देवांच्या धनकोष, राजांच्या स्वामी आणि उत्तर दिशा. वरुण = जल आणि पश्चिम दिशा. दक्ष= प्रजापती; यमधर्म= पितृलोक आणि दक्षिण दिशा, प्रह्लाद = दैत्य आणि दानव; कपिल = सर्व ऋषी, सर्व अचल वस्तू = हिमवान, प्लक्ष (पिंपळ) = वृक्ष. गरुड = पक्षी, ऐरावत = हत्ती, उच्चैश्रवस= अश्व, वृषभ = शाकाहारी पशू. सिंह = मांसाहारी पशू. हे वर्णन वाचल्यानंतर याच काळात या विश्वाच्या व्यवस्थापनाची घडी बसवण्यात आली असं दिसतं. तर, असा हा चक्रवर्ती सम्राट पृथु वैन्य. शेती शास्त्र आणि प्रशासन व्यवस्था निर्माण करणारा कीर्तिरूप उरलेल्या आपल्या पूर्वजाची आठवकथा!

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

# लाळानौसाचं गोंदनं...



भाषा नदीसारखी असते. भाषा तुडुंब भरून वाहणाऱ्या नदीसारखी असली, तरच जिवंत राहत असते. नदीला जसे विविध प्रवाह समृद्ध करीत असतात तसेच विविध लोकभाषांचे लहान-मोठे प्रवाह भाषेची नदी शब्दसमृद्ध करीत असतात. नदीला येऊन मिळणारे लहान- मोठे प्रवाह क्षीण झाले, आटले तर नदीदेखील क्षीण होत असते, आटत असते, कोरडी होत असते. मूळ भाषेला समृद्ध करणाऱ्या लोकभाषा क्षीण झाल्या की भाषेचा प्रवाह क्षीण होत जातो, आटत जातो.

शब्दांची समृद्धी ही भाषेची संपत्ती परभाषेचा नित्य स्वीकार करणे म्हणजे सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित असणे वाटू लागल्याने त्यांनी सर्वप्रथम आपल्या बोलीचा बळी दिला. हा वर्ग सर्व प्रकारच्या सत्तांच्या केंद्रस्थानी असल्याने शोषित-वंचित-पीडित मागासलेल्यांनी त्यांचे अनुकरण केले. परिणामी प्रथम बोली आणि नंतर सार्वत्रिक असणारी भाषेतील शब्दसंपत्ती मुठीतून वाळू निसटत जावी तशी हळूहळू नष्ट होत गेली, लोकमनातून निसटून गेली.

'गोंदण' या शब्दाला लोकजीवनाचे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ आहेत. या शब्दाला झाडीपट्टीत 'गोदव्ऽना' आणि वऱ्हाडीत 'गोंदनं' म्हणतात. भारतासह जगातील अनेक देशांमध्ये अंगावर गोंदवून घेण्याची चीन प्रथा- परंपरा आहे. गोंदवण्याचे करणे सारखेच असते. आपल्या पोटच्या पोरीला आयुष्यात सुख मिळावे म्हणून जीव पाखडणारा बाप तिच्या अंगावर लाडाने आणि नवसानेही गोंदवून घेतो. बीजवाई करताना जमीन नितांत सुंदर दिसते. गोजिरवाण्या पहिल्या लेकीसारखी धरती बीजवाईच्या गोंदणासारख्याच खुणांनी नितांत सुंदर दिसते. असे अर्थाचे आभाळ विठ्ठल वाघांनी गोंदण शब्दाला आंदण दिले आहे. ना. धों. महानोरांनी 'चांदणगोंदण' या सुरेख शब्द लोकवाणीतूनच घेतला आहे. **'चिंब पावसानं रान झालं आबादानी झाकू कशी पाठीवरली चांदणगोंदणी...'** चांदणं काळ्या आकाशात सुंदर दिसतं आणि गोऱ्या देहावर निळं गोंदण सुरेख दिसतं. ओल्या देहावरचे निळेशार गोंदण ओल्या कपड्यातून क्षणात दिसते, क्षणात दिसत नाही, ओला देह ओले वस्त्र असल्याने तिला पाठ झाकता येत नाही.

चांदण्यांसारखे पाण्याचे थेंब आणि निळ्या गोंदणाचा गोरा देह काहीही झाकून ठेवता येत नाही. 'चांदणगोंदण' हा शब्द आता क्वचितच वापरला जातो. गोंदणाची नक्षी देहावर चांदणं फुलवत असे. महानोरांनी त्यांच्या एका कवितेत गालावरच्या गोंदणाचा संदर्भ आला आहे. **'ती संसारी मालन गोरी, नितळ निळ्या डोळ्यांची गालावर गोंदण इवलेसे, मंद मधुर बोलीची'** मुलगी लहान असताना तिच्या गालावर गोंदण करण्याची लोकरीत आपल्याकडे होती. तिळाएवढे किंवा थोडे मोठे गोंदण मुलीच्या गालावर करण्यामागचे संदर्भही वेगवेगळे होते. मुलगी झाली तर देवीच्या दर्शनासाठी येईल आणि गोंदवून घेईल, असा नवसही असायचा तर लेकीला दृष्ट लागू नये म्हणून गालावर गोंदवले जायचे. 'बिलोरी हातांना मोराचं गोंदण' असे शब्द महानोरांच्या कवितेत आहेत. बांगड्या भरलेल्या हातांवर मोराची नक्षी असायची. 'गोंदलेला हात, मऊ टापटिपीचा टापटिपीचा बोटातल्या बोलिचा..'

असते. आज मराठी भाषेतील शब्दसंपत्तीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शब्द विस्मरणात जाणे, शब्द लुप्त होणे, शब्द भाषेतून हद्दपार होणे आणि असे सारे प्रकार म्हणजे शब्दांच्या मृत्यूपूर्वीची स्थिती होय. शब्दांच्या मृत्यूंच्या घटना भाषा मरणपंथाला लागली असण्याचे पहिले चिन्ह होय. मराठी भाषेतील कितीतरी शब्दांचा मृत्यू झाला आहे हे मराठी भाषा बोलणाऱ्या प्रत्येक माणसाने समजून घेण्याची गरज आहे.

'गोंदण' या सुंदर शब्दाचे अस्तित्वच अलिकडे नाहीसे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. साऱ्या जगात टॅटूचे अक्षरशः फॅड आहे. त्यामुळे गोंदवण्याच्या कृतीला प्रतिष्ठा आणि ग्लॅमर प्राप्त झाले आहे. याला महाराष्ट्र अपवाद नाही. महाराष्ट्राने टॅटू स्वीकारला आणि गोंदण शब्द मृत्युपंथाला लागला. बोलीतला अस्सल शब्द ओठांवर असला की, आपण फार मागासलेले आहोत, असे वाटू लागल्याने आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्यांनीही बोलीतील असंख्य शब्दांच्या अकाली मृत्यूंकडे कानाडोळा केला. आर्थिक सुस्थितीत असणाऱ्या वर्गाला आपली बोली नष्ट करीत अनेक प्रकार आहेत तसेच अनेक विधीही आहेत. अंगावरचे गोंदण ही कुलचिन्हांची दृश्यभाषाही आहे. काही समुदायांनी गोंदणाला निषिद्ध मानले आहे काहींनी फार पवित्र समजले आहे. इसवी सन पूर्व दोन हजार वर्षांची परंपरा असणाऱ्या गोंदणाचे नाते सौंदर्यसाधनेसह अंधश्रद्धांशीही आहेच. कवी- लेखकांनी गोंदण या शब्दाला काव्यमय संदर्भ बहाल केले आहेत. कवी विठ्ठल वाघ यांच्या 'तिफन' या कवितेत गोंदण या लोकवाणीतील शब्दाचे आशयघन उपयोजन केले आहे. **'काकरात बिजवाई जसं हासरं चांदनं.. धरतीच्या अंगोपांगी लाळानौसाचं गोंदनं..'** आपल्याकडे लाडाने, कौतुकाने बालपणी किंवा केव्हाही मुला-मुलींच्या अंगावर गोंदवून घेण्याची प्रथा आहेच. नवसपूर्तीसाठीही गोंदण केले जाते. विठ्ठल वाघांच्या कवितेतला आशय फार भावपूर्ण आहे. खरं तर शेतकऱ्यांसह आपण सारेच धरतीची- काळ्या आईची लेकरं आहोत. भूमिपुत्र असणारा शेतकरी बापाने मुलीचे मायेने- ममतेने संगोपन करावे त्या पितृतुल्य भावनेने धरतीचे एकप्रकारे संगोपनच करतो. प्राणपणाने मशागत करणे आणि प्राणपणाने संगोपन

(पान ६ वर)

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# निसर्गरम्य श्रीक्षेत्र बदामी



श्री क्षेत्र बदामीला जाण्याचा अलिकडेच मला योग आला. बदामी येथील श्री शाकंभरी देवी आमची कुलदेवता असल्याने यापूर्वीही अनेक वेळा या ठिकाणी जाण्याचा आणि दर्शनाचा योग आला होता. पण यावेळची अनुभूती काही औरच होती. मातेचे मंदिर खूपच सुंदर सजवले होते. सगळीकडे स्वच्छता होती आणि अतिशय प्रसन्न वातावरण होते. बदामी येथे एक दिवस मुक्काम केला आणि तेवढ्या वेळात देवीच्या त्रिवार दर्शनाचा योग आला. गाभाऱ्यात उभे राहून अतिशय जवळून दर्शन झाले. नंतर समोरील सभामंडपात बसून देवीचे निवांत दर्शन घेतले. सुदैवाने भाविकांची फारशी गर्दी नसल्याने देवीचे दर्शन खूपच शांत आणि निवांतपणे घेता आले.

पूर्वीच्या विजापूर आणि आताच्या बागलकोट जिल्ह्यात हे निसर्गरम्य आणि पवित्र ठिकाण आहे. हुबळी रेल्वेस्टेशनपासून फक्त आठ किमीच्या अंतरावर हे ठिकाण आहे. सोलापूर- गदग रेल्वे मार्गावर बदामी स्टेशन आहे. या स्टेशनवर फारसा गजबजाट किंवा गोंगाट नसतो. इथून देवीच्या मंदिराकडे जाण्यासाठी अनेक प्रकारच्या वाहनांची सोय आहे. बदामी हे तालुक्याचे ठिकाण असून येथील बाजारपेठ मोठी आहे. भाविकांच्या सोयीसाठी अनेक हॉटेल्स, लॉजेस उपलब्ध आहेत. बऱ्याचशा हॉटेलमध्ये यात्रेकरूंना अत्यंत कमी दरात जेवण, नाश्ता मिळू शकतो. अन्य जीवनोपयोगी वस्तूंच्या किमतीही बऱ्यापैकी कमी आहेत. बदामी येथील शाकंभरी देवीचं हे मंदिर अतिशय पुरातन आहे. याची दगडी बांधणी पाहताक्षणीच नजरेत भरते. या मंदिराचा अनेकदा जीर्णोद्धार करण्यात आल्याचे सांगितले जाते. शके ६०३ (इ.स. ६८१) मध्ये या मंदिराचा पहिला जीर्णोद्धार करण्यात आला असावा असा अंदाज केला जातो. मंदिराच्या आवारात एका खांबावर केलेल्या कोरीव कामात राष्ट्रकूट काळातील राजांची नावे कोरली आहेत. त्यावर कानडी भाषेत १०१९ या वर्षाचा उल्लेख असून त्या काळी युद्धात पराक्रम गाजवलेल्या राष्ट्रकूट घराण्यातील राजा भीमदेव याच्या सैनिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या स्तंभाची निर्मिती करण्यात आली. सकाळी या मंदिरातील देवीला जेव्हा स्नान, पंचोपचार आणि अभिषेक इत्यादी नित्यपूजा केली जाते, तेव्हा आपल्याला अतिशय सुंदर अशा शाकंभरी मातेच्या सिंहारूढ भव्य मूर्तीचे दर्शन घडते. देवी अष्टभुजा असून मूर्ती सालंकृत आहे. देवीच्या उजव्या हातामध्ये खडग, डमरू आहे. गळ्यामध्ये हार असून अंगाखांद्यावर विविध अलंकार आहेत. मस्तकावर नावरत्नांचा मुकुट भगवतीने परिधान केला आहे. मुद्रा अत्यंत प्रसन्न आहे. गाभाऱ्यासमोर कासव आहे. शाकंभरी मातेची ही मूर्ती काळ्या पाषाणातून घडवली आहे. मूर्ती इतकी सुंदर आहे की त्यावरून नजर हटत नाही. या नित्यपूजेच्या वेळी मंत्रोच्चाराच्या गजरात पुजारी देवीला उष्णोदकाचे जे स्नान घालतात ते पाहण्यासारखे असते. त्यानंतर मूर्तीला चंदनाचा लेप लावला जातो. सर्व भाविकांनी भक्तिभावाने आणलेल्या साड्या देवीला अशा कौशल्याने पुजारी नेसवतात की आपण बघतच राहतो. देवीच्या मंदिराभोवती विशाल असे आवार आहे. या आवारात उभ्या असलेल्या दोन भव्य दगडी दीपमाळा आपले लक्ष वेधून घेतात. मंदिराभोवती तटबंदी आहे. आतील बाजूला ओवर्या आहेत तसेच प्रदक्षिणा आणि पालखी सेवेसाठी मोकळी जागा आहे. प्रदक्षिणेच्या मार्गावर केदारेश्वर, हनुमान, सहदेव, श्रीचक्र ही मंदिरे आहेत. मंदिराच्या बाहेरच्या बाजूला भक्तांच्या निवासासाठी खोल्या बांधलेल्या आहेत. मंदिराभोवतीचा परिसर अतिशय निसर्गरम्य असून नारळ, केळी, सुपारी, नागवेली, चिंच आदी झाडांनी वेढलेला आहे.

मंदिरासमोर दगडी बांधकाम केलेले सुंदर असे हरिद्रातीर्थ आहे. मंदिराच्या बाहेर पूजा साहित्याची भरपूर दुकाने आहेत. त्याचप्रमाणे त्या भागात ऋतूनुसार उपलब्ध असणार्या फळांची रेलचेल पाहायला मिळते. आरती, पूजा इ. नित्योपचार झाल्यानंतर दुपारी साडे बारा ते दोन या वेळेत भक्तांसाठी प्रसादाची व्यवस्था केली जाते. शाकंभरी मातेला गव्हाची खीर आणि पुरणाचे कडबू हे पदार्थ प्रिय आहेत. तेथील नैवेद्यात आणि प्रसादात या पदार्थांचा समावेश अवश्य असतो. शाकंभरी देवीचा नवरात्रोत्सव पौष शुद्ध अष्टमी ते पौर्णिमेपर्यंत साजरा केला जातो. या काळात भाविकांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी असते. दरवर्षी वैशाख अमावास्येच्या आदल्या दिवशी म्हणजे कृष्ण चतुर्दशीला देवीचा जन्मोत्सव साजरा केला जातो. याचे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी देवीला आमरसाने अभिषेक केला जातो. त्या दिवशी प्रसाद म्हणूनही भाविकांना आमरसच दिला जातो. दर शुक्रवारी पालखी सेवा असते. तसेच नित्योपचारातील एक महत्वाची गोष्ट म्हणजे 'वट्टलसेवा' म्हणजेच शेजारती. सायंकाळी पूजाविधी संपल्यानंतर मंत्रघोषात देवीच्या अंगावरील अलंकार उतरवले जातात. रात्री नऊच्या सुमारास दूध,फळे ठेवण्यात येतात. पाळण्यात अक्षदा घालून उत्सवमूर्तीला झोपवले जाते. अत्यंत भक्तिभावाने पाळणा हलवत देवीसाठी अंगाईगीत म्हटले जाते. हलकेच गर्भगृहाचा दरवाजा बंद केला जातो. बदामीच्या परिसरात बदामी लेणी असून ती प्रेक्षणीय आहेत. देशविदेशातील लोक ही लेणी पाहण्यासाठी येतात. सहाव्या शतकातील चालुक्य राजांच्या काळातील त्यांची निर्मिती आहे. या लेण्यांमध्ये उत्तर आणि दक्षिण भारतीय शिल्पकलेचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. या परिसरात एकूण चार लेणी असून तीन हिंदू देवतांची असून एक जैन धर्मियांची आहे. सर्वच लेण्या प्रेक्षणीय आहेत. त्याचप्रमाणे ऐहोळे,पट्टदकल येथील पुरातन मंदिरे प्रेक्षणीय आहेत. ही लेणी आणि मंदिरे पाहताना आपल्यासोबत जर गाईड असेल तर त्या लेण्यांचा इतिहास अतिशय सुंदर पद्धतीने आपल्यासमोर उलगडला जातो आणि आपण त्यांचा अधिक आंनद घेऊ शकतो.

आपल्याकडे अधिक वेळ असेल तर आपण हम्पी, तुंगभद्रा डॅम आधी ठिकाणी पण पाहू शकतो. शाकंभरी मातेच्या अवताराची कथा अतिशय रम्य आहे. दुर्गम नावाच्या असुराने तपसामर्थ्याच्या बळावर ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले. ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या वराने तो अजिंक्य आणि उन्मत्त झाला. इंद्रादी देवांना त्याने पराभूत करून बंदी बनवले. इंद्रादी देव बंदिवासात असल्याने पाऊस पडेनासा झाला. पृथ्वीवर भयंकर दुष्काळ पडला. नद्या, सरोवर, तलाव आटले. विहिरी कोरड्या पडल्या. वनस्पती, मानव आणि पृथ्वीवरील यच्चयावत प्राणी अन्नपाण्याविना तडफडू लागले. देवांना हे पाहवेना म्हणून त्यांनी देवी भगवतीची प्रार्थना केली. या संकटातून आम्हाला सोडावं म्हणून साकडे घातले. अन्नपाण्याविना तडफडत असलेली प्रजा पाहून देवीच्या नेत्रात करुणा दाटून आली. तिने शंभर नेत्र असलेले रूप धारण केले. त्या नेत्रातून कृपारूपी जलधाराची वृष्टी झाली. तहानलेल्या धरतीला त्या जलधारांनी शांत केले. नद्या, सरोवरे, तलाव, विहिरी भरल्या. धरित्रीने हिरवा शालू परिधान केला. अन्नधान्याचा सुकाळ झाला. अनेकविध भाज्यांची निर्मिती झाली. देवीने प्रजेचे दुःख हरण केले. विविध भाज्या म्हणजे शाक निर्मिती तिच्या कृपेने झाली म्हणून ती शाकंभरी झाली. शंभर नेत्र असलेले रूप तिने धारण केले म्हणून तिला शताक्षी म्हणू लागले. त्यानंतर देवीने ब्रह्मदेवाच्या वराने उन्मत्त झालेल्या दुर्गम राक्षसाचा त्याच्याशी भयंकर युद्ध करून संहार केला. त्यामुळे शाकंभरी दुर्गा या नावाने प्रसिद्ध झाली. देवीने वनात निवास केला म्हणून तिला बनशंकरी असेही म्हटले जाऊ लागले. याच देवीला रक्तदंती, भ्रामरी अशी विविध नावे आहेत. त्या प्रत्येक नावामागे एक विशिष्ट अशी कथा आहे.

बदामी व्यतिरिक्त शाकंभरी देवीची देशभरात अनेक ठिकाणी मंदिरे आहेत. त्यातील हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या शिवालिक पर्वत श्रेणीमध्ये वेगवेगळ्या रूपांनी ही आदिशक्ती वास करते आहे. महाराष्ट्रात सोलापूर, बेळगाव, नागेवाडी (सातारा), बनाळी (सांगली जिल्हा, जत तालुका), कुरुंदवाड (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर), बुधगाव (सांगली), विटा (ता. खानापूर जि सांगली), कुंभोज (ता. हातकणंगले जि कोल्हापूर), पुणे परिसरात वडगाव शेरी, पिंपळे निलख तसेच बारामती, आष्टा, इचलकरंजी इ. ठिकाणी आहेत. त्याचप्रमाणे विजयवाडा, आंध्र प्रदेश येथे कनकदुर्गा या नावाने शाकंभरी मातेचे मंदिर आहे. बंगळुरू, धारवाड, बेळगाव, चेन्नई, वारंगळ, सकराय आणि सांभर (राजस्थान) आदी ठिकाणी पण देवीची मंदिरे आहेत. मूर्ती आणि मंदिरांच्या रूपाने स्थूल रूपाने ही देवी विविध ठिकाणी वास्तव्य करीत असली तरी ती सर्वव्यापी आहे. शाकंभरी देवी शीघ्र फलदायिनी, वरदायिनी आहे. मनोभावे भक्ती करणार्यांचे मनोरथ देवी पूर्ण करते. चारही वर्णातील लोकांची ही कुलदेवता आहे. ज्यांची कुलदेवता शाकंभरी आहे, त्यांनी दररोज तिची उपासना अवश्य करावी. ज्यांना तेही शक्य होत नाही त्यांनी या पौषमासातील शुद्ध अष्टमी ते पौर्णिमा अशी तरी तिची विशेषोपासना करावी.

# ग्रहसंकेत

(रविवार, २९ मार्च ते शनिवार, ४ एप्रिल २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २९ मार्च-** कामदा एकादशी, श्री शंभू महादेव यात्रा शिखर शिंगणापूर व उपळे दुमाला (बार्शी) यात्रा, श्री कृष्ण दोलोत्सव, श्रीराम रथोत्सव चाफळ (ता. पाटण), श्री लक्ष्मी मल्लिनाथ उत्सव पाली, श्री केतकेश्वर यात्रा निमगाव केतकी ✻ **सोमवार, ३० मार्च-** सोमप्रदोष, भैरवनाथ यात्रा तुजारपूर, चिंचेश्वर यात्रा मंगरूळ, नृसिंह यात्रा जुळेवाडी (ता. तासगाव), रोकडेश्वर यात्रा बाबुर्डी (पारनेर)✻ **मंगळवार, ३१ मार्च-** श्री महावीर जयंती, चरपटिनाथ यात्रा वनकुटे (ता. पारनेर), दमनक चतुर्दशी, डोंगर यात्रा कर्जत (रायगड), श्री बिरोबा देव यात्रा साकुरी ✻ **बुधवार, १ एप्रिल-** हनुमान जयंती उपवास, नृसिंह दोलोत्सव, सर्व देवांना दवणा वाहने, कुलधर्म, अन्वाधान, मन्वादि, ज्योतिर्लिंग यात्रा कोल्हापूर, वतणी पौर्णिमा प्रारंभ (सकाळी ७: ०६ नंतर) ✻ **गुरुवार, २ एप्रिल-** हनुमान जयंती, वैशाख स्नान आरंभ, छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी, इष्टि, आयंबिल, ओवी समाप्ती, महालक्ष्मी रथोत्सव केळशी, तुंग यात्रा, श्री तुळजाभवानी यात्रा तुळजापूर, सप्तशृंगी देवी यात्रा नांदुरी, अक्कमहादेवी जयंती, श्री अंबाबाई रथोत्सव कोल्हापूर, श्री येडेश्वरीदेवी यात्रा येरमाळा ✻ **शुक्रवार, ३ एप्रिल-** छत्रपती शिवाजी महाराज पुण्यदिन ( तारखेप्रमाणे), गुड फ्रायडे, लक्ष्मीदेवी यात्रा रेड्डी, येडोबा यात्रा बेराड, हनुमान यात्रा नवे पारगाव, श्री शिरकाईदेवी यात्रा शिरकोली, एकवीरा देवी यात्रा डफळापूर, गोविंद महाराज पुण्यतिथी बार्शी टाकळी ✻ **शनिवार, ४ एप्रिल-** श्री चक्रधर स्वामी पुण्यतिथी, खंडोबा यात्रा वाटंबरे (सांगोला), मालवणी बोलीभाषा दिन.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २५ मार्च (१५ नंतर), ३१ मार्च (१५ नंतर), ३, ४ एप्रिल ✻ **डोहाळ जेवण-** २ एप्रिल (१८ पर्यंत) ✻ **बारसे-** ३, ४ एप्रिल ✻ जावळ- २, ३ एप्रिल ✻ **गृहप्रवेश-** २, ३, ४ एप्रिल

### मेष :- विचाराने निर्णय घ्या

मनात उतरणंआणि मनातून उतरणंया गोष्टी माणसाच्या वागण्यावर अवलंबून असतात. बुध गुरु त्रिकोणयोग उद्योग, व्यवसायात आर्थिकदृष्ट्या लाभदायक आहे. गुंतवणूक विचाराने करावी. डोळ्यांच्या तक्रारी वाढणार आहेत. उन्हाळ्यात काळजी घ्यावी. गुरुवारी राशी स्वामी मंगळ बारावा होत आहे. त्यामुळे विचाराने निर्णय घ्यावेत. कलागुणांना चालना मिळेल. शुभ ता. ३०, २, ३

### वृषभः- कामांना गती मिळेल

दिवस चोविसतासांनी बदलतो पण, वेळ सेकंदात बदलते. धनस्थ गुरुशी कर्मस्थ बुधाचा होणारा त्रिकोण योग नोकरी, व्यवसायात प्रगती करणारा आहे. रेंगाळलेल्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. ज्ञानदान, बँक, विमा, जनसंपर्क अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. अडचणी कमी झाल्याने समाधान वाटेल. शुभ ता. ३१, ३

### मिथुनः- विचाराने रहावे

आज जे आहे ते मनापासून जगा, उद्याचे काय सांगावे? राशी स्वामी बुधाचा राशीतील गुरुशी होणारा त्रिकोण योग विशेष लाभदायक ठरेल. शिक्षण अनुभवातून चांगली प्रगती साधू शकाल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. कार्यक्षेत्रात पापकारक ग्रहांचा मेळावा जमत आहे. त्यामुळे बेफिकीर राहून निर्णय घेऊ नका. विचाराने रहावे. शुभ ता. २९, २

### कर्कः- संसर्गजन्य आजारापासून सावध

आयुष्य आनंदी ठेवायचे असेल तर 'स्वाद' आणि 'वाद' या दोन्हीचा त्याग केला पाहिजे. पंचमेश, दशमेश मंगळ २ एप्रिलला भाग्यस्थानी येत आहे, त्यामुळे प्रतिकूलता थोडी कमी होईल. संसर्गजन्य आजारापासून थोडं सावध रहावे. संघर्षातून प्रगती होत जाईल. गुढ विद्येत अनुकूलता वाढेल. धार्मिक, सामाजिक कार्य होतील. शुभ ता. ३०, ३, ४

### सिंहः- प्रकृती सांभाळा

ध्येय साध्य करणे कितीही कठीण असो, पण जर आत्मविश्वास असेल तर अशक्य असे काहीच नाही. बुध गुरुशी होणारा त्रिकोण योग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी ठरेल. अष्टमातील पापग्रहांमुळे प्रकृतीची काळजी घ्यावी. जुने आजार पुन्हा डोके वर काढण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवनात एक विचाराने रहावे. अडचणी संभवतात. शुभ ता. ३१, २

### कन्याः- जागरूक रहावे

आरोग्यम् धनसंपदा खरंच आरोग्य चांगलं तर जीवनात सुख शांती मिळतेच. आरोग्य जपावे राशी समोरच पापग्रह जमत आहेत. त्यामुळे आपले शारीरिक, मानसिक आरोग्य बिघडणार नाही याची काळजी घ्या.कोणतेही मनभेद, मतभेद विकोपाला जाणार नाहीत याबाबत जागरूक रहावे. उष्णतेपासून त्रास होईल. शांत चित्ताने रहावे. शुभ ता. ३१, ३

### तुलाः- सौख्यदायी घटना

प्रयत्न आणि सातत्य असले की, जीवनात अशक्य असे काहीच नाही. पंचमातील बुधाचा भाग्यस्थ गुरुशी होणारा त्रिकोण योग शुभफलदायी ठरेल. राशी स्वामी शुक्र राशी समोरच असल्याने सौख्यदायी घटना घडतील. शारीरिक तक्रारी वाढणार नाहीत याची काळजी घ्यावी. वैद्यकीय, जनसंपर्क अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. शुभ ता. ३०, ४

### वृश्चिकः- सट्टा लॉटरीपासून दूर रहावे

पाण्याचा थेंब जेव्हा सातत्याने दगडावर पडतो, तेव्हा तो दगडही फोडतो. ताकद थेंबाच्या वजनाची नाही तर,त्याच्या सातत्याची आहे. राशी स्वामी मंगळ सुखस्थानातून आपला मुक्काम घालणार आहेत. त्यामुळे अस्वस्थता कमी होईल. संततीच्या हितसंबंधासाठी स्वतः लक्ष घालावे. सट्टा लॉटरीपासून दूर रहावे. स्थावर प्रश्न वाढवू नका. शुभ ता. २, ३

### धनुः- वाहनांपासून जपून

कर्म ही कर्मच असतात. आज ना उद्या ती भोगावीच लागतात. चौथा रवि शनिच्या जोडीला मंगळी येत आहे. त्यामुळे घरात तसेच शेजारी भांडणे होणार नाहीत याची काळजी घ्या. किरकोळ कारणावरून अस्वस्थता राहील. विचाराने रहावे. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. वाहनांपासून जपून असावे. शुभ ता. ३१, २, ३

### मकरः- अडचणी कमी होतील

मन दुखवायची, देवपुजा करायची यामुळे पापे धुतली जातील, ही मोठी अंधश्रद्धा आहे. धनस्थ बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी आहे. कार्यक्षेत्रातील अडचणी कमी होत जातील. भावंडांबाबत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. चिंता राहील. अनावश्यक खर्च टाळावेत. सुख लाभेल. शुभ ता. ३१, २

### कुंभः- फसवणूक संभवते

योग्य निर्णय घ्यायचे असतील तर, डोकं शांत ठेवा. वाणीवर नियंत्रण ठेवावे. राशीतील मंगळ धनस्थानी रवि, शनिवर येत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. डोळ्यांच्या, तोंडाच्या तक्रारी वाढणार आहेत. दुर्लक्ष करू नका. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. विचाराने रहावे. गुंतवणूक विचाराने करावी. फसवणूक संभवते. शुभ ता. ३१, २


### मीनः- द्विधा मनस्थिती टाळावी

जीवन घड्याळासारखं गोल आहे. आपण प्रत्येक टप्प्यातून जाताना आनंदाने जगावे. वेळ कधी बदलेले, हे सांगता येत नाही. राशीत पापग्रह जमणार आहेत. त्यामुळे सर्व बाबतीत आपली द्विधामनस्थिती राहील. ऐन उन्हाळ्यात प्रकृतीच्या तक्रारी वाढणार आहेत. काळजी घ्यावी. भागीदारीच्या व्यवसायात एक विचाराने रहावे. मतभेद टाळावेत. शुभ ता. २, ३

!! शुभ भवतु !!

वेध डॉ. पी. एम. पडोळे

# फिजिकल एआयद्वारे समर्थित मानव-केंद्रित रोबोटिक्स



## विलगीकरणापासून बुद्धिमान सहकार्याकडे झालेला प्रवास

मानव- केंद्रित रोबोटिक्स ही रोबोटची रचना आणि वापर करण्याची पद्धत बदलणारी संकल्पना आहे. पूर्वी रोबोट मुख्यतः वेग, अचूकता आणि सतत काम करण्यासाठी तयार केले जात होते. ते सहसा सुरक्षिततेसाठी माणसांपासून वेगळे ठेवले जात आणि ठरावीक हालचाली पुन्हा पुन्हा करण्यासाठी प्रोग्राम केले जात. उद्दिष्ट जास्त उत्पादन आणि कमी मानवी हस्तक्षेप असे होते. परंतु आता दृष्टिकोन बदलला आहे. मानव-केंद्रित रोबोटिक्समध्ये माणूस हा संपूर्ण प्रणालीचा केंद्रबिंदू असतो. उद्दिष्ट माणसाला हटवणे नाही, तर त्याची क्षमता वाढविणे, शारीरिक व मानसिक ताण कमी करणे आणि मानव व मशीन यांच्यात सुरक्षित व नैसर्गिक सहकार्य निर्माण करणे हे आहे. हा बदल 'फिजिकल एआय'मुळे शक्य झाला आहे.

फिजिकल एआय म्हणजे प्रत्यक्ष भौतिक जगात काम करणारी कृत्रिम बुद्धिमत्ता. पारंपरिक एआय संगणकातील स्थिर डेटावर काम करते, परंतु फिजिकल एआयला प्रत्यक्ष परिस्थितीतील बदल ओळखून त्वरित प्रतिसाद द्यावा लागतो. यात बल, घर्षण, संपर्क, मानवी हालचाली आणि पर्यावरणातील अनिश्चितता यांचा विचार केला जातो. सेन्सर, शिकणारी अल्गोरिदम आणि नियंत्रण पद्धती यांचे एकत्रीकरण करून रोबोटला सुरक्षित आणि बुद्धिमानरीत्या काम करण्यास सक्षम केले जाते. सोप्या शब्दांत, फिजिकल एआय रोबोटला त्याच्या आसपास काय घडत आहे हे समजून योग्य कृती करण्यास मदत करते.

मानव- केंद्रित रोबोटिक्समध्ये मल्टिमोडल परसेप्शन (अनेक प्रकारचे सेन्सिंग) महत्त्वाचे आहे. आधुनिक सहयोगी रोबोट कॅमेरे, डेप्थ सेन्सर, फोर्स-टॉर्क सेन्सर, इनर्शियल सेन्सर आणि काही वेळा स्नायूंची क्रिया मोजणारे ईएमजी सेन्सर वापरतात. या सर्व माहितीचे एकत्र विश्लेषण करून रोबोट मानवी स्थिती, संपर्क बल, कामाची प्रगती आणि आजूबाजूचे वातावरण समजू शकतो. यामुळे रोबोटला प्रत्यक्ष वेळेत परिस्थितीची समज मिळते आणि तो त्यानुसार स्वतःचे वर्तन बदलू शकतो. 'इंटेन्शन रेकग्निशन' म्हणजे मानवी हेतू ओळखणे ही आणखी एक महत्त्वाची संकल्पना आहे.

सामायिक कार्यक्षेत्रात रोबोटला माणूस पुढे काय करणार आहे, याचा अंदाज लावावा लागतो. मशीन लर्निंग मॉडेल्स माणसाच्या हालचालींवरून संभाव्य उद्दिष्ट ओळखतात. उदाहरणार्थ, एखादा कामगार जड वस्तू उचलण्यास सुरुवात करत असेल तर रोबोट त्या हालचालीचा अंदाज घेऊन योग्य वेळी मदत करू शकतो. त्यामुळे संवाद अधिक नैसर्गिक आणि सुरळीत होतो. सुरक्षित शारीरिक परस्परसंवाद अत्यंत आवश्यक आहे. पारंपरिक रोबोट ठरावीक मार्गावर कठोरपणे हालचाल करतात. परंतु मानव-केंद्रित वातावरणात ही पद्धत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे इम्पिडन्स आणि ॲडमिटन्स कंट्रोलसारख्या नियंत्रण पद्धती वापरल्या जातात. या पद्धतींमध्ये रोबोट बल आणि हालचाल यांचा समतोल राखतो आणि लवचीकपणे प्रतिसाद देतो. काही ठिकाणी रिइन्फोर्समेंट लर्निंग वापरून रोबोट अनुभवातून स्वतःचे वर्तन सुधारतो. सर्फेस फिनिशिंग लावण्याच्या कामांमध्येही ही पद्धत उपयुक्त ठरते. या कामांमध्ये सतत बदलणाऱ्या पृष्ठभागावर अचूक बल नियंत्रण आवश्यक असते. 'लर्निंग फ्रॉम डेमॉन्स्ट्रेशन' पद्धतीने रोबोट कुशल कामगाराची हालचाल आणि बल पॅटर्न शिकतो. काम करताना तो पृष्ठभागाची रचना ओळखून संपर्क बल समायोजित करतो. यामुळे मानवी कौशल्य आणि रोबोटची सातत्यपूर्ण अचूकता यांचा संगम साधला जातो.

वेअरेबल रोबोटिक्स, जसे की पॉवर्ड एक्सोस्केलेटन, हे आणखी एक उदाहरण आहे. गोदाम किंवा बांधकाम क्षेत्रात जड वस्तू उचलताना इजा होण्याची शक्यता असते. एक्सोस्केलेटन सेन्सरद्वारे वापरकर्त्याच्या हालचाली आणि स्नायूंची क्रिया ओळखतो. फिजिकल एआय योग्य सहायक टॉर्क प्रदान करतो. हालचालींवर नियंत्रण माणसाचेच राहते, परंतु ताकद आणि सहनशक्ती वाढते. आरोग्य क्षेत्रातही मानव-केंद्रित रोबोटिक्स महत्त्वाची भूमिका बजावते. स्मार्ट व्हीलचेअर वापरकर्त्याच्या सूचनांसोबत अडथळा टाळण्याची प्रणाली वापरतात. सेन्सरच्या मदतीने परिसर ओळखून सुरक्षित मार्ग आखला जातो. वापरकर्त्याचे स्वातंत्र्य राखले जाते आणि सुरक्षितता वाढते.

वृद्धांसाठी सहायक रोबोट चालण्यातील अस्थिरता ओळखून मदत करू शकतात किंवा काळजीवाहूंना सूचना देऊ शकतात. डिजिटल ट्विन तंत्रज्ञान मानवरोबोट प्रणालीची रचना आणि चाचणी करण्यासाठी वापरले जाते. डिजिटल ट्विन म्हणजे प्रत्यक्ष प्रणालीची आभासी प्रतिकृती. यामध्ये मानव-रोबोट परस्परसंवाद, एर्गोनॉमिक परिणाम आणि सुरक्षा तपासता येते. प्रत्यक्ष सेन्सर डेटा वापरून ही प्रणाली अधिक सुधारता येते. समजा एखाद्या कारखान्यात कामगार जड मशीनचा भाग अचूक ठिकाणी बसवत आहे. पूर्वी पूर्णपणे स्वयंचलित रोबोट हे काम एकटाच करत असे आणि माणूस फक्त निरीक्षक असे; उद्दिष्ट फक्त उत्पादन वाढवणे असे. परंतु मानव-केंद्रित रोबोटिक्समध्ये कामगार आणि रोबोट एकत्र काम करतात.

कामगार भागाची दिशा आणि अचूकता ठरवतो, तर रोबोट सेन्सरच्या मदतीने वजन ओळखून त्याला आवश्यक तेवढा आधार देतो आणि सुरक्षितपणे हालचाल नियंत्रित करतो. जर अचानक हालचाल झाली तरी रोबोट मऊ आणि सुरक्षित प्रतिसाद देतो, त्यामुळे इजा होण्याचा धोका कमी होतो आणि कामगाराचा थकवा कमी होतो. अशा प्रकारे यश केवळ उत्पादनावर नाही तर सुरक्षितता, आराम आणि मानवी क्षमतेत वाढ यावर मोजले जाते, जिथे मशीन माणसाची जागा घेत नाही तर त्याचा बुद्धिमान सहकारी बनते. अर्थातच काही आव्हाने आहेत. वापरकर्त्यांचा विश्वास आणि समज आवश्यक आहे. शिकणाऱ्या प्रणालींचे वर्तन वेळेनुसार बदलू शकते, त्यामुळे सुरक्षा प्रमाणन कठीण होते. विविध परिस्थितींमध्ये स्थिर आणि विश्वासार्ह कार्य करणे हेही आव्हान आहे. या समस्यांसाठी रोबोटिक्स, नियंत्रण अभियांत्रिकी, मशीन लर्निंग आणि मानव-संगणक परस्परसंवाद यांचे एकत्रित संशोधन आवश्यक आहे.

पान ३ वरून

## मेगॅस्थेनिस आणि अद्भुत प्राणी

या भागात असलेल्या महाकाय मुंग्या येथील जमीन खणून खालचे सुवर्णकण वरती काढतात.

या मुंग्यांचे आकार जंगली कोल्ह्याएवढे मोठे असतात. त्या प्रचंड गतीने धावतात. हिवाळ्यात सुवर्ण खाणींमधून मुंग्यांमुळे वरती सोन्याचे ढिगारे जमा होतात. या सुवर्णाला थोडेसे उकळल्यावर शुद्ध सोने तयार होते. आसपासचे लोक दबक्या पावलांनी येथून सोने घेऊन जायला येतात. जर मुंग्यांसमोर ते लोक सोने घेऊन गेले तर मुंग्या चवताळतात आणि त्यांच्यावर हल्ला करून त्यांना मारतात.

सर्व प्राण्यांमध्ये अतिशय धैर्यवान आणि लढवय्या अशा या मुंग्या समजल्या जातात. सोन्याला जपण्यासाठी त्या शत्रूला मारतील किंवा स्वतः मरतील. या मुंग्यांनी मागे लागू नये म्हणून बाहेरचे लोक मांसाचे तुकडे इतस्ततः पसरवतात आणि त्यामुळे मुंग्या त्यांच्यावर एकदम चाल करून येत नाहीत आणि त्यांना सोने लुटून नेता येते. मेगॅस्थेनिस या व्यक्तीबद्दल दुर्दैवाने इतिहासकारांनी, संशोधकांनी किंवा समकालीन सत्रपांनी अथवा राजांनी काहीच लिहिले नाही. त्याचे व्यक्तित्व अबोल राहिले. व्यक्ती म्हणून त्याची पुसटशी आठवणही इतिहासाला नाही. मात्र, त्याच्या स्वानुभवांच्या सच्चेपणामुळे सर्वच पातळ्यांवर प्राचीन भारताचे दर्शन आपल्याला होते. प्राचीन भारताचा आरसाच जणू त्याने आपल्यासमोर 'इंडिका'च्या रूपात धरला. ही लेखमाला म्हणजे अशा अनाम प्रवासी मुसाफिरांना मानाचा मुजरा आहे..

पान ३ वरून

## रस्त्यावर राहणारी मुले:

शहराच्या रस्त्यावर आपल्याला दिसणारं एखादं मूल हे केवळ त्या क्षणाचं दृश्य नसतं; ते आपल्या समाजाच्या वास्तवाचं प्रतिबिंब असतं. हे विसरता कामा नये. प्रश्न एवढाच आहे की, आपण त्या वास्तवाकडे किती काळ पाहायला तयार आहोत. कारण शेवटी रस्त्यावरची मुलं आपल्या शहरात रोज दिसतात, पण त्यांचं बालपण अजूनही समाजाच्या नजरेपासून अदृश्यच आहे. याकडे सर्वांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे

पान ५ वरून

## लाळानौसाचं गोंदनं...

महानोरांच्या या ओळींत गोंदवलेला हात बोली बोलतो, असा उल्लेख आहे. जे शब्दांत सांगता येत नाही किंवा जे शब्दातीत आहे ते गोंदवलेल्या हाताच्या बोलीतून कळते. लोकवाणी बोली मोठी सूचक असते. एरवी अघळपघळ वाटणारी बोली प्रसंगी विलक्षण सूचक आणि आशयघन असते. अनेक अर्थसंदर्भ असणाऱ्या गोंदण या शब्दाविषयीआणखी बरेच काही सांगता येईल. गोंदण हा शब्द जर मराठी माणसांनी अडगळीत टाकला तर या शब्दाला लगडून असलेले आशयघन भावस्पर्शी संदर्भ नामशेष होण्यास फार काळ लागणार नाही.

पान २ वरून

## पंच परिवर्तनात समाजाचा प्रत्येक घटक...

चार माणसे तिथे काहीतरी वेडवाकडे लिहितात. त्यामुळे तो गैरसमज होतो. पण आता आम्ही मोठ्या प्रमाणावर समाजात जात आहोत. आम्ही जे बोलतो, तेच अधिकृत असते. आमच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गैरसमज दूर करणे हे आमचे काम आहे.

स्वयंसेवकांच्या प्रशिक्षणाला सुरुवात झाली आहे आणि आलेल्या टेक्नॉलॉजीचा चांगला व विधायक उपयोग करणे हे आपल्या हातात असते. ते आपण केले पाहिजे.

**प्रश्न :** आता समलखाच्या प्रतिनिधी सभेच्या बैठकीत सांगितले आणि एरवीही सांगितले जाते की, आता शाखांची संख्या वाढते आहे. पण एक प्रश्न सतत पडतो की, 'जेन झी' हा वर्ग शाखांकडे आकृष्ट होतोय का आणि त्याच्यासाठी वेगळे प्रयत्न संघ करतोय का?

**प. पू. सरसंघचालक :** या वर्गामध्ये आपला भारत आपल्याला मोठा करायचा आहे, अशी भावना आहेच. आपली एक परंपरा आहे, त्याला तुम्ही हिंदू म्हणा किंवा भारतीय म्हणा. ती आपली परंपरा आहे आणि ती परंपरा मोठी झाली पाहिजे, असे या पिढीला वाटते. प्रामाणिकता, सेवा यांचे जेन झींमध्ये मोठे आकर्षण आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे ते या विचारांशी लवकर आपली नाळ जोडतील. प्रत्यक्ष शाखेमध्ये यायला आज परिस्थितीमध्ये काही बंधने आहेत. खूप ट्यूशन्स असतील किंवा एका विशिष्ट स्तरावर राहणाऱ्या लोकांचा तसा समाजाच्या अनेक घटकांशी प्रत्यक्ष संबंध येत नाही.

त्यांचे एक वेगळेच विश्व असते. अशा गोष्टी आहेत. शाखेमध्ये जिथे जिथे आम्ही ॲप्रोच करू शकतो आणि ज्यांना सहज जमू शकेल त्यांनी यावे, यासाठी आम्ही प्रयत्न करीत असतो. शाखेमध्ये ते येईपर्यंतचे काही पडाव अशी व्यवस्था संघ करतोय. हायराईज बिल्डिंगमध्ये कसे काय करायचे, गेटेड सोसायटीत कसे काम करायचे, बालगोकुलम सारख्या काही अल्टरनेटिव्ह कामांची योजना करायची आहे. हे सगळे आमच्या कार्यशैलीला आम्ही जोडलेले आहे आणि त्यानुसार जेन झींची संख्यासुद्धा वाढली पाहिजे, अशी बैठकीतून चर्चा झाली. अखिल भारतीय बैठकीत याचे आकडे आहेत. हे आता सुरू झाले आहे. त्यांच्या वैचारिक भूमिकेत आमच्या या कामाकरिता पुष्कळ अनुकूलता आहे.

**प्रश्न :** प्रतिकूल काळात स्वयंसेवकांनी प्रसिद्धी परांङमुख राहून काम केले. आज असे म्हटले जाते की, हा अनुकूलतेचा काळ आहे. आज स्वयंसेवक थोडा प्रसिद्धीअभिमुख पण झालेला आहे. प्रतिकूलता ते प्रचंड प्रसिद्धी अभिमुखता असा हा प्रवास. प्रसिद्धीपरांङमुखता ते सहज-सुलभ प्रसिद्धी हा जो शंभर वर्षांचा प्रवास झाला, त्यात स्वयंसेवकांचा पोत किंवा टेक्श्चर यात काही बदल झालाय, असे वाटतं का? अनुकूलतेच्या काळातही काही आव्हाने आहेत का?

**प. पू. सरसंघचालक :** हो निश्चितच. अनुकूलता हेच आव्हान आहे. कारण पतनाची सुरुवात अनुकूलतेपासूनच होते. चढेल तो पडेल हे ठरलेलेच आहे. जो वर जाईल, तोच परत येईल आणि पडले की पुन्हा वर येणे अवघड होते. म्हणून हे आव्हान निश्चितपणे असते. अजून संघाचा स्वयंसेवक प्रसिद्धीत आला असला तरी प्रसिद्धी अभिमुख झाला, असे म्हणता येत नाही. संघ एक समूह आहे. तो अजूनही प्रसिद्धी अभिमुख झालेला नाही. तसा तो होऊ नये, याचे प्रयत्नही सुरू झालेले आहेत. आमचे जे बौद्धिक वर्गाचे विषय असतात, त्यात या सर्व विषयांचा अंतर्भाव असतो. उपेक्षित स्थितीत कसे काम करायचे, विरोधात कसे काम करायचे, यावर आम्ही बोलतो.

आता अनुकूलतेत कसे काम करायचे, हाही विषय आहे. साधने आता उपलब्ध आहेत. धन-साधन याची कमतरता नाही. खूप प्रभाव, समृद्धी आहे का?...तर नाही. पण, पोटापुरते आहे. असे असले तरी त्याचा उपयोग करणे आणि त्याचा योग्य त्या कारणासाठी वापर करणे हे महत्त्वाचे आहे. जी साधने आहेत ती कामाकरिता आहेत, आपण साधनांकरिता नाही, ही प्रवृत्ती बळकट कशी होईल, यादृष्टीने बौद्धिकातून, बैठकीतून चर्चेला विषय येत असतात. अनुकूलतेची बाधा होऊ नये याकरिता जेवढे लसीकरण पाहिजे तेवढे करतोय आणि करणार. अनुकूलता ही परीक्षा आहे. ती पार करून पुढे जावे लागते.

**प्रश्न :** आयडियॉलॉजीमधून जो संस्कार संघ स्वयंसेवकांमध्ये झिरपतो तो वेगळा आणि तळागाळामध्ये त्याचे काही वेळा विचित्र प्रकारचे एक्झिबिशन होते, असे दिसते. हा जो मधला ग्रे एरिया आहे, इथे काम करण्याची आवश्यकता आहे का?

**प. पू. सरसंघचालक :** संघ जेव्हा सुरू झाला तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. आव्हाने वेगळी होती. आता तो काळ बदलला. दुसरी आव्हाने आहेत. आता लाखो स्वयंसेवक आहेत. त्यातील समजा दोन हजार सक्रिय आहेत. या दोन हजारांपैकी दोनशे जणांना विचारांचा व कृतीचा समन्वय नाही कळत.

बाकीच्यांना कळतो. ही समस्या आहे. तर हेही सांभाळावे लागते आणि सांभाळतासांभाळता त्या दोनशे लोकांचेही मन परिष्कृत व्हावे, मतपरिष्कार व्हावा यासाठी काम करावे लागेल. ते आम्ही करतोय. परंतु एकूण समाजामध्ये जे जनरल रिप्रेझेंटेशन आहे, ते असे नाही. ज्यांना याचा फायदा घ्यायचा आहे, ते लोक गदारोळ उठवत असतात. पण आम्ही सगळ्यांना भेटतो. सगळ्यांशी आमचा संवाद सुरू असतो.

**प्रश्न :** संघाच्या शताब्दीनिमित्त बहुतेक माध्यमातून लेख आले आहेत. चर्चा झाल्या आहेत. अनेकांनी पुरवण्या काढल्या आहेत. या सगळ्यांचे संकलन किंवा विश्लेषण करण्याची अशी काही योजना आहे का?

**प. पू. सरसंघचालक :** हे सगळे संकलित करण्याचे निर्धारित आहे. सगळे संकलित करण्याचे काम सोपविण्यात आले आहे. प्रत्येक प्रांताच्या स्तरावर अभिलेखागारामध्ये त्याची कॉपी ठेवा असेही सांगण्यात आले आहे. कॉपी घेऊन सगळे केंद्रातसुद्धा पाठवा, अशा सूचना दिल्या आहेत. केंद्रामध्ये या सगळ्याचे विश्लेषण करून त्याच्यातील ठळक मुद्यांचे एक पुस्तक शताब्दी वर्षानंतर प्रकाशित करण्याचा मानस आहे.

आनंद स्पदंन

डॉ. अविनाश मोहरील

चला, आता शाळेला सुट्टी लागणार. जरा निवांत मिळेल. सारखे रोज तेच-तेच. सकाळी उठा, धावपळ करा. शाळेची तयारी... ती देखील साधीसुधी नाही. केवढाली ती स्कूल बॅग... धावत धावत निघा, केवढे ते होमवर्क. शाळेचे वेगळे, ट्युशनचे वेगळे. सोबतच वेगवेगळे प्रोजेक्ट करा. हे सारे प्रोजेक्ट शाळेच्या वेळेत होतच नाहीत. किती मेहनत करावी लागते. त्यात दर महिन्याला परीक्षा असतेच. चांगला नंबर यायलाच हवा. आता दोन दिवसांनी दहा दिवस मस्त आराम मिळू शकेल. शाळेला सुटी लागली की छान वाटते.

मोकळा वेळ मिळतो. जरा वाचन वगैरे करता येईल...' ही सारी वाक्ये शाळेच्या व पर्यायाने अभ्यासाच्या अती व्यस्त कार्यक्रमाला कंटाळून सुटीचा आनंद घेऊ इच्छिणाऱ्या शाळकरी मुलांचीच राहू शकतात, असा आपला समज राहू शकतो. परंतु ही सारी वाक्ये मी शाळकरी मुलांच्या तोंडून नव्हे तर त्यांच्या शाळेच्या आणि अभ्यासाशी पूर्णपणे बांधल्या गेलेल्या मुलांच्या मातांकडून ऐकली आहेत. रोज सकाळी वेगवेगळ्या चमकदार शाळांसमोरचे हे चित्र आहे. सकाळी लहान शाळकरी मुले शाळेत जात असतात. नेहमी दिसणारे हे चित्र मला विचारात टाकते. साधारण चौथ्या वर्गातील दोन मुले शाळेचा गणवेश घालून निघालेले असतात. त्यांच्या हाती दोन वेगवेगळ्या प्रकारच्या टिफीनची बॅग असते. त्यांची मूळ पुस्तकांची बॅग मात्र त्यांच्या आयांनी खांद्यावर घेतली असते.

माउलीच ती! त्यांना आपल्या मुलांचे खांदे त्या स्कूल बॅग्जच्या वजनाने मोडून जातील, अशी भीती वाटते. त्यामुळे बस थांब्यापर्यंत त्याच आपल्या मुलांचे ओझे वाहतात. अशाच या दोन माउलींची वरील वाक्ये माझ्या कानावर पडली. मी विचार करीत राहिलो की, ही शाळा मुलांची आहे की त्यांच्या माउल्यांची? सध्याच्या आधुनिक शाळांनी खरोखरंच मुलांच्या मातांना परत एकदा नव्याने प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा आनंद देण्याचे काम केले आहे व निरंतर करीत आहेत. मुलांच्या शाळा व त्यांचे अभ्यास सांभाळणे ही एक नवी व जवळपास सर्वात महत्त्वाची जबाबदारी सध्या मातांना पार पाडावी लागत आहे. या सर्व माता स्वतः जेव्हा शाळेत शिकत होत्या तेव्हा जितक्या अभ्यासाबाबत जागरूक नव्हत्या तेवढ्या आता आपल्या मुलाबाळांच्या अभ्यासाच्या बाबतीत आहेत. मुलांच्या अभ्यासक्रमाबाबत त्यांना अपडेट राहावे लागते. परीक्षांची वेळापत्रके सांभाळावी लागतात. मुलांकडून अभ्यास करून घेणे ही देखील मोठी जबाबदारी आहे. त्यासोबतच मुलांच्या ट्युशन्स असतात. त्यांच्या वेळी त्यांना सोडून देणे, घ्यायला जाणे ही दळणवळणाची जबाबदारी त्यांचीच असते. हा सगळा अभ्यासाचा व परीक्षांचा रगाडा कमी असतो की काय तर सोबत वेगवेगळे प्रोजेक्ट करायचे असतात. हे प्रोजेक्ट तर बरेच वेळा अक्षरशः मातांकरिताच असतात. त्यांच्या शालेय जीवनामध्ये अशा प्रकारच्या प्रोजेक्ट करण्याची व्यवस्था नव्हती त्यामुळे त्यांचे त्यावेळी राहिलेले कार्य आता




मुलांच्या शाळांकरवी पूर्ण करून घेतले जाते. एकंदरीत या सर्व नव्या व आधुनिक शिक्षण प्रक्रियेत मुला-मुलींच्या माता म्हणजे प्रत्यक्ष शाळेत प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थिनीच असतात. या सर्व प्रकारातून बरेच वेळा बाबा सुटलेले असतात किंवा त्यांनी स्वतःला सोडवून घेतलेले असते. माता मात्र या सर्व प्रकारात प्रचंड गुंतलेल्या असते. मुलांच्या मित्रांचे फोन नंबर त्यांना ठाऊक असतात. गृहपाठासंबंधी त्या चर्चा करतात. बरेच वेळा तर दिवसभराच्या धावपळीमुळे थकून गेलेल्या पोराचा किंवा पोरीचा एवढासा झालेला चेहरा बघून माता त्यांना झोपायला सांगतात व पुढल्या दिवशी मुलांना शिक्षा होऊ नये म्हणून त्यांचे गृहपाठ स्वतः लिहून देतात.

बदललेल्या वातावरणात शिक्षण मुक्त व सहज होण्यापेक्षा जास्तीत जास्त अवघड, दिखाऊ व बोजड होत चालले असल्याचेच वाटते. या शाळांमध्ये असे का केले जाते, याचे कारण मजेदार आहे. सध्या या नव्या प्रणालीमध्ये शाळांना शिक्षण देण्याच्या प्रक्रियेसोबत एक नवा प्रकार करावा लागतो तो म्हणजे मार्केटिंग. काही शाळांमध्ये तर चक्क मार्केटिंग मॅनेजर नेमलेले आहेत. एखाद्या प्रॉडक्टचे जसे मार्केटिंग केले जाते तशाच प्रकारे नव्हे कधी कधी त्याच्याही पेक्षा आक्रमकपणे शाळांची जाहिरात केली जाते.

मोठमोठे बॅनर्स लावले जातात. याचे कारण या क्षेत्रात आता प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. मोठ्या शहरांमध्ये साधारण सहा महिन्याला एक नवी शाळा उघडली जात आहे. त्यातील बहुतांश आंतरराष्ट्रीय शाळा आहेत. गावाच्या बाहेर या शाळांनी अत्यंत देखण्या इमारती उभारल्या आहेत. स्पर्धा निर्माण झाल्यामुळे आपापल्या शाळेच्या अभ्याक्रमासंबंधी, प्रोजेक्टस्संबंधी, विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांसंबंधी तीव्रतेने सांगितले जाते. शाळेत असतानाच मुलाचे करीअर कशा पद्धतीने आंतरराष्ट्रीय राहू शकते, याबाबत पालकांच्या मनावर वेगवेगळ्या गोष्टी बिंबविल्या जातात. आजकालचे पालक त्याकडेच धाव घेतात; नव्हे आजूबाजूच्या वातावरणामुळे बरेच वेळा पर्यायच उरत नाही. या सर्व शाळांमधील किंवा सरकारी शाळांमधीलही पालक हे अभ्यास व व्यस्ततेचे ओझे स्वीकारतात व आपल्या पाल्यासही स्वीकारायला लावतात. कारण त्यांना आपल्या पाल्यास सर्वच बाबतीत तरबेज असणारे एक पूर्ण पॅकेज बनवायचे असते. शाळांना माहीत असलेल्या या पालकांच्या मानसिकतेमुळेच खरी गडबड झालेली आहे. पालकांना सध्या आपल्या घरच्या मुलाला किंवा मुलीला सुपर हिरोच बनवायचे आहे. त्याला सगळेच आले पाहिजे व सगळ्या बाबतीत बक्षिसे प्राप्त केलीच पाहिजे ही जिद्द आहे. अभ्यास नीट करून चांगली ग्रेड मिळालीच पाहिजे, ट्युशनमध्येही अव्वल राहायलाच पाहिजे, स्नेहसंमेलनात भाग घेतलाच पाहिजे, तेथेही काही ना काही बक्षीस मिळविलेच पाहीजे, खेळांतही प्रावीण्य दिसायला हवेच; सोबतच संगीतात रुची निर्माण व्हायला हवी. त्याने वाचनही केलेच पाहिजे, वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घ्यायलाच हवा... वगैरे वगैरे. ही यादी बरीच मोठी आहे. या सर्व बाबींमुळे तो एवढासा जीव एकच भाव चेहऱ्यावर घेऊन फिरत असतो... केविलवाणा.

एकंदरीत पालकांना जे हवे आहे ते शाळा देत आहेत व शाळा जे देत आहेत त्याची पालकांना सवय लागली आहे. या दुष्टचक्रामुळे मात्र त्या लहानग्यांसाठी शिक्षण ही एक सहजतेने केली जाणारी आनंददायी प्रक्रिया न राहता एक भलेमोठे ओझे बनले आहे. या प्रकाराचा कुठेतरी गांभीर्याने विचार व्हायला हवा असे वाटते. निदान शिक्षित व विचारी पालकांनी याचा विचार करून त्यांच्या पाल्यांच्या शाळा व्यवस्थापनाला या बाबी कळवायला हव्यात व सोबतच आपली स्वतःची मानसिकता बदलायला हवी.

मुळात शिक्षणाबद्दलची व्यर्थ आणि उत्पादनहीन प्रक्रिया ही भूमिका शासनाने बदलायला हवी. तज्ज्ञांना (व्यवहारी व जमिनीवर राहणारे) एकत्रित आणून ही सारी व्यवस्था बदलविण्याची नितांत गरज आहे. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये हे बदल सुचविले आहेत, परंतु स्पर्धेच्या युगात पालकांना ते पटायला हवेत.

...आपल्या मुलांच्या शाळांना लागणारी सुटी जणू काही आपल्यालाच लागत आहे, असा आनंद व्यक्त करणाऱ्या त्या मातांचा तो आनंद जास्त वेळ टिकला नाही. या दोघींच्या या वाक्यांना ऐकल्यावर याच प्रक्रियेतील तिसरी आई त्यांना म्हणाली, 'जास्त आनंदी होऊ नका. मुलांना उन्हाळ्याच्या सुटीमध्ये व्यस्त ठेवण्यासाठी खूप सारे हॉलीडे होमवर्क देण्यात आलेले आहे. उन्हाळ्याच्या सुटीत ते पूर्ण करून घ्यायचे आहे. त्यात बराच वेळ जाणार आहे.' हे वाक्य ऐकल्याबरोबर, काही क्षणापूर्वी मुलांना लागणारी सुटी आपलीच सुटी समजून खूश झालेल्या त्या दोन्ही माता हॉलीडे होमवर्क काय आहे, हे समजून घ्यायला लागल्या आणि काही क्षणापूर्वी त्यांच्या चेहऱ्यावर झळकणारा आनंद होमवर्कच्या (मुलांच्या) काळजीमध्ये परावर्तित झाला. कुठे ती आजोबांच्या गावी जाऊन दोन महिने धमाल करणाऱ्या पोरांची सुटी आणि कुठे ही सुटीच्या दिवसांमयधेही हॉलीडे होमवर्कमध्ये जाणारी उन्हाळ्याची सुटी. जग विचित्र पद्धतीने बदलतंय हे खरे; पण आपण ते निमूटपणे बदलू देतोय, हे त्याहीपेक्षा जास्त खरे!

# मानवी परंपरेतील सप्त संकल्पना

विवेचन

श्रीरंग हिर्लेकर

केवळ भारतीयच नव्हे तर विश्वातील अनेक संस्कृती, तत्त्वज्ञान, इतिहास, शास्त्र, विषय या सर्वांत सात या अंकाला प्राधान्य असल्याचे जाणवते. या अंकात असे काय विशेष असावे? आपल्याकडील काही ठळक उदहरणे सांगावयाची तर सप्तर्षी, भूः (पृथ्वी), भुवः (अंतरिक्ष), स्वः (स्वर्ग), महः, जनः, तपः आणि सत्यम् अशा सात व्याहृतींनी निर्देशिलेले सप्तलोक.

अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल आणि पाताळ असे सप्तपाताळ. ऋग्वेदातील सप्तसिंधू, सप्तखंडांत विखुरलेली पृत्त्वी, सात अग्नी, सप्तधातूंनी तयार झालेले शरीर, योगप्रणीत सप्तचक्रे, संगीतातील सप्तस्वर, श्रावणात दिसणाऱ्या इंद्रधनुष्यातील मूळ सात रंग, गीता, देवीसप्तशती आणि गाथासप्तशतीतील श्लोकांची संख्या, विवाहातील सप्तपदी आणि अशी कितीतरी.




**१) खगोलज्योतिष :**

**१)** प्राचीन कालापासून तो आजतागायत देशोदेशीच्याकालगणनेत खूप भेद असले, तरी सर्वांनी आठवड्याच्या वारांची संख्या मात्र सातच सांगितलेली असून त्यांचा क्रम आणि नावेही सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र आणि शनी या सप्तग्रहांच्या आवर्तीत होणाऱ्या होराचक्रावरूनच आहेत. आवर्तीत होतो तो आठवडा अशी व्युत्पत्ती सांगणे किंवा सूर्य हा तारा आणि चंद्र म्हणजे पृत्त्वीचा उपग्रह असूनही ज्योतिषशास्त्राने त्यांना ग्रहच का म्हणावे, हा आजचा विषय नाही. एका मूर्ख आणि विक्षिप्त इजिप्शियन हुकूमशहाने १० वारांचा आठवडा अशी कल्पना मांडून तशी दिनदर्शिकाही तयार केली होती. ती पद्धत त्याच्या स्वत:बरोबरच अस्ताला गेली.

**२) सप्तर्षी मंडल :** म्हणजे उत्तरेच्या स्थिर ध्रुव ताऱ्याला केंद्रिभूत करून त्याच्या भोवती प्रदक्षिणा करणाऱ्या, आपल्या विशिष्ट आकाराने सर्वांना परिचित असा सात ताऱ्यांचा समूह.

सप्तर्षी मंडळ आपल्या सौर मालिकेच्या बाहेर शेकडो प्रकाशवर्ष दूरचे देदीप्यमान तारे आहेत. (१ प्रकाशवर्ष म्हणजे ९.४५ ट्रिलियन किलोमीटर) सप्तर्षींच्यास्थैर्यावरूनच दिशाबोध होतो. पुराणांमध्ये सप्तर्षी कालगणना सांगितली असून दर १०० वर्षांनी सप्तर्षी एका नक्षत्रातून पुढच्या नक्षत्रात जातात, अशी कल्पना आहे. राजवंशात राजाचा काळ सप्तर्षी कोणत्या नक्षत्रात होते त्याचा संदर्भ घेऊन सांगितला जाई. हे सात तारे म्हणजे मरीचि, अत्री, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतु आणि वसिष्ठ. वसिष्ठाजवळ अस्पष्ट दिसणारा वसिष्ठ पत्नीचा अरुंधती हा तारा. विवाहानंतर पहाटे नवपरिणीत जोडप्याने वसिष्ठ-अरुंधती जोडीचे दर्शन घ्यावयाचे. या दोन ताऱ्यांच्या साहचर्यातून पतिपत्नीला निष्ठा, समत्व आणि सहचर्य किंवा 'सहनाववतू सहनौभुनक्तु'चा संदेश देण्यात येतो.

**अभिनव दृष्टिकोन :** जर आपण याकडे आकाशीय ग्रंथ म्हणून बघितले तर सप्तर्षी मंडल आणि त्यातील ताऱ्यांच्या नावांतून ज्ञानपरंपरा, दिशा आणि कालदर्शक अर्थात स्थिर आणि चंचल तत्त्व असा बहुस्तरी अर्थ प्रकट होतो. ध्रुव म्हणजे ब्रह्म, सप्तर्षी म्हणजे वेदांचे द्रष्टे, अरुंधती म्हणजे साधनेतील आणि कौटुंबिकच नव्हे तर ज्ञानमार्गावरील निष्ठा व स्थैर्याची प्रतीके असेही म्हणता येईल.

भारतीय विचारात संख्या केवळ मोजणीसाठी नसून प्रतीकात्मक पण आहे. ३ म्हणजे दैवी किंवा सूक्ष्म आणि ४ म्हणजे स्थूल आणि भौतिक. ३+४ म्हणजे ७. म्हणूनच विवाहातील सप्तपदी म्हणजे जीवनाच्या सूक्ष्म आणि स्थूल स्तरांवरील प्रतिज्ञा.

**३) योग आणि तत्त्वज्ञान :** मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा आणि सहस्रार चक्रे ही मानवी चेतनेचे सात स्तर आहेत. ऋषी द्रष्टे असतात. सत्याचे दर्शन करतात. आकाशातील सप्तर्षी हे बाह्य विश्वातील सात ज्ञानदीप तर शरीरातील सप्तचक्रे म्हणजे अंत:विश्वातील उर्जेची सात केंद्रे.

**कालचक्रातील भूमिका :** मन्वंतर बदलले की सप्तर्षी बदलतात. कालानुरूप नवीन सात द्रष्टे युगपुरुष जन्माला येतात. याचाच अर्थ सप्तर्षी या ऐतिहासिक व्यक्ती नसून ज्ञानरक्षकांची एक परंपरा असे म्हणावे.

**४) सप्तर्षी आणि गोत्रव्यवस्था :** मानववंशांचे मूळ पुरुष म्हणजे विश्वामित्र, जमदग्नी, भरद्वाज, गौतम, अत्री, वशिष्ठ आणि कश्यप हे सात ऋषी. ही नावे जरी वरील यादीपेक्षा भिन्न असली, तरी हे सात ऋषी म्हणजे ज्ञानपरंपरेचे आद्यप्रवर्तक.

**५) मानसशास्त्र:** अमेरिकन मानसशास्त्रज्ञ जॉर्ज मिलर यांच्या सिद्धांतानुसार मानवी स्मृतीस एखादा सांख्यिक गट लक्षात ठेवावयास सांगितला तर सात घटकांचा गट सर्वात सोपा असतो. त्यांनी हे १९५६ मध्ये प्रयोगांती सिद्ध केले.

**६) गणितीय दृष्टिकोन :** हा प्राईम नंबर आहेच; पण १० च्या पटीत विभागल्यास पुनरावृत्ती होणारी दशांश मालिका मिळते. उदा. १/७ बरोबर ०.१४२८५७...)

**७) सप्तस्वर आणि सप्तव्याहृती :** म्हणजे सप्तलोकातील विशेष रीतीने उच्चारलेले दिव्य उच्चार किंवा पवित्र शब्द. संगीतात स्वरांची संख्या सांगताना ती सा रे ग म प न ध नी अशी सात असल्याचेच सांगितले आहे. खरे म्हणजे ध्वनी हा अखंडीत असतो. मग स्वरसंख्या सातच का? कारण मानवी श्रवणक्षमतेला सुसंवादी वाटणारी कंपने सात आहेत.

तसेच जर सा=१ असेल तर प बरोबर ३/२ आणि म बरोबर ४/३ याप्रमाणे. येथे पुन्हा योगशास्त्रातील सप्तचक्रांच्या आणि स्वरांच्या मांडणीची तुलना केली तर दोघेही एका समान आरोही म्हणजे चढणाऱ्या दिशेनेच जातात. मूलाधार ते सहस्रार आणि सा पासून नी पर्यंत. संगीत कलाकार आपल्या गुरूंचे स्मरण करताना कानांना स्पर्श करतात ते याचेच प्रतीक म्हणून.

**८) दृष्टी :** ध्वनीप्रमाणेच रंगही सतत आहेत. पण मानवी दृष्टीला जे मूळ रंग दिसू शकतात ते म्हणजे इंद्रधनुष्यातील सप्तरंग.

**९) आयुर्वेद :**

**१)** मानवी शरीर आठवड्याच्या ७ वार या अंकाशी लय सांभाळते. त्याला 'सर्केडियन रिदम' असे म्हणतात. दर २४ तासांप्रमाणेच दर ७ दिवसात शरीरील क्रियाप्रक्रियांचे एक आवर्तन पूर्ण होते. तज्ज्ञ वैद्य औषधोपचार करताना १ सप्तक औषधांची योजना करतात.

**२)** अन्न ग्रहण केले की त्यापासून शरीरात रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा आणि शुक्र असे सप्तधातू निर्माण होतात. धारणात् धातवः शरीर धारण करतात ते धातू. यातील रसामुळे पोषण, रक्तामुळे जीवनउर्जेचे वहन, मांसाने संरचना, मेदाने स्नेह आणि साठवणूक, अस्थीमुळे आधार, मज्जेमुळे अंत:पूरण तर शुक्रामुळे सृजनत्वाचे कार्य होते. सप्तधातू म्हणजे स्थूल देहापासून सृजनशील चेतना किंवा जीवनाच्या सात पायऱ्या. सप्तपदीतील सात वचनांनी गृहस्थाश्रम पूर्ण होतो तर सप्तधातूंनी शरीराला पूर्णत्व येते. सप्तर्षी हे विश्वाच्या ज्ञानरचना आणि सप्तधातू शरीराची रचना सांगतात.

**३)** एका शास्त्राधारित नव्हे, पण अनुभवजन्य कल्पनेप्रमाणे आकार आणि भौतिक व रासायनिक गुणधर्म यांत संबंध सांगितला आहे. उदा. अक्रोड मेंदूसारखा दिसतो तर तो मेंदूला उपयुक्त असतो. डाळिंबांचे दाणे रक्तकणांसारखे दिसतात आणि ते रक्तवर्धनासाठी उपयुक्त असतात. गाजराचा छेद डोळ्यासारखा दिसतो तर ते नेत्रविकारांवर उपयुक्त असते. राजमा मूत्रपिंडासारखे दिसते तर ते मूत्रपिंडावर उपयुक्त असते. पाश्चात्त्य वनस्पतिशास्त्रात याला 'डॉक्ट्रीन ऑफ सिग्नेचरस्' असे म्हणतात.

**समारोप:** आतापर्यंतच्या एकूण विवेचनाचे तात्पर्य की, ज्योतिषातील सप्तग्रह, सप्तर्षींची संख्या आणि आकार हेच पृथ्वीवरील सर्वत्र आढळणाऱ्या सात या संख्येच्या प्राबल्याचे कारण असावे. संशोधन करण्यास हा एक चांगला विषय आहे.

## मानवी खेळ

जाणाऱ्याला जाऊ द्यावे
येणाऱ्याला येऊ द्यावे
जाणे येणे लोकांचे
साक्षी भावाने बघत राहावे
ना कुणात गुंतावे न
कुणाला गुंतू द्यावे
किनाऱ्यावरून बस खेळ मानवी
स्वभावाचे
बारकाईने निरखत राहावे
एकटे आलो होतो
एकटेच निघून जावे
अपेक्षा, भौतिकता यांना कधीच
न जवळ येऊ द्यावे

आशिष देव

## ना भेटला कुणी ही

ना भेटला कुणीही दिलदार काळजाला
ना राहिला कुणाचा आधार काळजाला
कमजोर भावनेला मजबूत मग बनविण्या
देतोय लेखणीचे अवजार काळजाला
फोटो तुझाच सजने हृदयात रोज जपतो
ना भोसकू कधीही तलवार काळजाला
जाते तुझी नि माझी ना खोड भांडण्याची
समजावतो किती मी नादार काळजाला
झिडकारले कितीही आता मला जगाने
बलदंड आज करतो अलवार काळजाला
सामर्थ्य झेलण्याचे प्रेमात त्या म्हणूनी
ती भेटली निशाणी कट्यार काळजाला

मिलिंद अवचित इंगळे

## नाथकृपा

प्रतिष्ठान क्षेत्री, षष्ठींचा सोहळा
अनुप आगळा, एकनाथा ।।
डोळा भरुनिया, पहावे ते रूप
सुख ते अमुप, साठवुनी ।।
श्रीखंड्या भरतो, रांजण ज्याचे दारी
तेच रूप हरी, नाथा घरी ।।
रांजण भरण, दिव्य अनुभूति
अशी त्याची ख्याती, पुण्यक्षेत्री ।।
श्वानासही देई, लोण्याचा जो गोळा
मुक्या जिवा लळा, ऐसा थोर ।।
अनाथ गावबा, नाथा घरी आला
सत्शिष्य झाला, नाथकृपे ।।
ऐसा दीनानाथ, जनार्दन शिष्य
ज्ञानेश्वर भाष्य, शुद्ध केले ।।
नमो नमस्कार, शांतिब्रह्म देवा
चरणाशी ठेवा, निरंतर ।।

अर्चना संजय मुळ्ये

# ऊर्जासंकटाचा जागतिक अर्थव्यवस्थेला धडा

आकलन — संजीव ओक



पश्चिम आशियातील संघर्ष, होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळे आणि ऊर्जापुरवठ्यातील मोठी खंडितता, यामुळे निर्माण झालेले संकट हे निव्वळ तेलापुरते मर्यादित नसून, जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यालाच हादरा देणारे ठरले आहे. १९७०च्या तेलसंकटांपेक्षाही अधिक गंभीर परिस्थितीची चाहूल यातून लागते. त्याविषयी...

जागतिक व्यवस्थेतील काही क्षण असे असतात, जे फक्त घटनाक्रम नसतात; तर ती युगबदलाची चिन्हे असतात. सध्याचे होर्मुझ सामुद्रधुनीभोवतीचे संकट असेच एक वळणबिंदू ठरताना दिसते. पश्चिम आशियातील अमेरिका- इस्रायल- इराण संघर्षाने एका अरुंद जलमार्गाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित केले आहे आणि त्या मार्गावर अवलंबून असलेल्या संपूर्ण जगाला त्याची किंमत चुकवावी लागत आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी ही पर्शियन आखात आणि ओमानचा आखात यांना जोडणारी जलवाहिनी. परंतु, तिचे महत्त्व भूगोलापुरते मर्यादित नाही. जगातील सुमारे पाचवा हिस्सा तेलपुरवठा या मार्गातून होतो. ऊर्जा वाहतुकीच्या दृष्टीने ही एक जीवनवाहिनीच आहे. त्यामुळे या मार्गात निर्माण झालेला कोणताही अडथळा म्हणजे, जागतिक अर्थव्यवस्थेच्या नाडीवर आलेला दबाव ठरतो. याच सामुद्रधुनीभोवती सध्या निर्माण झालेली अस्थिरता अभूतपूर्व अशीच आहे. जहाजांची वाहतूक विस्कळीत झाली असून, विमा दर वाढले आहेत आणि अनेक ऊर्जा कंपन्यांनी या क्षेत्रातील वाहतूक थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, जागतिक तेलपुरवठ्यात अस्थिरता निर्माण झाली आहे.

'आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थे'च्या अंदाजानुसार, हा पुरवठा धक्का इतका मोठा आहे की, तो १९७०च्या दोन्ही तेलसंकटांपेक्षाही गंभीर ठरू शकतो. ही तुलना सहजपणे करता येत नाही. १९७३ आणि १९७९ मधील तेलसंकट हे प्रामुख्याने उत्पादन नियंत्रणामुळे निर्माण झाले होते. मात्र, सध्याची परिस्थिती युद्धजन्य आहे. ऊर्जा प्रकल्पांवर होणारे हल्ले, समुद्री मार्गांवरील असलेले धोके आणि भू-राजकीय संघर्ष या सर्व घटकांचा संगम या संकटात दिसतो. त्यामुळे त्याची व्याप्ती अधिक वाढली आहे. या संकटाचा परिणाम तेलाच्या किमतींवर लगेचच दिसून आला असून, कच्च्या तेलाचे दर १०० डॉलरच्या पुढे गेले आहेत आणि बाजारात प्रचंड अस्थिरता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावर तातडीच्या उपाययोजना सुरू झाल्या आहेत. अनेक देशांनी आपले आपत्कालीन साठे वापरण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, हे उपाय तात्पुरते आहेत.

साठे संपल्यावर पुन्हा त्याच प्रश्नासमोर उभे राहावे लागणार आहे. दीर्घकालीन उपाय म्हणजे पुरवठा साखळी पुन्हा सुरळीत करणे आणि त्यासाठी होर्मुझ सामुद्रधुनी खुली राहणे अत्यावश्यक आहे. या संघर्षाचे स्वरूपही अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. हा केवळ दोन देशांमधील संघर्ष राहिलेला नाही. इराण, इस्रायल, अमेरिका आणि 'हिजबुल्ला' यांसारख्या घटकांमुळे हा संपूर्ण पश्चिम आशियात पसरलेला तणाव बनला आहे. ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले आणि समुद्री मार्गांवरील धमक्या यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. यामुळेच या संकटाचे परिणाम बहुआयामी आहेत. तेलाबरोबरच नैसर्गिक वायू, खत आणि रासायनिक उद्योगांवरही त्याचा परिणाम होत आहे.

जागतिक अन्नसाखळीवरही त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. म्हणजेच, हे संकट ऊर्जा व्यवस्थेपासून सुरू होऊन जागतिक अर्थव्यवस्थेच्या सर्वच स्तरांवर पसरत आहे. या संपूर्ण घडामोडींमध्ये भारताची भूमिका विशेष लक्षवेधी ठरते. भारत हा जगातील तिसर्‍या क्रमांकाचा तेल आयातदार देश आहे. देशाच्या ऊर्जा गरजांपैकी बहुतांश भाग आयातीवर अवलंबून आहे. त्यातील मोठा हिस्सा पश्चिम आशियातून येतो आणि होर्मुझ सामुद्रधुनीतून भारतात पोहोचतो. यामुळे या सामुद्रधुनीतील अडथळा म्हणजे भारताच्या ऊर्जासुरक्षेवर थेट परिणाम.

तेल महागले की, आयात बिल वाढते, रुपयावर दबाव येतो, महागाई वाढते आणि आर्थिकवाढीचा वेग मंदावतो. याचा परिणाम उद्योग, शेती आणि सामान्य नागरिक या सर्वांवर होतो. या संकटाने भारतासमोर दोन महत्त्वाचे प्रश्न उभे केले आहेत. पहिला म्हणजे, तत्काळ ऊर्जा सुरक्षितता कशी सुनिश्चित करायची? आणि दुसरा म्हणजे, दीर्घकालीन ऊर्जा स्वावलंबन कसे साध्य करायचे? भारताने अलीकडील काळात ऊर्जास्रोतांचे विविधीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. विविध देशांकडून तेल आयात करणे, रणनीतिक साठे उभारणे आणि नवीकरणीय ऊर्जेकडे वळणे, या उपाययोजना सुरू आहेत. परंतु, सध्याच्या संकटाने दाखवून दिले की, हे प्रयत्न अजून पुरेसे नाहीत.

भारताला इराणकडून ऊर्जापुरवठा सुरू राहणार का, हा सध्याच्या संघर्षातील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न ठरतो. युद्धस्थितीत इराणने आपली निर्यात प्राधान्याने राजकीय आणि सामरिक हितसंबंधांनुसार वळवण्याची शक्यता असते. मात्र, भारतासोबतचे संबंध पूर्णपणे तोडणे त्यालाही परवडणारे नाही. भारत हा मोठा संभाव्य बाजार असून, भविष्यातील व्यापार, चलन व्यवहार आणि प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टीने इराणला भारताशी संबंध टिकवणे आवश्यक आहे. तथापि, होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव, पाश्चिमात्य निर्बंध आणि सागरी सुरक्षेचे प्रश्न यामुळे प्रत्यक्ष पुरवठा सुरळीत राहील, याची खात्री देता येत नाही. त्यामुळे इराणकडून काही प्रमाणात पुरवठा सुरू राहण्याची शक्यता असली, तरी तो अनियमित आणि राजकीय परिस्थितीवर अवलंबून राहणार, हे वास्तव नाकारता येत नाही.

याचबरोबर भारतासमोर कूटनीतिक आव्हानही उभे आहे. अमेरिका आणि इराण या दोन्हींसोबतचे संबंध जपणे आवश्यक आहे. एका बाजूला अमेरिका हा रणनीतिक भागीदार आहे, तर दुसर्‍या बाजूला इराण हा ऊर्जा आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा देश आहे.

या दोन्हींच्या दरम्यान संतुलन राखणे, ही भारताच्या परराष्ट्र धोरणाची खरी कसोटी आहे. या संकटाने आणखी एक महत्त्वाचा बदल अधोरेखित केला आहे आणि तो म्हणजे, जागतिक सत्तासंतुलनातील परिवर्तनाचा.

ऊर्जासुरक्षेचा प्रश्न आता पाश्चिमात्य देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही. आशियाई देश, विशेषतः भारत या समीकरणात अधिक महत्त्वाचा ठरत आहे. होर्मुझ सामुद्रधुनीच्या सुरक्षेबाबत भारताकडे अपेक्षेने पाहिले जात आहे, ही बाब याच बदलाची साक्ष देते. म्हणजेच, भारत हा ऊर्जा आयात करणारा देश राहिलेला नाही; तर तो जागतिक ऊर्जाव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक बनत आहे. या संकटाने एक धडा स्पष्टपणे दिला आहे, तो म्हणजे जागतिक ऊर्जाव्यवस्था अजूनही अत्यंत असुरक्षित आहे. काही अरुंद 'चोकपॉइंट्स'वर संपूर्ण जग अवलंबून आहे. त्यामुळे एका प्रादेशिक संघर्षाचे जागतिक संकटात रूपांतर होते.

१९७० च्या दशकातील तेलसंकटाने जगाला सावध करण्याचे काम केले होते. परंतु, आजचे संकट त्या इशार्‍याची तीव्र आवृत्ती आहे, असे नक्कीच म्हणता येते. हे संकट जागतिक अर्थव्यवस्थेच्या संरचनेतील कमकुवतपणा उघड करणारे ठरले आहे. या संकटानंतर ऊर्जा, अर्थकारण आणि कूटनीती या तिन्ही क्षेत्रांतील समीकरणे बदलणार आहेत आणि त्या बदलात भारताची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

# बंगालमध्ये 'प्रोतिग्या' नव्हे, 'पोरिबोर्तन'च!

राजकारण — विजय कुलकर्णी



पुढील महिन्यात होऊ घातलेल्या प. बंगालच्या विधानसभा निवडणुकीसाठी ममतादीदींच्या तृणमूल काँग्रेसने नुकताच प्रसिद्ध केलेला जाहीरनामा हा त्यांच्या १५ वर्षांच्या मुख्यमंत्री म्हणून अयशस्वी कारकिर्दीचीच साक्ष देणारा म्हणावा लागेल. त्यामुळे दीदींनी आता दहा नव्हे, १०० 'प्रोतिग्या' जरी केल्या, तरी यंदा 'पोरिबोर्तन' हे अटळच!

१९७७ ते २०११ असा ३४ वर्षांचा कालखंड हा पश्चिम बंगालसाठी सर्वार्थाने काळा कालखंडच ठरला. कारण, कम्युनिस्टांच्या या प्रदीर्घ कारकिदत कोणे एकेकाळी व्यापार, वारसा आणि वैचारिकता या त्रिसूत्रीने बांधलेल्या प. बंगालची सर्वार्थाने पीछेहाट झाली. कम्युनिस्टांच्या हिंसाचाराला, गुंडाराजला आणि भ्रष्टाचाराला कंटाळून बंगालवासीयांनी तृणमूल काँग्रेसच्या पारड्यात २९४ पैकी तब्बल १८४ जागा दिल्या. 'मा, माटी, मानुष'च्या नार्यावर विश्वास ठेवून बंगालवासीयांनी ३८ टक्के मतांनी दीदींच्या हातात राज्याच्या नेतृत्वाची धुरा सुपूर्द केली खरी. पण, दुर्दैवाने १५ वर्षे सलग सत्ता उपभोगल्यानंतरही बंगालच्या 'मा, माटी, मानुष'समोरील आव्हाने अजूनही 'जैसे थे'च आहेत. बंगालमध्ये 'मा' अर्थात, माता-भगिनी आज कदापि सुरक्षित नाहीत; 'माटी' म्हणजेच जमीनही तृणमूलच्या गुंडांनी, सावकारांनी, घुसखोरांनी बळकावलेली आणि 'मानुष' अर्थात, बंगाली माणसाच्या मानवी हक्कांना तर दीदींच्या राज्यात मुळी स्थानच नाही. त्यामुळे कृषी, उद्योगधंदे, महिला संरक्षण, शिक्षण अशा सर्वच स्तरांवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी अपयशी ठरल्या आहेत. त्याचेच प्रतिबिंब तृणमूल काँग्रेसच्या यंदाच्या जाहीरनाम्यात उमटलेले दिसते. दीदींनी जाहीरनाम्यातून केलेल्या दहा 'प्रोतिग्या' अर्थात, प्रतिज्ञा म्हणजे त्यांच्या गेल्या १५ वर्षांतील या अयशस्वी कारकिदचाच एकप्रकारे 'कबुलीनामा' म्हणावा लागेल. यामध्ये सर्वप्रथम उल्लेख करावा लागेल, तो 'लक्ष्मी भंडार' योजनेचा. 'लाडकी बहीण' योजनेप्रमाणेच या योजनेंतर्गत महिलांना एक हजार रुपयांऐवजी एक हजार ५००; तर अनुसूचित जाती-जमातीतील महिलांना एक हजार, ७०० रुपये दरमहिन्याला दिले जातील. म्हणजे, जर महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या बंगालपेक्षा कैकपटीने सशक्त राज्याला 'लाडकी बहीण' योजनेचा आर्थिक भार जाणवत असेल, तिथे बंगालसारख्या राज्याला महिलांना एवढी मोठी रक्कम बँक खात्यात जमा करणे हे कितपत पेलवणारे, हा प्रश्न पडणे साहजिकच. तसेच वाढती महागाई पाहता, जीवनावश्यक वस्तूही महाग होत असल्याने, वास्तविक क्रयशक्तीतील वाढ फारच कमी आहे. दरम्यान, राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत बंगालमध्ये दरडोई उत्पन्न घसरले आहे आणि राज्यांतर्गत तीव्र विषमता कायम आहे, विशेषतः उत्तर बंगालच्या दुर्लक्षित जिल्ह्यांमध्ये. त्यामुळे संपत्तीनिर्मितीशिवाय केवळ कल्याणकारी योजनांचा घाट घातल्यास नागरिक सक्षम होण्याऐवजी परावलंबित्वाच्या चक्रात अडकण्याचा धोकाच अधिक असतो, हे दीदींनी लक्षात घ्यायला हवे.

महिलांसह राज्यातील बेरोजगार युवकांनाही दरमहिन्याला एक हजार, ५०० रुपये देण्याची प्रतिज्ञा दीदींनी केली. पण, मुळात अशा रेवडीवाटपापेक्षा युवांच्या हातांना रोजगार कसा मिळेल? त्यांचे कौशल्य कसे विकसित करता येईल? राज्यात गुंतवणूक- उद्योगधंदे कसे वाढतील? याचा धोरणात्मकदृष्ट्या सूक्ष्म विचार करणे क्रमप्राप्त. कारण, उद्योगांचे बंद पडणे, त्यांचे स्थलांतर आणि लाखो रिक्त सरकारी पदे हे राज्यातील संरचनात्मक रोजगारसंकट अधोरेखित करतात. म्हणूनच केवळ सरकारी आर्थिक मदत सन्मानजनक, स्थिर रोजगाराची कधीही जागा घेऊ शकत नाही.

शेतीच्या बाबतीतही दीदींनी ३० हजार कोटी रुपये जाहीरनाम्यात प्रस्तावित करणार असल्याचे सांगितले खरे. परंतु, आज बंगालमधील शेतकर्‍यांना अस्थिर भाव, संस्थात्मक पतपुरवठ्याची मर्यादित उपलब्धता आणि व्यवस्थेतील अकार्यक्षमता यांचा प्रकर्षाने सामना करावा लागत आहे. तसेच शेतमालाची खरेदी, पुरवठा साखळी आणि शेतकर्‍यांच्या उत्पन्नाची सुरक्षा या बाबींची पूर्तता केल्याशिवाय, कोट्यवधींचा अर्थसंकल्पीय विस्तार हा परिणामाभिमुख न राहता, केवळ प्रसिद्धीपुरता मर्यादित राहण्याचा धोकाच इथे अधिक दिसतो.

कृषीबरोबरच राज्यातील व्यापारवृद्धीच्या दृष्टीने पायाभूत सोयीसुविधा विकसित करण्याचेही दीदी असेच फुटकळ आश्वासन देतात. कोणे एकेकाळी ब्रिटिशांनी ज्या कलकत्त्यावरून भारतभर जम बसवला, त्या कोलकात्याची आजची स्थिती वेगळी सांगायला नको. कोलकाता पूर्वोत्तर भारतासाठी एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र असले, तरी दीदींच्या धोरण-लकव्याने आणि राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या स्थितीमुळे उद्योगधंदे बंगालमध्ये प्रवेश करण्यास कचरतात. टाटांच्या 'सिंगूर' प्रकल्पाला काही वर्षांपूर्वी दीदींनी केलेला उग्र विरोध आणि त्याची प. बंगालला उत्पादन, रोजगार अशी हरप्रकारे मोजावी लागलेली किंमत, हे त्याचे उत्तम उदाहरण ठरावे. गुंतवणूकदार एखाद्या राज्यात तेव्हाच गुंतवणुकीचा निर्णय घेतात, जेव्हा त्या राज्यात स्थिरता नांदते, उद्योगवर्तुळात पारदर्शकता असते आणि 'ईझ ऑफ डूईंग बिझनेस'अंतर्गत उद्योगांचे मार्ग प्रशासनाकडून सुकर केले जातात. परंतु, ममतादीदींनी केवळ दिखाव्यासाठी 'बिझनेस समेट' घेण्यातच आजवर धन्यता मानल्याने, म्हणावी तशी भरघोस गुंतवणूक हे राज्य आकर्षित करू शकलेले नाही, ही सद्यस्थिती.

त्याचबरोबर आरोग्य, गृहनिर्माण, नळजोडणी, शिक्षण, सामाजिक सुधारणा, नवीन सात जिल्ह्यांची निर्मिती, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विस्तार अशा अन्य काही महत्त्वाच्या प्रतिज्ञांनी दीदींनी बंगाली जनतेला साद घालण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, कागदोपत्री मतदारांना अशी आकर्षक आश्वासने देणे आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे, यात बरीच तफावत असते, याचे भान दीदींना नाही. त्यातच संदेशखाली प्रकरण, डी. जी. कर महाविद्यालयातील बलात्कार प्रकरण, बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांची वाढती संख्या आणि तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे वसुलीचे, चिटफंडचे खोलवर पसरलेले गुन्हेगारी जाळे, यामुळे बंगालमध्ये उद्योगधंद्यांचा वेगाने विकास होणे हे कर्मकठीणच! उदाहरणच द्यायचे झाले, तर २०११ ते २०२५ या १५ वर्षांच्या दीदींच्या अनागोंदी राजवटीत बंगालमधून तब्बल सहा हजार, ८९५ कंपन्यांनी उद्योगधंदे गुंडाळले, ज्याचा साहजिकच परिणाम उत्पादनापासून ते रोजगारापर्यंत आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेवरही दिसून येतो. राज्याच्या 'जीएसडीपी'चे (ग्रॉस स्टेट डोमेस्टिक प्रोडक्ट कर्जाशी गुणोत्तर हे २० टक्क्यांच्या खाली असावे, असा सर्वसाधारण अर्थनियम. परंतु, बंगालच्या बाबतीत हे प्रमाणही जवळपास ३८ टक्क्यांच्या घरात आहे. त्यामुळे बंगालवरील वाढते कर्ज, तिजोरीतील घटते उत्पन्न, बेरोजगारी, स्थलांतर हे गंभीर प्रश्न आ वासून उभे असतानाही, दीदींच्या जाहीरनाम्यात मात्र त्याचा सामना करण्यासाठी ठोस अशा कोणत्याही उपाययोजना दिसत नाहीत. एकूणच दीदींच्या या अन्यायकारी, अत्याचारी, हिंदूविरोधी दमनशाहीला उखडून फेकण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. तेव्हा बंगालला समृद्धी आणि गतवैभव प्राप्त करून द्यायचे असेल, तर 'पोरिबोर्तन सोंकोल्पो भाजपा बिकोल्पो!' हा नारा सत्यात उतरल्याशिवाय गत्यंतर नाहीच!

श्रद्धांजली — उदय जोगळेकर

# गलगली गेले !

सैन्य बँडच्या तालावर चालत असतं असं म्हणतात. तसंच सैन्य पोटावर चालतं अशी ही म्हण प्रचलित आहे. रज्जू भैया संघाचे सरकार्यवाह असताना त्यांचा महाराष्ट्रात प्रवास झाला होता. कार्यकर्त्यांच्या बैठकांमध्ये त्यांनी त्यांच्या शैलीमध्ये शाखा विषय मांडला होता. ते म्हणाले अच्छी शाखा चलने के लिए तीन प्रकार के 'प्र' आवश्यक रहते है. प्रवचनम प्रचलनम आणि प्रभक्षणम. अर्थात बौद्धिक कार्यक्रम शारीरिक कार्यक्रम आणि खाण्या पिण्याचे कार्यक्रम. आमच्या गलगलींना तीनही विषयात गती होती रुची होती. मात्र त्यातील प्रचलनम आणि प्रभक्षणम हे त्यांचे विशेष आवडीचे विषय होते. अगदी वयाच्या अखेरच्या टप्प्यापर्यंत या दोन विषयासाठी ते तहानभूक विसरून काम करत असत.

मोठमोठ्या कार्यक्रमांच्या व्यवस्था लावण्यामध्ये त्यांचा अमाप उत्साह राहत असे. ६९-७० च्या दरम्यान होम कट्ट्यावर झालेली अटलजी यांची प्रचंड सभा असो किंवा आणीबाणी नंतर रज्जू भैय्या यांची हरीभाई देवकरणच्या मोठ्या मैदानावर झालेली सभा असो असे विषय हाताळण्यात त्यांचा हातखंडा होता. मेकॅनिकी चौकाजवळ पंजाबी हॉटेलमधील सात्विक गरम दूध आणि पुढे पांजरापोळ चौकात अण्णाच्या हातगाडीवर मिळणारी राजसी मिरचीची कट भजी यासाठी त्यांचा खिसा मुक्तहस्ते रिक्त होत असे. कोणत्याही कार्यकर्त्याचं परिपूर्ण दर्शन म्हणजे त्याचा 3 dimensional v घ्यायचा असेल तर त्याला तीन ठिकाणी न्याहाळावं लागतं. त्याचा संघ स्थानावरील व्यवहार त्याचा नोकरी व्यवसायाच्या ठिकाणचा व्यवहार आणि त्याचा घरातील व्यवहार. यातून आपल्याला कार्यकर्त्याचं सम्यक दर्शन घडतं. मात्र त्याचं नीट आकलन होण्यासाठी आपल्याजवळ बौद्धिक पात्रता हवी आणि अनुसरण करण्यासाठी मनाचं सामर्थ्य हवं. ती कुवत माझ्याकडे नव्हती. मात्र या तीनही ठिकाणी मला त्यांचं मनोज्ञ प्रेरक दर्शन घडलं. त्यांच्याबरोबर अनेक शाखांवर प्रवास झाला. बँकेत काम करताना त्यांच्या प्रत्येक ब्रांचमध्ये मला जाता आलं आणि सोलापूर बार्शी पुणे अशा ठिकाणच्या घरांमध्ये घरातील सर्वांशी मुक्त संवाद साधता आला हे माझं भाग्यच समजतो.

महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावर सुमारे तीन वर्षे पुणे जिल्ह्यामध्ये खेड जुन्नर इत्यादी तालुक्यात त्यांनी प्रचारक म्हणून काम केलं. जेव्हा त्यांनी प्रचारक म्हणून घराबाहेर पडायचं ठरवलं त्यावेळी घरून प्रचंड विरोध झाला. तरीही ते आपल्या निर्णयापासून ढळले नाहीत. आपला प्रचारक जीवनाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ते सोलापूरला परतले. पुन्हा त्याच पायर्‍यांवरून घरात प्रवेश केला. विवाह झाला. गृहस्थ धर्म स्वीकारला. तरीही अनेक वर्षे घरातील अबोला आणि दुरावा कायम होता. पुढे ते सोलापूर जनता सहकारी बँकेत नोकरीला लागले आणि बदली होऊन बार्शीला गेले. पुढील प्रदीर्घ काळ त्यांचं वास्तव्य बार्शी येथेच राहिलं. काही कौटुंबिक आणि अन्य कारणामुळे संघाच्या नित्य कामातील जबाबदारी फार काळ राहिली नाही. मात्र प्रासंगिक नैमित्तिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग राहिला. सोलापूर जनता सहकारी बँकेच्या गणेशोत्सवात चालणार्‍या बौद्धिक व्याख्यानमालेला त्यांच्याच परिश्रमांमुळे लोकप्रियता मिळाली. मोठमोठे दिग्गज वक्ते सोलापूरकरांना पाहता आले आणि ऐकता आले. नंतर ते बँकेमध्ये बार्शी शाखेचे शाखाधिकारी सुद्धा झाले. यानिमित्ताने बार्शीतील व्यापारी वर्गामध्ये खूप संपर्क आला. अनेकांशी घनिष्ठ स्नेह जुळला. आणि निधी संबंधीच्या कोणत्याही कामांसाठी त्यांचा सदैव भक्कम आधार राहिला. संघ कार्यकर्त्यांचं प्रचारकांचं घरी येणं जाणं चालू राहिलंच. हळूहळू घरातील संपूर्ण वातावरण संघानुकूल करण्यात त्यांना यश प्राप्त झालं. मुलं अनुजा, आल्हाद मोठी झाली, चांगलं शिकली. बँकेतील निवृत्तीनंतर आल्हादच्या नोकरीच्या निमित्ताने ते पुणेकर झाले आणि नांदेड सिटीमध्ये स्थिरावले. संघ कामासाठी अनुकूलता नसलेल्या या नवनगरीमध्ये त्यांनी हिमतीने एक शाखा सुरू केली आणि बघता बघता सात शाखा सुरू झाल्या. बार्शीतील बराच काळ दैनिक शाखेशी संपर्क सुटला होता. त्याची भरपाईच जणू काही त्यांनी नांदेड सिटीमध्ये आल्यावर पूर्ण केली. त्यांच्या अंत्यदर्शनाला लागलेली लांबच लांब रांग त्यांच्या संघटन कौशल्याची साक्ष देत होती.

व्यावसायिक रंगभूमी गाजविणारे अनेक कलाकार प्रारंभी हौशी रंगभूमीवर काम करत असतात. तसे आमचे गलगली हे हौशी लेखक होते. त्यांनी लहान-मोठी अनेक पुस्तके लिहिली. अशाच प्रकारे टोकाचा आग्रह करून त्यांनी माझं मुद्द्याची गोष्ट हे पहिलं पुस्तक प्रकाशित केले. मधु करजगी आणि आनंद गलगली अशा दुहेरी नावामुळे आणीबाणीमध्ये बराच काळ त्यांनी पोलिसांना गुंगारा दिला. अखेर ते पकडले गेले. संघ जीवन धर्म अध्यात्म हेच त्यांच्या लेखणीचे विषय होते. संघ जीवनात ते कर्मयोगी होते तर व्यक्तिगत जीवनात भक्तिमार्गी होते. अशा प्रकारचे अनंत उद्योग करण्यात त्यांना पत्नी आणि मुलांनी पूर्ण साथ दिली. अजूनही काही पुस्तके त्यांना हाता वेगळी करायची होती. त्यामुळे आपले दुखणे विकोपाला गेले आहे याची चाहूल लागल्यावर त्यांची देवाकडे दोन वर्षे बोनस दे अशी विनवणी चालू होती. परंतु...जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला या वचनाप्रमाणे देव या श्रेष्ठ भक्ताला लवकर घेऊन गेला. त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..!